वर्ष: 06 | अंक: 10

16 ते 30 नोव्हेंबर, 2025 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार




## विकसित भारताचे सारथी

# आजची मुले उद्याचे भविष्य

जागतिक बालदिन (20 नोव्हेंबर) विशेष: विकसित भारताचे स्वप्न मुलांच्या उज्ज्वल भविष्याशी निगडित असून, केंद्र सरकार देशाचे भवितव्य सावरणाऱ्या त्या बालकांचे संगोपन करत आहे.

ई-कॉपीसाठी
QR कोड स्कॅन करा



# वंदे मातरमची भावना

## भारताच्या अमर चेतनेशी जोडलेली आहे.

"मन की बात" हा पंतप्रधान नरेंद्र मोदींसाठी देशवासियांशी थेट संवाद साधण्याचा मंच आहे, जो देशाची विविधता, उर्मी आणि सेवाभाव एका सूत्रात गुंफतो. त्याचबरोबर लोकांना चांगले काम करण्याची प्रेरणा देखील देतो. लोक या कार्यक्रमासाठी पंतप्रधान मोदींना असंख्य संदेश पाठवतात, ज्यामध्ये ते प्रतिभावान व्यक्तींबद्दल चर्चा करतात. "मन की बात" च्या 127 व्या भागात, पंतप्रधान मोदींनी विविध मुद्द्यांवर आपले विचार मांडले. जाणून घेऊया संपादित अंश...

- **आता माओवादग्रस्त भागात आनंदाचे दिवे पेटले आहेत:** एकेकाळी माओवादी दहशतीच्या अंधारात बुडालेल्या भागातही यावेळी आनंदाचे दिवे पेटले आहेत. लोकांना त्यांच्या मुलांचे भविष्य धोक्यात आणणाऱ्या माओवादी दहशतीचे समूळ उच्चाटन करायचे आहे.
- **सकारात्मक दृष्टिकोन:** सणासुदीच्या निमित्ताने, मी सर्वांच्या नावे पत्र लिहून माझ्या भावना व्यक्त केल्या होत्या. माझ्या पत्रात, मी स्वयंपाकात खाद्यतेलाचा वापर 10 टक्के कमी करण्याचे आवाहन केले होते. लोकांनी याला खूप सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.
- **भारतीय प्रजातीचे श्वान:** सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाने त्यांच्या पथकांमध्ये भारतीय प्रजातीच्या श्वानांची संख्या वाढवली आहे. कुत्र्यांच्या प्रशिक्षणासाठी बीएसएफचे राष्ट्रीय प्रशिक्षण केंद्र ग्वाल्हेरमधील टेकनपूर येथे आहे. बंगळुरूमधील सीआरपीएफच्या डॉग ब्रीडिंग अँड ट्रेनिंग स्कूलमध्ये मोंगरेल्स, मुधोल हाउंड्स, कोम्बाई आणि पांडिकोना यासारख्या भारतीय कुत्र्यांना प्रशिक्षण दिले जात आहे.
- **देश सरदार पटेलांचा ऋणी आहे:** सरदार पटेल हे आधुनिक काळातील देशाच्या महान व्यक्तींपैकी एक होते. खेडा सत्याग्रहापासून बोरसद सत्याग्रहापर्यंतच्या अनेक चळवळींमध्ये सरदार पटेल यांचे योगदान आजही स्मरणात आहे. अहमदाबाद नगरपालिकेचे प्रमुख म्हणूनही त्यांचा कार्यकाळ ऐतिहासिक होता. गृहमंत्री आणि उपपंतप्रधान म्हणून त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल आपण त्यांचे सदैव ऋणी राहू.
- **कॉफी लागवड:** ओडिशाच्या कोरापूट कॉफीला एक आगळीच चव आहे. त्याची लागवडही लोकांना फायदेशीर ठरत आहे. कोरापूटमधील काही लोक आवडीने कॉफीची लागवड करत आहेत. कॉफीने त्यांच्या जीवनात एक सुखद बदल घडवून आणला आहे. त्यांना सन्मान आणि समृद्धी दोन्हीची प्राप्ती झाली आहे.
- **'वंदेमातरम्' ची घोषणा:** राष्ट्रगीत, किंवा 'वंदेमातरम्'. एक असे गीत ज्याचा पहिलाच शब्द मनाचा ठाव घेतो. 'वंदेमातरम्' या एकाच शब्दात इतके भाव, इतकी उर्मी सामावलेली आहे. ते आपल्याला भारतमातेच्या वात्सल्याची सहजतेने अनुभूती देते. 'वंदे मातरम्' चा उद्घोष 140 कोटी भारतीयांना ऐक्याच्या उर्जेने भरून टाकतो.
- **भारताला नवसंजीवनी:** जर देशभक्ती, भारतमातेवरील प्रेम या शब्दातीत भावना असतील, तर 'वंदे मातरम्' हे गीत त्या अमूर्त भावनेला साकारणारा स्वर देणारे आहे. शतकानुशतके गुलामगिरीमुळे दुबळ्या झालेल्या भारताला नवसंजीवनी देण्यासाठी बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी त्याची रचना केली.
- **संस्कृत भाषेला नवसंजीवनी:** संस्कृतचा उल्लेख होताच आपले धर्मग्रंथ, वेद, उपनिषदे, पुराणे, शास्त्रे, प्राचीन ज्ञान, अध्यात्म आणि तत्वज्ञानाची आठवण येते. एकेकाळी संस्कृत ही संभाषणाची भाषा देखील होती. आता, संस्कृत आणि सोशल मीडियाच्या जगाने संस्कृतला एक नवीन जीवनदान दिले आहे.
- **कोमरम भीम यांच्याविषयी:** नुकतीच 22 ऑक्टोबर रोजी महान व्यक्तिमत्व कोमरम भीम यांची जयंती साजरी करण्यात आली. कोमरम भीम अल्पायुषी होते. ते फक्त 40 वर्षे जगले, पण त्यांच्या आयुष्यात त्यांनी असंख्य लोकांच्या, विशेषतः आदिवासी समुदायाच्या हृदयावर अमिट छाप सोडली. त्यांच्याविषयी शक्य तितके जाणून घेण्याचा प्रयत्न करण्याचे आवाहन मी तरुणांना करतो.

'मन की बात' चा संपूर्ण भाग ऐकण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

11वा संविधानदिवस 26 नोव्हेंबर 2025

# लोकशाहीचे सामर्थ्य जनतेचा संकल्प

संविधानाने भारतीय लोकशाहीसमोर आलेल्या 'आणीबाणी'सारख्या धोकादायक काळाला तोंड दिले, त्याचबरोबर देशाची प्रत्येक आवश्यकता आणि आशा यांची पूर्तताही केली आहे. डॉ. भीमराव आंबेडकर निर्मित संविधानाने दिलेल्या सामर्थ्यामुळेच आज जम्मू- काश्मीरमधेही देशाचे संविधान लागू आहे. परिवर्तनाच्या महत्वाच्या कालखंडातून भारत मार्गक्रमण करत आहे; अशा वेळी 'मार्गदर्शक दीप' या रूपाने संविधान योग्य मार्ग दाखवीत आहे. संविधानाच्या या प्रकाशातून आता भारत आपला भविष्याचा मार्ग, विशाल स्वप्ने आणि मोठे संकल्प साध्य करण्यासाठी एकवटला आहे, कारण आज प्रत्येक नागरिकाचे लक्ष्य आहे, विकसित भारत निर्माण...

" आपल्या संविधानाच्या मूळ प्रतीमध्ये प्रभू श्रीराम,सीता माई, हनुमान जी, भगवान बुद्ध, भगवान महावीर, गुरु गोविंद सिंह जी.. सर्वांची चित्रे आहेत. भारताच्या संस्कृतीचे प्रतिक... या चित्रांना संविधानात स्थान देण्यात आले जेणेकरून ते आपल्याला मानवी मूल्यांप्रती सजग करत राहतील. आज ही मानवी मूल्ये भारताची धोरणे आणि निर्णय यांचा पाया आहेत." - नरेंद्र मोदी,पंतप्रधान



न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 06, अंक: 10 | 16-30 नोव्हेंबर 2025

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोषकुमार

सल्लागार संपादक
विभोर शर्मा

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवनकुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादन
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू)

मुख्य डिझायनर
श्याम तिवारी

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंग



13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचारबद्दल ताजी माहिती जाणून घेण्यासाठी फॉलो करा: @NISPIBIndia

# आतील पानांवर ...



मुखपृष्ठ कथा

## विकसित भारताचा सारथी सुदृढ बालपण समृद्ध भारत

बाल कल्याणाचा नवा मार्ग

या 20 नोव्हेंबरला जागतिक बाल दिवस आणि जागतिक बाल अधिकार दिवसाच्या औचित्याने जाणून घेऊया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार बालके म्हणजेच भारताच्या भावी पिढीची मुळापासूनच जोपासना करत भारताचा पाया कसा करत आहे भक्कम... | 10-27

समुद्राच्या राखणदारांसमवेत पंतप्रधानांनी साजरी केली दिवाळी



पंतप्रधान मोदी यांनी गोवा आणि कारवारच्या पश्चिमी किनाऱ्यावर देशाच्या शूर नौसैनिकांसमवेत 'आयएनएस विक्रांत'वर साजरी केली दिवाळी | 28-29

पंतप्रधानांना मिळालेल्या भेटवस्तूंचा ई-लिलाव



7व्या लिलावातून प्राप्त रक्कमही 'नमामि गंगे' प्रकल्पाला समर्पित | 46-47

**व्यक्तिमत्व: झलकारी बाई**
1857च्या स्वातंत्र्य समरात राणी लक्ष्मीबाई यांच्या एकनिष्ठ सहयोगी | 5

**वृत्त सार** | 6-7

**गगनाला भिडणारा भारताचा आत्मविश्वास**
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राफेलमधून उड्डाण करून घडविला इतिहास | 8

**8व्या वेतन आयोगाच्या विचारार्थ विषयांना मंजुरी**
केंद्रीय मंत्रिमंडळाने अनेक महत्वाच्या प्रस्तावांना दिली मंजुरी | 9

**सागरातून समृद्धीचा मार्ग**
इंडिया मेरीटाईम वीक 2025 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडले भारताचे व्हिजन | 30-31

**प्रत्येक गरजूला घर... घरही, रोजगारही**
फ्लॅगशिप योजना पीएम आवास योजना- ग्रामीणच्या नवव्या वर्धापनदिनानिमित्त विशेष माहिती | 32-33

**युवा सामर्थ्य ही सर्वात मोठी ताकद**
रोजगार मेळ्यात देण्यात आली 51 हजारपेक्षा जास्त नियुक्ती पत्रे | 34-35

**एकता दिवस: राष्ट्र एक, संकल्प दृढ**
सरदार पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन | 36-37

**छत्तीसगडमधून भारताच्या विकासाचा उद्घोष** छत्तीसगड स्थापनेच्या रजत महोत्सवात पंतप्रधान मोदी यांनी दिल्या विकासकामांच्या भेटी | 38-49

**इतिहासाच्या प्रवाहाला दिली नवी दिशा** सामाजिक सुधारणा-राष्ट्र निर्माणात अग्रणी आर्य समाजाच्या स्थापनेची 150 वर्षे | 40- 41

**भारतात आता व्यवसाय सुलभता संशोधनावर लक्ष केंद्रित** उदयोन्मुख विज्ञान आणि तंत्रज्ञान नवोन्मेश परिषद 2025 मध्ये पंतप्रधानांचे संबोधन | 42-43

**भारताचा विकास जागतिक संधींना देत आहे आकार**
एनडीटीव्ही जागतिक परिषद-2025मध्ये पंतप्रधान मोदी यांचे संबोधन | 44-45

**स्थापित उर्जा क्षमता झाली 500 गीगावॅटपेक्षा अधिक**
स्वच्छ उर्जेच्या दिशेने संधींची नवी द्वारे खुली करणारी अणु उर्जा | 48

**प्रकाशक आणि मुद्रक: कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो) मुद्रण – चन्दु प्रेस, 469, पटपड़गंज इंडस्ट्रियल एस्टेट, दिल्ली-110092
**पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ता –** कमरा संख्या-1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नई दिल्ली-110003
**ईमेल –** response-nis@pib.gov.in आर. एन. आय. क्रमांक DELMAR/2020/78830

# संपादकांच्या लेखणीतून...

# सशक्त बालपण – समृद्ध भारत उपक्रम राष्ट्राला देईल नवी उर्जा

सप्रेम नमस्कार,

संस्कृतमध्ये एक श्लोक आहे - "यथा बीजं तथा फलम", म्हणजेच आपण जसे बी पेरतो तसे फळ येते. म्हणजेच आज मुलांमध्ये जे संस्कार रुजवले जातील, त्यांच्या आरोग्याला जेवढे प्राधान्य दिले जाईल, त्यांना जे शिक्षण उपलब्ध करून दिले जाईल, भविष्यात तेच राष्ट्राचे स्वरूप होईल. हाच दृष्टीकोन भारताची अमृत पिढी घडवीत आहे.

आज भारताचे यश अभूतपूर्व अशा शिखरावर आहे. अवघ्या जगात भारताचा दबदबा निर्माण झाला आहे. 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या संकल्पपूर्तीकडे देशाची जोमाने वाटचाल सुरु आहे. आज भारतासाठी काहीही अशक्य नाही. राष्ट्राचे वाढते सामर्थ्य, प्रत्येक क्षेत्रात नव्या संधी निर्माण करत आहे.

मात्र विकसित भारताच्या या यशाचे वाहक कोण असतील? तर नक्कीच आजची बालके. मुले म्हणजे राष्ट्राचे अलंकार आहेत, राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांनी जे ज्ञान आणि संस्कार प्राप्त केले असतील त्याप्रमाणेच भारताच्या भविष्याला आकार येईल. मुले जर आरोग्य संपन्न, सुशिक्षित असतील, संस्कृतीमध्ये घडलेली असतील, विज्ञानात प्रवीण असतील तर ती भारताला विकसित राष्ट्र म्हणून पुढे नेऊ शकतील. ज्याप्रकारे इमारत भक्कम राहावी यासाठी मजबूत पाया आवश्यक असतो त्याच प्रमाणे सामर्थ्यवान नव भारतासाठी पोषणयुक्त आणि आरोग्य संपन्न बालपण आवश्यक आहे.

हाच विचार साकार करत नव भारताच्या पिढीची मुळापासूनच जोपासना करण्यासाठी केंद्र सरकार कार्यरत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बालकांविषयीची आत्मीयता अनेकदा जाहीरपणे दिसून आली आहे. पोषण अभियान असो किंवा राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, अटल नवोन्मेश अभियान असो किंवा परीक्षा पे चर्चा, बालपण सशक्त करणाऱ्या त्यांच्या उपक्रमांचा सुपरिणाम दिसून येत आहे. कन्या सुरक्षा, सन्मान आणि सबलीकरण यावर त्यांचा विशेष लक्ष राहिले आहे. मुली प्रत्येक क्षेत्रात कीर्तीचा ध्वज फडकावत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी अनेकदा अभिमानाने काढले आहेत.

गेल्या 11 वर्षात धोरणे, योजना आणि अभियानांद्वारे बालकांना नव भारताचे स्वप्न पाहणारे आणि त्यांना ज्ञानवान, सामर्थ्यवान करत झळाळता भारत घडविण्यासाठीचे उपक्रम, जागतिक बाल दिनाचे (20 नोव्हेंबर) औचित्य साधत यावेळची आमची मुखपृष्ठ कथा आहे.

याशिवाय व्यक्तिमत्व या मालिकेत युद्ध कौशल्यात पारंगत वीरांगना झलकारी बाई, महत्वाच्या योजनांतर्गत 20 नोव्हेंबर रोजी प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीणचा नववा वर्धापन दिन, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, पंतप्रधानांना मिळालेल्या भेटी आणि स्मृतीचिन्हांचा सातवा ई-लिलाव, रोजगार मेळावा यासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पंधरवड्यातले कार्यक्रम यांचा अंकात समावेश आहे.

याचबरोबर अंकांच्या आतील पानावर 'मन की बात' आणि मलपृष्ठावर 24 नोव्हेंबर 2025 ला वीर लाचित बरफुकन यांच्या 403 व्या जयंतीनिमित्त कृतज्ञ राष्ट्राचे नमन यावरील विशेष माहितीही यामध्ये समाविष्ट आहे.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध अंक वाचा/डाऊनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# आपले मनोगत




## अतिशय उपयुक्त आणि उत्तम माहितीने परिपूर्ण

न्यू इंडिया समाचार अतिशय उपयुक्त आणि उत्तम माहितीने परिपूर्ण अंक आहे. सरकारी योजनांची यामध्ये देण्यात आलेली माहिती समाजात सांगण्यासाठी उपयोगी पडते. या अंकाविषयी मी लोकांना माहिती दिली आणि याच्या वाचनाविषयी गोडी निर्माण केली. बीड जिल्हा परिषदेत कृषी अधिकारी या पदावर मी काम करतो. या अंकामध्ये देण्यात आलेली माहिती माझ्या संदर्भासाठी अतिशय उपयोगी असते.

nitinraut121@gmail.com

## सरळ आणि सुस्पष्ट भाषा..विश्वासार्ह आणि व्यापक कव्हरेज

मी सध्या विविध सरकारी स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहे.या अंकातून वर्तमान घडामोडी,सरकारी धोरणे आणि सामाजिक – आर्थिक विकासाची अद्ययावत माहिती याचा फार मोठा लाभ होतो. अशा विषयांवर न्यू इंडिया समाचार सुलभ आणि सुस्पष्टपणे प्रामाणिक, विश्वासार्ह आणि व्यापक कव्हरेज करतो हे मी जाणतो.

anjuranip79@gmail.com

## माझ्या ज्ञानात पडत आहे भर, साध्य करू शकते लक्ष्य

माझे नाव श्रीलक्ष्मी आहे. सरकारी परीक्षांसाठी मी तयारी करत आहे. यासाठी करंट अफेअर हा विभाग नियमित वाचते.न्यू इंडिया समाचारचे अंक उत्तमच आहेत. सर्वप्रथम कार्यालयामध्ये हा अंक माझ्या वाचनात आला. याच्या ई- प्रती मी डाऊनलोड केल्या आहेत. हा अंक माझ्या ज्ञानात भर घालत आहे त्यामुळे मी माझे लक्ष्य सुलभतेने गाठू शकते.

msrilakshmi6699 @gmail.com

## वर्तमान माहिती प्राप्त करण्यासाठी मिळते मदत

न्यू इंडिया समाचार अंक नियमितपणे प्राप्त झाल्याने मला वर्तमान घडामोडींविषयी माहिती मिळण्यासाठी मदत तर होतेच त्याचबरोबर माझ्या ज्ञानात, विश्लेषणात्मक कौशल्यातही वृद्धी होत आहे. त्याचबरोबर परीक्षेकरिता तयारी करण्यासाठीही मला याची मदत होत आहे. भारत सरकारद्वारे सुरु केलेल्या योजना, सुधारणा आणि उपक्रम जाणून घेण्यासाठी एक मौल्यवान संसाधन म्हणून हा अंक काम करतो.

mr.devkant@gmail.com

पत्रव्यवहार आणि ईमेल साठी पत्ता कक्ष क्र. 1077,
सूचना भवन , सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली 110003
ई-मेल- response-nis@pib.gov.in

न्यू इंडिया समाचार
आकाशवाणीवर ऐकण्यासाठी
क्यू आर कोड स्कॅन करा



# झलकारी बाई दृढ साहसाचे प्रतिक

झलकारी बाई... भारताच्या सर्वात गौरवास्पद महिला सैनिकांपैकी एक, ज्यांनी 1857च्या स्वातंत्र्य समरात महत्वाची भूमिका बजावली. झाशीच्या सैन्यामध्ये महिला शाखा दुर्गा दलाच्या सेनापती राहिलेल्या झलकारी बाई, शत्रूची दिशाभूल करण्यासाठी राणीच्या वेशातही करत असत युद्ध....

**जन्म: 22 नोव्हेंबर 1830, मृत्यू: 4 एप्रिल 1857**

भारतासह जगभरात ज्यांच्या शौर्याच्या गाथा प्रसिद्ध आहेत, अशा झाशीची राणी लक्ष्मीबाई यांना कोण जाणत नाही? शौर्यामध्ये साक्षात दुर्गा मातेचा अवतार मानल्या जाणाऱ्या लक्ष्मीबाईंनी आपल्या शौर्याने इंग्रजांना सळो की पळो तर केलेच त्याचबरोबर त्यांच्या सत्तेचा पायाही डळमळीत केला. राणी लक्ष्मीबाईंच्या सैन्यामध्ये झलकारी बाई नावाच्या एक महिला सैनिक होत्या.राणी लक्ष्मीबाई यांच्या 'दुर्गा दल' या महिला शाखेच्या त्या सेनापती होत्या. पहिल्या स्वातंत्र्य संग्रामात झाशीच्या राणीसमवेत शौर्याने लढताना त्यांनी ब्रिटीश सैन्याचे अनेक हल्ले फोल ठरविले. असे म्हटले जाते की एका गरीब आणि दलित कुटुंबात जन्मलेल्या,एखाद्या सिंहिणीप्रमाणे शूर असलेल्या झलकारी बाईंचा चेहरा आणि अंगकाठी लक्ष्मीबाई यांच्याशी मिळतीजुळती होती. यामुळेच इंग्रजांना गोंधळविण्यासाठी अनेकवेळा त्या राणीच्या वेशात रणांगणात उतरत. अंतकाळीही राणीच्या वेशात युद्ध करण्यासाठी त्या उतरल्याने लक्ष्मीबाईंना किल्यातून निसटण्यासाठी वेळ मिळाला मात्र इंग्रजांनी झलकारी बाईंना पकडले. 4 एप्रिल 1857ला त्यांना हौतात्म्य प्राप्त झाले.

झलकारी बाईंचा जन्म 22 नोव्हेंबर 1830 मध्ये झाशी जवळच्या भोजला या गावी झाला. मोठेपणी त्या सैनिक आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या विश्वासू सल्लागारांपैकी एक बनल्या. आपल्या शौर्याने त्या राणी लक्ष्मीबाई यांची सखी बनल्या. त्यांनी अतिशय लहान वयात घोडेस्वारी, शस्त्रकला आणि योद्ध्याप्रमाणे लढाई शिकली होती, असे म्हटले जाते. त्यानंतर त्यांनी तिरंदाजी, कुस्ती आणि नेमबाजीचेही धडे घेतले.

भारत सरकारने 22 जुलै 2001 रोजी झलकारी बाई यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट जारी केले. इंग्रजांना जेरीला आणणाऱ्या झलकारी बाई यांची गाथा आजही बुंदेलखंडमधल्या लोकांच्या मनामनात जपलेली आहे आणि लोक आजही त्यांचे स्मरण करतात. त्यांची गाथा आजही लोककथांमध्ये सांगितली जाते आणि लोक गीतांमध्ये गायली जाते. अद्वितीय शौर्य, अदम्य साहस आणि अफाट पराक्रम ज्यांच्या ठायी वसत होता, अशा झलकारी बाईंचा मातृभूमीच्या स्वाभिमान रक्षणासाठीचा त्याग आणि समर्पण सदैव स्मरणात राहील.

उत्तर प्रदेशात झाशी इथे 'राष्ट्र रक्षा समर्पण पर्व' मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 19 नोव्हेंबर 2021 मध्ये म्हटले होते, ही धरती, राणी लक्ष्मीबाई यांच्या सहयोगी वीरांगना झलकारी बाई यांचे शौर्य आणि सैन्य निपुणता यांची साक्षी राहिली आहे. 1857च्या स्वातंत्र्य संग्रामातल्या या अमर वीरांगनेच्या चरणी मी आदरपूर्वक नमन करतो, त्यांना आदरांजली अर्पण करतो.15 ऑगस्ट 2022 ला 76व्या स्वातंत्र्य दिनी लाल किल्याच्या बुरुजावरूनही त्यांनी झलकारी बाई यांच्या स्मृतींना वंदन केले होते. ■

वृत्त सार

# 2025 या वर्षाचे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञान रत्न

भारताचे प्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ प्राध्यापक जयंत नारळीकर यांना 2025 या वर्षाच्या मरणोत्तर विज्ञान रत्न पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.या वर्षी 20 मे रोजी त्यांचे पुण्यात निधन झाले. बिग बँग सिद्धांताला आव्हान दिल्याबद्दलही ते ओळखले जातात. 25 ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय विज्ञान पुरस्कारासाठीच्या जारी सुचीसह ही घोषणा करण्यात आली. विज्ञान,तंत्रज्ञान आणि नवोन्मेश यामधल्या उल्लेखनीय योगदानासाठी विज्ञान रत्न, विज्ञान श्री, विज्ञान युवा- शांती स्वरूप भटनागर आणि विज्ञान टीम अशा चार श्रेणीमध्ये हे पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यावर्षी एकूण 23 वैज्ञानिक आणि एका टीम ला सन्मानित करण्यात येईल.


प्रा जयंत विष्णू नारळीकर

### पुरस्कार विजेत्यांची नावे

विज्ञान रत्न: प्रा.जयंत विष्णू नारळीकर (भौतिकशास्त्र) मरणोत्तर

विज्ञान श्री: डॉ. ज्ञानेंद्र प्रताप सिंह (कृषी विज्ञान), डॉ. युसुफ मोहंमद शेख (अणु उर्जा), डॉ. के थंगराज (जीवशास्त्र), प्रा. प्रदीप थलप्पील (रसायन शास्त्र), प्रा.अनिरुद्ध भालचंद्र पंडित (अभियांत्रिकी विज्ञान), डॉ एस वेंकट मोहन (पर्यावरण विज्ञान), प्रा. महान एमजे (गणित आणि संगणक शास्त्र) आणि जयन एन (अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान)

विज्ञान युवा – शांती स्वरूप भटनागर: डॉ. जगदीश गुप्त कपुगंती (कृषी विज्ञान), डॉ. सतेन्द्र कुमार मांगरथीया (कृषी विज्ञान), देबार्का सेनगुप्ता (जीवशास्त्र), दीपा आगाशे (जीवशास्त्र), डॉ. दिब्येंदु दास (रसायन शास्त्र), डॉ. वलीउर रहमान (भू विज्ञान) प्रा. अर्कप्रवा बसू (अभियांत्रिकी विज्ञान), प्राध्यापक सब्यसाची मुखर्जी (गणित आणि संगणक विज्ञान), प्रा. श्वेता प्रेम अग्रवाल (गणित आणि संगणक विज्ञान), डॉक्टर सुरेश कुमार (वैद्यकशास्त्र), प्रा. अमित कुमार अग्रवाल (भौतिकशास्त्र), प्रा. सुहृद श्रीकांत मोरे (भौतिकशास्त्र), अंकुर गर्ग (अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान), प्राध्यापक मोहनशंकर शिवप्रकाश (तंत्रज्ञान आणि नवोन्मेष)

विज्ञान टीम : अरोमा मिशन, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद (कृषी विज्ञान)

## 15 हजार कोटीपेक्षा जास्त रुपये खर्चून सरकार डाळी-तेलबिया खरेदी करणार

डाळी आणि तेलबिया क्षेत्रात शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. या अंतर्गत तेलंगणा, ओदिशा, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश मधून खरीप हंगाम 2025-26 साठी डाळी आणि तेलबिया यांची खरेदी केली जाईल. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी 27 ऑक्टोबरला घेतलेल्या बैठकीत 'प्रधानमंत्री अन्नदाता आय संरक्षण अभियान'(पीएम-आशा) सह कृषी आणि शेतकरी कल्याण योजनांअंतर्गत याला मंजुरी दिली. यासाठी 15,095.83 कोटी रुपये जारी करण्यात आले असून या चार राज्यांमधल्या लाखो शेतकऱ्यांना याचा लाभ होईल. सरकारने तूर, उडीद आणि मसूर यांची खरेदी राज्य उत्पादनाच्या 100 टक्क्यापर्यंत करण्याची व्यवस्था केली आहे.



# महिला क्रिकेट विश्व कप

## भारतीय संघाने रचला इतिहास

**भारताच्या क्रिकेट इतिहासात आणखी एक गौरवशाली अध्याय जोडला गेला आहे. महिला संघाने पहिल्यांदाच आयसीसी महिला विश्वचषक 2025 जिंकून भारताची किर्ती नव्या उंचीवर पोहोचवली आहे. खेळाडूंच्या जबरदस्त क्रिकेट कौशल्याने लाखो मुलींसाठी प्रेरणेचा मार्ग प्रशस्त केला आहे...**

भारतीय महिला क्रिकेट संघाने दक्षिण आफ्रिकेवर 52 धावांनी मात करत, एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचे जेतेपद आपल्या नावे केले. नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने विश्वविजेते बनत इतिहासात आपले नाव कोरले. भारताने पहिल्यांदाच आयसीसी महिला विश्वचषक स्पर्धा जिंकली असल्याने, हा महिला क्रिकेटसाठी खूप मोठा क्षण ठरला. या विजयातून खेळाडूंची मेहनत आणि जिद्दीसोबतच, प्रत्येक खेळाडूचा प्रवास, संघर्ष आणि धैर्यही दिसून येते. प्रत्येक भारतीयाला आनंदाने भारून टाकणारा हा विजय देशाच्या लेकींच्या कामगिरीचे, जिद्दीचे आणि संघ भावनेचे उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे. हा ऐतिहासिक विजय असंख्य मुलींना त्यांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी तसेच, देशाला मान अधिक उंचावण्यासाठी प्रेरणा देत राहील.

> आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक 2025 च्या अंतिम सामन्यात भारतीय संघाचा जबरदस्त विजय. अंतिम सामन्यातील त्यांची कामगिरी, अद्भुत कौशल्य आणि आत्मविश्वासाने भारलेले होते. संघाने संपूर्ण स्पर्धेत असामान्य सांघिक भावना आणि दृढ निर्धार कायम राखला. आपल्या खेळाडूंचे अभिनंदन. हा ऐतिहासिक विजय भविष्यातील विजेत्या खेळाडूंना, क्रीडा क्षेत्रात येण्यासाठी प्रेरणा देईल.
>
> **नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




## भारतात 100 पैकी 99 पेमेंट आता डिजिटल माध्यमातून, त्यातील 85% युपीआयद्वारे




भारत वेगाने रोखविरहित अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करू लागला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ताज्या अहवालातून समोर आलेली एक बाब म्हणजे, 2024 मध्ये देशात जितकी पेमेंट केली गेली, त्यापैकी 99.7 टक्के व्यवहार डिजिटल माध्यमांतून झाले, तर, रकमेच्या बाबतीत हा आकडा 97.5% इतका होता. म्हणजेच आता लोक रोख रक्कम आणि धनादेशाचा खूप कमी वापर करू लागले आहेत. या अहवालानुसार, 2025 या वर्षाच्या पहिल्या सहामाहीत झालेल्या एकूण डिजिटल व्यवहारांमध्ये, 84.8% वाटा युपीआयचा आहे. आरटीजीएसचा वाटा 0.1% इतका, कार्डांचा वाटा 2.7% इतका आणि धनादेशाने केलेल्या पेमेंटचा वाटा 0.2% इतका होता. असे असले तरी, रकमेच्या अनुषंगाने पाहता 68.7 टक्के रकमेचे पेमेंट आरटीजीएसच्या माध्यमातून केले गेले आहे. या अहवालानुसार 2019 च्या पहिल्या सहामाहीत 1,424 कोटी रुपयांचे डिजिटल व्यवहार झाले होते, 2025 मध्ये त्यात वाढ होऊन ते 12,520 कोटी रुपयांवर पोहोचले. एकूण व्यवहाराच्या बाबतीत 2019 मध्ये डिजिटल व्यवहारांचा वाटा 96.7 टक्के इतका होता, त्यात वाढ होऊन 2025 मध्ये तो 99.8 टक्क्यांपर्यंत पोहोचला. याच काळात 2019 मध्ये 441.6 कोटी इतके युपीआय व्यवहार झाले होते, 2025 त्यात वाढ होऊन ही संख्या 10,637 कोटींवर पोहोचली आहे. रकमेच्या बाबतीत बोलायचे झाले तर, युपीआयच्या माध्यमातून 2019 च्या पहिल्या सहामाहीत 8 लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते, त्यात वाढ होऊन 2025 मध्ये ते 143 लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहेत.





## राष्ट्रपतींचे राफेलमधून उड्डाण

# आकाशाला गवसणी घालणारा भारताचा आत्मविश्वास

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 29 ऑक्टोबरला हवाई दलाच्या हरयाणामधील अंबाला इथल्या तळावरून राफेल या लढाऊ विमानातून ऐतिहासिक उड्डाण केले आणि नवा इतिहास रचला. यापूर्वी त्यांनी 2023 मध्ये सुखोई 30 एमकेआयमधूनही उड्डाण केले होते. या उड्डाणामुळे त्या भारतीय हवाई दलाच्या दोन लढाऊ विमानांतून उड्डाण करणाऱ्या देशाच्या पहिल्या राष्ट्रपती बनल्या...**

> “ शक्तिशाली राफेल विमानातून केलेले पहिल्या उड्डाणामुळे मला देशाच्या संरक्षण क्षमतांबद्दल अभिमानाची नवी भावना निर्माण केली आहे.
>
> -द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हवाई दलाच्या अंबाला इथल्या तळावरून शक्तिशाली राफेल लढाऊ विमानातून उड्डाण केले, आणि देशाच्या किर्तीत आणखी एक नवा अध्याय जोडला आहे. हे उड्डाण केवळ भारतीय हवाई दलाच्या युद्ध क्षमतेचेचे निर्देशक नाही, तर ते भारताची संरक्षण विषयक आत्मनिर्भर ताकद आणि तंत्रज्ञानातील उत्कृष्टतेचे प्रतीकही बनले आहे. राष्ट्रपती या भारतीय सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर आहेत. त्यांनी सुमारे 30 मिनिटांपर्यंत उड्डाण केले आणि जवळपास 200 किलोमीटरचे अंतर पार केले, त्यानंतर त्या हवाई दलाच्या तळावर परत आल्या. 17 स्क्वाड्रनचे कमांडिंग ऑफिसर ग्रुप कॅप्टन अमित गेहानी यांनी या विमानाच्या उड्डाणाची धुरा सांभाळली. या उड्डाणादरम्यान राफेलने समुद्र सपाटीपासून सुमारे 15 हजार फूट उंची गाठली तर, सुमारे 700 किलोमीटर प्रति तास वेगाने उड्डाण केले. राष्ट्रपतींचे हे उड्डाण प्रत्येक भारतीयाच्या हृदयात अभिमान, प्रेरणा आणि विश्वासाची नवी भावना जागृत करणारे ठरले आहे. हे उड्डाण संरक्षणाच्या क्षेत्रासोबतच प्रत्येक आघाडीवर नवी उंची गाठणाऱ्या, भारताच्या आत्मनिर्भरतेचे द्योतक ठरले आहे.

संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.




# 8व्या वेतन आयोगातील विचाराधीन विषयांना मान्यता

## रबी हंगामासाठी खत अनुदानालाही मान्यता

**सुमारे 50 लाख कर्मचारी आणि 69 लाख निवृत्तीवेतनधारकांच्या हितासाठी मोठे पाऊल उचलत मंत्रिमंडळाने 8वा केंद्रीय वेतन आयोगअंतर्गत कोणत्या मुद्यांवर विचार केला जाईल, आणि शिफारसी दिल्या जातील, याला मंजुरी दिली. तसेच, अन्नदात्यांच्या हिताच्यादृष्टीने रबी हंगामासाठी खतांवरील पोषक घटक आधारित अनुदान दरांच्या प्रस्तावालाही मान्यता दिली...**

**निर्णय :** 8व्या केंद्रीय वेतन आयोगाचे नियम आणि संदर्भांना मान्यता.

**परिणाम :** केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आणि निवृत्तीवेतनधारकांसाठी स्थापन केलेला वेतन आयोग आता कोणत्या विषयांवर विचार करेल आणि आपल्या शिफारसी सरकारसमोर सादर करेल, याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. जानेवारी 2025 मध्ये 8व्या वेतन आयोगाला मंजुरी देण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई आयोगाच्या अध्यक्ष असतील. आयआयएम बंगळुरुचे प्राध्यापक पुलक घोष हे अंशकालिक सदस्य आणि पेट्रोलियम मंत्रालयाचे सचिव पंकज जैन हे सदस्य सचिव असतील. हा आयोग एक तात्पुरती संस्था असेल आणि स्थापनेच्या दिनांकापासून 18 महिन्यांच्या आत आपल्या शिफारसी सादर करेल. आवश्यकता भासल्यास आयोग आपल्या शिफारसींना अंतिम स्वरुप देण्याशी संबंधित कोणत्याही मुद्यांच्या बाबतीत अंतरिम अहवाल पाठवण्याबद्दलही विचार करू शकतो. आपल्या माहितीसाठी म्हणून, सामान्यतः वेतन आयोगाच्या शिफारसी प्रत्येक 10 वर्षांच्या अंतराने लागू केल्या जातात. या हिशोबाने 8व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारसी साधारणतः पुढच्या वर्षाच्या 1 जानेवारीपासून लागू होण्याची अपेक्षा आहे.

### आयोग शिफारसी करताना अनेक गोष्टी विचारात घेईल

- देशाची आर्थिक स्थिती तसेच राजकोषीय म्हणजेच वित्तीय व्यवस्थेचे व्यवस्थापन तसेच खर्च आणि महसूलात समतोल राखला जावा.
- विकास कामांवरील खर्चासाठी आणि कल्याणकारी उपायांसाठी पुरेशी साधने उपलब्ध असावीत.
- बिगर बिगर अंशादीय अनुवाद निवृत्तीवेतन योजनांची बिगर-वित्तपुरवठा मूल्य.
- राज्य सरकारांच्या वित्तीय स्थितीवर शिफारसींचा संभाव्य परिणाम, याअंतर्गत सामान्यतः काही सुधारणांसह शिफारसी स्विकारल्या जातात.
- सार्वजनिक क्षेत्रातील केंद्रीय उपक्रम आणि खासगी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या मानधनाने विद्यमान स्वरुप, लाभ आणि कामासाठीची परिस्थिती.

**निर्णय :** 2025-26 च्या रब्बी हंगामासाठी फॉस्फेटिक आणि पोटॅशिक खतांवरील पोषक घटक आधारित अनुदान दरांना मंजुरी.

**परिणाम :** डाय अमोनियम फॉस्फेट (डीएपी) आणि एनपीकेएस (नायट्रोजन, फॉस्फरस, पोटाश, सल्फर) ग्रेडसह पीअँडके खतांवर 2025-26 या रब्बी हंगामासाठीचे अनुदान मंजूर केलेल्या दरांच्या आधारावर प्रदान केले जाईल. यासाठी सुमारे 37,952.29 कोटी रुपये इतक्या आवश्यक अर्थसंकल्पीय तरतुदीचा अंदाज आहे. खरीप हंगामाच्या तुलनेत हे प्रमाण सुमारे 736 कोटी रुपयांनी जास्त आहे.

**लाभ :**

- शेतकऱ्यांसाठी अनुदानित, परवडणाऱ्या दरात आणि योग्य किमतींवर खतांची उपलब्धता सुनिश्चित होईल.
- खतांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील किमतींमधील ताज्या किमतींचा विचार करून पीएंडके खतांवरील अनुदानाचे तर्कसंगतीकरण केले गेले आहे.

मंत्रिमंडळाच्या निर्णयांवरील पत्रकार परिषद पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



## विकसित भारताचा सारथी

# सुदृढ बालपण समृद्ध भारत

### बाल कल्याणाचा नवा मार्ग

## ॥ गायन्ति देवाः किल गीतकानि धन्यास्तु ते भारतभूमिभागे ॥

**हा विष्णु पुराणातील श्लोक आहे. ज्याने या भारत भूमीत जन्म घेतला आहे, तो मनुष्य, देवांपेक्षाही अधिक भाग्यवान आहे असे गीत देवताही गात आहेत, असा या श्लोकाचा अर्थ आहे. अशावेळी भारतातील प्रत्येक मूल म्हणजे उज्ज्वल भारताचे स्वप्न आहे. या इवल्याशा डोळ्यांमध्ये जी चमक आहे, तीच येणाऱ्या उद्यासाठीचा प्रकाश आहे. भारत 2047 पर्यंत विकसित भारताचा संकल्प प्रत्यक्षात साकार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, अशा नव्या भारताचे सारथी ही आजची मुलेच होणार आहेत. त्यामुळेच या मुलांच्या मुळांचे भरणपोषण करण्यासाठी केंद्र सरकार मुलांच्या सर्वांगीण विकास - शिक्षण, आरोग्य, सुरक्षा या बाबींना केंद्रस्थानी ठेवून नवीन योजना- धोरणे आखत आहे. याद्वारे प्रत्येक मुलाला उत्तम भविष्याची संधी मिळेल, आणि ते सुदृढ आणि आत्मनिर्भर नागरिक बनेल...**

येत्या 20 नोव्हेंबरच्या जागतिक बाल दिन आणि जागतिक बाल हक्क दिनानिमित्त, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार कशा रितीने मुलांचे म्हणजेच भारताच्या मुळांचे भरण पोषण करत, भविष्यातील भारताच्या पायाला बळकटी देत आहे, हे जाणून घेऊ या.

आपण एका मित्रासोबत बोलत आहात, कोणा पंतप्रधानासोबत नाही.

आज मी पंतप्रधान म्हणून नाही, आपल्या कुटुंबातील एक सदस्य या नात्यानेच आपल्याशी बोलत आहे. आज तुम्हा सर्व मुलांसोबत वेळ घालवताना माझ्या मनाला खूप शांती लाभली.

2023 मध्ये नाताळाच्या निमित्ताने पंतप्रधान निवासात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले गेले होते. या कार्यक्रमात मुलांना 7, लोक कल्याण मार्ग इथले पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान, प्रत्यक्षात पाहण्याची आणि त्याबद्दल माहिती घेण्याची एक अनोखी आणि ज्ञानवर्धक संधी मिळाली. पंतप्रधान मोदींनी मुलांशी गप्पा मारल्या तसेच, त्यांना कधी यापूर्वी पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानाला भेट देण्याची संधी मिळाली होती का याबद्दलही विचारणा केली. त्यावर सगळ्यांनीच 'नाही' असे उत्तर दिले, त्यावर पंतप्रधान मोदी यांनी देखील लागलीच हसत सांगितले की, त्यांची टीम त्यांना पंतप्रधान निवासस्थानाला विशेष फेरफटका घडवून आणतील. मुलांच्या या फेरीबद्दल पंतप्रधानांनी आनंदही व्यक्त केला, “जिज्ञासू लहान पाहुण्यांनी 7, लोक कल्याण मार्गाला दिलेल्या भेटीतून, त्यांना निश्चितच एक रंजक अनुभव घेतला आहे, त्यांचा आनंद आणि कौतुक पाहून वाटते की माझे कार्यालय त्यांच्या अपेक्षांच्या कठीण परीक्षेत यशस्वी ठरले आहे." अशी भावनाही पंतप्रधानांनी व्यक्त केली.

एका छोट्या मुलाने चित्र काढून आणले आहे, कधीपासून उभा आहे, त्याचे हात दुखत असतील, कोणीतरी जरा ते घ्या, लहान मुल आहे, शाब्बास बाळा. चला, बाळा तुझे चित्र मिळाले आहे, रडण्याची गरज नाही बाळा. जर तुझा पत्ता त्यात लिहिला असेल, तर मी तुला जरूर पत्र लिहीन. मित्रांनो, या छोट्या छोट्या मुलांचे प्रेम, जीवनात यापेक्षा मोठी संपत्ती काय असू शकते?

मुलांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अशा प्रकारचा आत्मीय जिव्हाळा अनेक वेळा दिसून येतो. जेव्हा केव्हा त्यांना मुलांसोबत वेळ घालवण्याची संधी मिळाली आहे, तेव्हा ते



मुलांसोबत गप्पांमध्ये इतके रमून जातात की त्यांचे मित्र बनून सहजतेने त्यांच्याशी गप्पा मारतात. ते कायम मुलांसोबत मजा - मस्करी करतानाही दिसतात. मुलांमध्ये ते लगेचच मिसळतात. दोन वर्षांपूर्वी त्यांनी एक व्हिडीओ सामाईक केला होता, ज्यात ते दोन मुलांसोबत खेळताना दिसले होते. दोन्ही मुलांचे डोकं पकडून, ते एकमेकांशी लढवत खेळत होते. त्यांच्या कपाळावर नाणे चिकटवत होते. कपाळावर नाणे चिकटवण्याची युक्ती मुलांना शिकवत होते. पंतप्रधान मोदींनी या व्हिडीओसोबत लिहिले होते की, 'मुलांसोबत घालवलेले काही संस्मरणीय क्षण.' गेल्या 11 वर्षांतील पंतप्रधान मोदी यांची मुलांसोबतची सहजता, आपल्याला कधी राखी बांधताना तर कधी बाल वाटिकेत मुलांसोबत बालपणाशी संबंधित गप्पा, आणि परीक्षा पे चर्चांच्या वेळेस देखील पाहायला मिळालीच आहे. या सर्व घटना म्हणजे, या देशाचे नेतृत्व भावी पिढीच्या मुळांचे भरण पोषण करण्यासाठी कशा प्रकारचे काम करत आहे, त्याचीच निदर्शक आहेत. कधी मुलांच्या प्रतिभा समाज माध्यमांवरून सामायिक करणे, पत्र लिहिणे, लहान मुलांसोबत बालपण जगणे, त्यांच्या मुलांसोबतच्या या अशा नात्यातून, भारताच्या भविष्याची त्यांना किती काळजी आहे हेच दिसून येते.

खरे तर, प्रत्येकाला लहान मुल व्हायला आवडते. लहान मुलांच्या रुपात निरागसता आणि ऊर्जेचा जो अनुभव येतो, तो अनोखा असतो. त्याची कशासोबतच बरोबरी केली जाऊ शकत नाही. खरे तर परमेश्वराने लहान मुलांना एक आगळीच शक्ती दिली आहे. लहान मुलांमध्ये अहंभाव नसतो आणि म्हणूनच लहान मुलांना आपली चूक सुधारण्यात फारसा त्रासही होत नसतो. बाल मन अगदी मातीच्या कच्च्या भांड्यासारखेच असते, त्याला जी दिशा मिळते, ते तसा आकार घेते. अशावेळी बालपणाला राष्ट्राची संपत्ती मानत, त्यांचे भरण पोषण करण्याच्या दूरदृष्टीने मुलांना शिक्षण- कौशल्य, सुरक्षा आरोग्य, आणि पोषणाच्या नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

# अंगणवाडी केंद्र रचला जात आहे भविष्याचा पाया

- अंगणवाडीत 6 महिन्यांपासून 6 वर्षांपर्यंतच्या मुलांना पौष्टिक आहारासोबत 3 ते 6 वर्षांपर्यंतच्या मुलांना शिक्षणही दिले जात आहे.
- सुमारे 14 लाख अंगणवाडी सेविका, सुमारे 12 लाख मदतनीस यांच्या मदतीने एकूण 7,075 प्रकल्प राबवले जात आहेत.
- या केंद्रांमध्ये एलईडी स्क्रीन, आरओ पाणी शुद्धीकरण यंत्र, स्मार्ट शिक्षणा पासून ते मुलांच्या निगा राखण्यासाठी सामग्री, दृकश्राव्य साधने, मुलांकरता शिक्षणस्नेही उपकरणे आणि पोषण वाटिका या आणि अशा सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

18 सप्टेंबर 2025 पर्यंत 75,642 अंगणवाडी केंद्रांचे अद्ययावतीकरण करून, त्यांना सक्षम अंगणवाड्यामध्ये परावर्तीत केले आहे.

आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये दोन लाख अंगणवाडी केंद्रांचे अद्ययावतीकरण करून त्यांना सक्षम अंगणवाड्यामध्ये परावर्तीत करण्याचे लक्ष्य आहे.

**अंगणवाडी केंद्रांमध्ये उपलब्ध सुविधा**

10,75,063 केंद्रांवर शौचालय तसेच पोषण आणि प्रधानमंत्री मुद्रा योजनेसाठी नोव्हेंबर 2025 पासून

1515 हा नवीन हेल्पलाईन क्रमांक जारी झाला, हा क्रमांक विद्यमान 14408 च्या ऐवजी सुरु करण्यात आला आहे.

**9,48,561**
केंद्रांमध्ये स्वयंपाकघराची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

**9,16,505**
केंद्रांमध्ये विजेची कायमस्वरूपी आणि 76,844 केंद्रांवर सौर व्यवस्थेच्या माध्यमातून विजेची सोय उपलब्ध करून दिली आहे.

**12,80,217**
केंद्रांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा. 9.67 लाख केंद्रांमध्ये नळाद्वारे पाणी.







बालपण ही राष्ट्राची संपत्ती मानत पोषण करण्याच्या दूरदृष्टी मुळे बालकांना शिक्षण-कौशल्य, संरक्षण, आरोग्य आणि पोषणाच्या नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी, त्यांची मानसिक दृष्ट्या खंबीर बनवण्यासाठी आणि त्यांना आयुष्यातील मोठी उद्दिष्टे साध्य करण्याकरिता प्रेरणा देऊन प्रोत्साहित करण्यासाठी पंतप्रधान मोदी स्वतः सदैव तत्पर असतात. परीक्षा पे चर्चा दरम्यान आपुलकीने तासनतास त्यांनी मनापासून केलेल्या चर्चा नवीन ऊर्जा बहाल करतात. केंद्र सरकार आज शिक्षण आणि क्रीडा ते आरोग्यापर्यंत सर्वच क्षेत्रात मुलांच्या पाठीशी उभे आहे. आज भारतीय मुलांची प्रतिभा जगाला चकित करते आणि त्याच मुलांची ऊर्जा राष्ट्राला एक नवीन दिशा प्रदान करीत आहे. मुलांबाबतच्या पंतप्रधानांच्या आत्मीयतेमुळे धोरणे आणि योजना गांभीर्याने अंमलात येत आहेत.माता आणि मुलांचे संरक्षण करण्यासाठी पोषण मोहिमेपासून ते संस्थात्मक प्रसाराला प्रोत्साहन देण्यात येत आहे. बालकांच्या लसीकरणासाठी मिशन इंद्रधनुष्य ढालीसारखे सज्ज आहे. केंद्र सरकारच्या उपक्रमामुळेच शालेय शिक्षणात गुणात्मक सुधारणा झाल्या आहेत. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यात आले आहे. खेळाच्या मैदानांपासून संशोधनापर्यंत, व्यवसाय आणि स्टार्ट अप्स पासून ते नोकरी आणि स्वयंरोजगारा पर्यंत केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजना प्रत्येक पावलावर मुलांसोबत आहेत.

### मुले उद्याच्या विकसित भारताचे वाहक

एकीकडे एक माता असते जी आपल्या मुलाला सर्व सुखसोयी आणि आराम देऊ इच्छिते. राष्ट्राचे बालपण आणि जीवन सातत्य जोपासण्यात राष्ट्र आता मग्न आहे. भारतातील प्रत्येक मूल स्वप्नांची, जिज्ञासेची आणि भविष्याची एक गाथा आहे. या चिमुकल्यांच्या डोळ्यांमध्ये झळकती आशा, उद्याच्या भारताची ओळख आहे. भारत आज एका ऐतिहासिक परिवर्तनकारी सुधारणांच्या पर्वामधून जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या शतकपूर्ती निमित्त वर्ष 2047पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा देशासमोर ठेवलेला संकल्प हे केवळ एक उद्दिष्ट नाही तर राष्ट्रीय चैतन्याचे प्रतीक आहे. हे एक असे स्वप्न आहे ज्यामध्ये भारत स्वावलंबी, समृद्ध, बलवान आणि सर्वसमावेशक विकासाचे प्रतीक म्हणून उदयास यावा. हे स्वप्न प्रत्यक्षात आणणे .....

## आयुष्याचे सुरक्षा चक्र

## जन्माच्या आधी आणि जन्मानंतर सुद्धा

- गर्भधारणेपासून ते अंदाजे 2वर्षांपर्यंतच्या (पहिले 1हजार दिवस) मुलांना प्राधान्य देऊन कुपोषणाच्या पिढ्यानपिढ्या अविरत चालत राहिलेल्या चक्राला खीळ घालणे हे पोषण अभियानाचे उद्दिष्ट आहे. गरिबी आणि लिंगभेद यांसारख्या समस्यांचा सामना करण्यास देखील ते मदत करते.
- दरवर्षी सप्टेंबर मध्ये साजरा केला जाणारा पोषण महिना #Local4Poshan यासारख्या मोहिमांद्वारे मुलांमध्ये वाढ खुंटणे, कुपोषण, ॲनिमिया आणि जन्मतः कमी वजनाच्या समस्या सोडवण्यासाठी प्रभावी आहे .
- पोषण मोहीम केवळ कमी वजनाच्या बालकांसाठी नाही तर ती जास्त वजन असलेल्या मुलांसाठी देखील आहे. भारत कुपोषणा विरुद्ध लढा देत आहे.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस)-5 (2019-21) नुसार

राष्ट्रीय स्तरावर 5वर्षांहून कमी वयोमानाच्या अधिक वजन असलेल्या मुलांची टक्केवारी




**72.22** लाखाहून अधिक गर्भवती महिलांनी मिशन पोषण 2.0अंतर्गत जुलै 2025 पर्यंत लाभार्थी म्हणून नोंदणी केली

**प्रधानमंत्री मातृ वंदना योजना**

**4.05** कोटीहून अधिक लाभार्थ्यांना जुलै 2025पर्यंत मातृत्व लाभ प्रदान करण्यात आले



प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत गर्भवती महिलांची दर महिन्याच्या 9 तारखेला एका निश्चित दिवशी डॉक्टरांकडून मोफत, सुरक्षित आणि दर्जेदार प्रसूतीपूर्व तपासणी केली जाते

- आर्थिक व्यवहारांबाबत मंत्रिमंडळ समितीने (सीसीईए) 2021-22ते 2025-26पर्यंत पीएम पोषण योजना सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे. माध्यान्ह भोजन योजनेचा लाभ शासकीय तसेच सरकारी अनुदानप्राप्त शाळांमधील इयत्ता 1 ते 8पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना दिला जातो.
- देशभरातील 11.20लाख शाळांमध्ये शिकणाऱ्या अंदाजे 11.80कोटी विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होईल. सध्या पोषण ट्रॅकर वर14,02,248अंगणवाडी केंद्रे आणि 9,14,75,640पात्र लाभार्थी पोषण ट्रॅकर वर नोंदणीकृत आहेत आणि ही संख्या दररोज वाढत आहे.
- कुपोषणाचा सामना करण्यासाठी 26डिसेंबर 2024रोजी सुपोषित पंचायत योजना सुरू करण्यात आली.

# एक पालक

## या रूपात मार्गदर्शन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी



जेव्हा दृष्टिकोन दीर्घकालीन असतो आणि राष्ट्र प्रथम ही मानसिकता असते तेव्हा भावी पिढी तयार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी पालकांसारखे मुलांना मार्गदर्शन करतात. गेल्या 11वर्षात भावी पिढ्यांना सशक्त बनवत आणि त्यांची मुले मजबूत व्हावीत या दृष्टीने ते अनेक प्रसंगात पालक या रूपातदिसले आहेत.

### पोषणापासून ते उत्कर्षापर्यंत

मुलांनी हंगामी फळे खावीत आणि जंक फूड, तेलकट पदार्थ आणि मैद्यापासून बनवलेले पदार्थ टाळावे. जेवण योग्यरित्या ग्रहण करण्यापूर्वी आणि गिळण्याआधी किमान 32वेळा चावून घ्यावे. मुलांनी पाणी पिताना ते लहान लहान घोटात प्यावे आणि त्याचा आस्वाद घ्यावा.

### कधी काय आणि कसे खावे

मानवी शरीरासाठी सूर्यप्रकाश खूप महत्त्वाचा आहे. लहान बालकांना दररोज थोडा वेळ सूर्यप्रकाशात राहण्याची सवय लावावी. सूर्योदयानंतर लगेचच त्यांना एका झाडाखाली उभे करून त्यांनी दीर्घ श्वसन करायला लावणे. जीवनात प्रगतीसाठी व्यक्ती काय , कसे , कधी आणि काय खाते यावर पोषणाचे महत्व अवलंबून असते .

### दबावावर मात करणे

समाजात अशी एक खोलवर रुजलेली धारणा आहे की परीक्षेत कमी गुण मिळणे म्हणजे आयुष्य वाया घालवण्यासारखे आहे. क्रिकेट सामन्यात फलंदाजाने एकाग्रतेने चेंडूतटवल्याचे उदाहरण देत पंतप्रधान मोदी म्हणाले की मुलांनी फलंदाजाप्रमाणे बाह्य दबाव टाळावा आणि केवळ त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. परीक्षा आयुष्यात सर्व काही नसते. पुस्तके वाचली पाहिजेत, परंतु शक्य तितके ज्ञान मिळवण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

## स्वतःलाआव्हान द्या

आत्मपरीक्षण करा, स्वतःला काळजीपूर्वक विचारा की काय बनू शकता, काय साध्य करू शकता आणि कोणते काम केल्याने समाधान प्राप्त होऊ शकते. आत्मविश्वास वाढवण्यासाठी आणि कामगिरीच्या पूर्ततेचा आनंद प्राप्त करण्यासाठी10किलोमीटर सायकल चालवण्यासारख्या छोट्या छोट्या उद्दिष्टांसह स्वतःला आव्हान द्या. स्वतःशी स्पर्धा केल्याने अतूट आत्मविश्वास वाढतो तर दुसऱ्या सोबत आपली तुलना केल्याने पदरी निराशा पडू शकते.



## नेतृत्वाची कला

नेता तो असतो जो इतरांसाठी एक उदाहरण प्रस्थापित करून नेतृत्व करतो. यासाठी स्वतःमध्ये परिवर्तन घडवावे लागेल आणि त्याचे प्रतिबिंब वर्तनातही पडणे आवश्यक असते. नेतृत्व लादले जाऊ नये तर तुमच्या सभोवताच्या लोकांकडून ते स्विकारले गेले पाहिजे.

## पुस्तकांच्या पलीकडे 360अंश विकास

विद्यार्थी हे यंत्रमानव नाहीत. शिक्षण हे फक्त पुढच्या इयत्तेत जाण्याबद्दल नाही तर ते सर्वांगीण वैयक्तिक विकासासाठी आहे. आरंभीच्या शालेय शिक्षणात बागकामासारखे धडे अव्यवहार्य वाटू शकतात परंतु ते सर्वांगीण विकासात योगदान देतात.

## अपयश हेच इंधन

जर 30- 40 %विद्यार्थी 10व्या किंवा 12व्या इयत्तेतअनुत्तीर्ण जरी झाले तरीदेखील तिथे काही आयुष्याचा शेवट नसतो. अपयशाला आपला शिक्षक बनवा. जसे क्रिकेटमध्ये खेळाडू आपल्या चुकांचे परीक्षण करतात.

## सकारात्मकता शोधणे

इतरांमधील सकारात्मक गुणांवरजसे की चांगले गाणेकिंवा नीटनेटके कपडे घालणे यावर चर्चा व्हायला हवी. हा दृष्टिकोन खरी आवड निर्माण करतो आणि परस्पर ताळमेळवाढवतो. लेखनाची सवय विकसित करा कारण ज्यांना लेखनाची सवय लागते ते आपले विचार प्रभावीपणे व्यक्त करू शकतात.

## वैशिष्ट्याचाशोध घ्या

एका मुलाला शिक्षणात लक्ष नसल्याने शाळेतून काढून टाकण्यात येणार होते, परंतु त्याने एका टिंकरिंग प्रयोगशाळेत उत्कृष्ट कामगिरी केली आणि रोबोटिक्स स्पर्धा जिंकून आपल्यातल्या अनोख्या कौशल्याचे प्रदर्शन घडवून आणले.हे सामर्थ्य ओळखणे आणि त्याला प्रोत्साहन देणे ही शिक्षकाची भूमिका आहे .

## वेळ-आयुष्यावर नियंत्रण असावे

वेळेचे भान ठेवा, विशिष्ट काम ठरवून घ्या आणि त्यात दर दिवशी प्रगतीचे परीक्षण करा. आव्हानात्मक विषयांपासून पळ काढण्याऐवजी त्यावर लक्ष केंद्रित करा. सर्वात आधी असा विषय निवडा जो आपल्याला कठीण वाटतो आणि त्याचा जोमाने सामना करा.

## वर्तमानात जगा

आयुष्यातील सर्वात मौल्यवान गोष्ट वर्तमान क्षण आहे. तो एकदा निघून गेला की तो संपून जातो मात्र जर तो पूर्णपणे जगला गेला तर तो आयुष्याचा एक भाग बनून राहतो.

## सामायिक करण्याची शक्ती

अलिप्त राहण्याची समस्या नेहमी कुटुंबापासून तटस्थ आणि हळूहळू सामाजिक हितसंबंधा पासून दूर झाल्यानं सुरु होते. अंतर्गत संघर्ष वाढू नये म्हणून एखाद्याने स्वतःचे मत खुलेपणाने व्यक्त केले पाहिजे. कुटुंबातल्या सदस्यांबरोबरमुक्त संवाद दबाव कमी करणाऱ्या वॉल्व प्रमाणे काम करतो.

## आपल्यातील आवडी निवडींचे अनुसरण करा

आपल्या बालकांना प्रत्येक ठिकाणी फक्त आदर्श या स्वरूपात सादर करू नका. तर त्यांच्या विशेष बाबींवर प्रेम करा आणि त्याचा स्विकार करा. प्रत्येक बालकात अनोखी प्रतिभा वास करते. आई वडिलांनी आपल्या मुलातील विशेषत्व ओळखून त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.

## थांबवा, प्रतिबिंबित करा, रिसेट करा

प्राणायामासारखेश्वसनाचे व्यायाम एका अनोख्या पद्धतीचे ऊर्जा उत्पन्न करू शकतात, ज्यामुळे चिंतेवर नियंत्रण ठेवायला मदत मिळते. पंतप्रधान मोदी यांनी दोन्ही नाकपुड्यांमधून श्वास घेण्यात संतुलन साधण्याचे एक तंत्र सांगितले . त्यामुळे काहीच सेकंदात शरीरावर नियंत्रण मिळवता येऊ शकते.

# देशात 35 कोटी मुले

संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी ( युएनएफपीए) नुसार भारतात 0 ते 14 वर्षे वयोगटातील लोकसंख्या सुमारे 24 टक्के आहे. याचा अर्थ देशात 35 कोटी मुले आहेत ज्यांचे वय 14 वर्षांपर्यंत आहे.

## पोषणा बरोबरच शिक्षण देखील

- 10 मे 2023 रोजी पोषणा बरोबरच शिक्षण देखील कार्यक्रम सुरू करण्यात आला. अंगणवाडी केंद्रांमध्ये पौष्टिक आहार देण्याबरोबरच शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे हा यामागील उद्देश होता.
- या कार्यक्रमानुसार दोन अभ्यासक्रमांची सुरुवात झाली नवचेतना आणि आधारशीला



- नवचेतना जन्मापासून ते 3 वर्षापर्यंतच्या बालकांसाठी बालपणातील सुरुवातीच्या कालखंडाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय कार्यक्रम चालवला जात आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जीवनातील आरंभीच्या तीन वर्षात मेंदूचा विकास आणि महत्त्वावर व्यापक माहिती उपलब्ध करून देण्यात येते.
- आधारशीला 3 वर्षांपासून ते 6 वर्षांपर्यंतच्या बालकांसाठी प्रारंभिक बालपणातील सुरुवातीच्या कालखंडामधील निगराणी आणि शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. 3 ते 6 वर्ष वयोगटातल्या सर्व बालकांसाठी प्रारंभिक शिक्षणातल्या गुणवत्तेत सुधारणा आणि सर्वांना शिक्षणाचे महत्त्व आणि इतर क्रिया कलापांद्वारे शिक्षणाला प्राधान्य देणे.




करण्यामागची खरी ताकद आणि त्याचे वाहक आहेत-आजची मुले, जी उद्याच्या भारताचे निर्माते आणि सारथी बनतील. पंतप्रधान मोदी यांचे विचार केवळ वर्तमानापुरते मर्यादित नाहीत. ते दीर्घकालीन दृष्टीकोनासह भारताच्या सशक्त पायाबाबत विचार करत आहेत. त्यांचा असा विश्वास आहे की जर देशातील मुलांना योग्य मार्गदर्शन, शिक्षण आणि संधी दिल्या गेल्या तर ते केवळ त्यांचे जीवन उंचावू शकत नाहीत तर संपूर्ण राष्ट्राला एक नवीन दिशा देऊ शकतात. प्रत्येक मुलामध्ये प्रचंड ऊर्जा, कल्पनाशक्ती आणि नवोन्मेषाची क्षमता असते. ही क्षमता भारताला 21व्या शतकात ज्ञान आणि तंत्रज्ञानाची महासत्ता बनवू शकते.

भारत जेव्हा स्वातंत्र्याची 100 वर्षे साजरी करेल तेव्हा आज 10वर्षांचा असलेला मुलगा 32 वर्षांचा असेल, हे सर्वज्ञात आहे. याचा अर्थ असा की देशाचे नेतृत्व, नवोन्मेष आणि उद्योग विश्वाची जबाबदारी त्याच्या खांद्यावर असेल. म्हणूनच, पंतप्रधान मोदींच्या योजना केवळ आजच्या काळासाठी नसून पुढील 25 वर्षांच्या दृष्टिकोनावर आधारित आहेत. म्हणूनच प्रत्येक मंचावरून ते भारतीय मुलांनी स्वावलंबी व्हावे आणि त्यांच्या क्षमतांवर विश्वास ठेवावा असा संदेश देतात

किशोरवयीन मुलींना कौशल्य प्रशिक्षण देऊन बनवले जात आहे स्वावलंबी महिला आणि बालविकास मंत्रालयातर्फे 27राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 218जिल्ह्यांत मिशन सक्षम अंगणवाडीच्या मदतीने 14 ते 18 वर्षे वयोगटातील

## किशोरवयीन मुलींसाठी कार्यक्रम राबवले जात आहेत.

- पौष्टिक आहार देण्याबरोबरच प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेद्वारे त्यांच्या कौशल्यात देखील वाढ केली जात आहे. त्यांना रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी तयार करणे हे यामागचे उद्दिष्ट आहे.
- 19 राज्यांमधील 27 जिल्ह्यांत 14 ते 18 वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी विशेष पथदर्शीकौशल्य कार्यक्रम







19 सप्टेंबर 2025 पर्यंत एकूण **6,263** किशोरवयीन मुलींना यासाठी तयार केले

### अंगणवाडी पासून शाळेपर्यंत - एक परिसर, एक स्वप्न

- एकाच परिसरात अंगणवाडी केंद्रे आणि शाळांचे असे प्रारूप जे बालपणातील सुरुवातीच्या कालखंडातील निगराणी आणि शिक्षण (ईसीसीई) वर लक्ष केंद्रित करते. 2.9 लाखांहून अधिक अंगणवाडी केंद्रे शाळेच्या परिसरात स्थित आहेत.



आणि जागतिक नागरिक बनण्याच्या दिशेने पावले उचलला.

पंतप्रधान मोदी यांची मुलांप्रतिविशेष आस्था सर्वांनी पाहिली आहे. मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच राष्ट्राची खरी ताकद आहे असा संदेश ते प्रत्येक वेळी देतात. मुलांना ते देशाची संपत्तीआणि भविष्याचे सारथी असे संबोधतात. पंतप्रधान मोदींचे मुलांशी असलेले नाते केवळ भावनिक नाही तर धोरणात्मक पातळीवरही खोलवर रुजलेले आहे. अशाच प्रयत्नामुळे खेळण्यांच्या क्षेत्रातील स्वयंपूर्णतेच्यामोहिमेने एक मोठी संधी निर्माण केली. आज खेळणी स्वयंपूर्णतेचा एक महत्त्वाचा आधार बनली आहेत. भारत आता पारंपरिक खेळणी बनवून मुलांना परंपरेशी जोडत आहे. भारत आता विक्रमी प्रमाणात खेळण्याचीनिर्यात देखील करत आहे.

### लहान मनांची स्वप्ने होत आहेत साकार

पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारत एका नव्या युगाच्या उंबरठ्यावर आहे. पण हे कोणत्याही एका सरकार किंवा धोरणाने नव्हे तर आज हाती पेन्सिल धरून उद्या भारताचे भाग्य लिहीणाऱ्या कोट्यावधी लहान हातांनी घडविले जाईल. पंतप्रधान मोदींची मुलांवर असलेली आपुलकीवजा आस्था कोणापासून लपलेली नाही. ते त्यांना केवळ देशाचे भविष्यच नव्हे तर वर्तमानाचा पाया देखील मानतात. त्यामुळेच, बालकल्याण, शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकास हे प्रत्येक प्रमुख सरकारी उपक्रमात केंद्रस्थानी समाविष्ट केले जातात. मग ते पोषण अभियान असो, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण असो, बेटी बचाओ- बेटी पढाओ असो किंवा प्रत्येक मुलाला तंत्रज्ञानाशी जोडणाऱ्या डिजिटल मोहिमेचे स्वप्न असो.

भारताच्या उज्वल भवितव्यासाठी मुलांचे जीवन सुधारणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. हे साध्य करण्यासाठी विखुरलेल्या योजना एकत्रित करून प्राधान्य क्रमाने मिशन मोड मध्ये अंमलात आणल्या जात आहेत. पाण्याची समस्या असो, औषधांची समस्या असो किंवा शारीरिक असो, पोषण मोहिमा समग्र दृष्टिकोनातून राबवल्या जात आहेत. मिशन इंद्रधनुषनच्या माध्यमातूनलसीकरण वाढवण्याला गती दिली आहे. मातृवंदना योजनेत मातांनाआर्थिक मदत, स्वच्छ भारत अभियानात शौचालयांचे बांधकाम, उज्वला योजनेत स्वयंपाकाचा गॅसची सुविधा

## संयुक्त राष्ट्र

## जागतिक बालदिन

- जागतिक बालदिनाची स्थापना सर्वप्रथम 1954मध्ये सार्वत्रिक बालदिन म्हणून करण्यात आली. दरवर्षी 20नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय एकता वाढविण्यासाठी, जगभरातील मुलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांच्याकल्याणातसुधारणेसाठी हा दिवस साजरा केला जातो.
- 20नोव्हेंबर हा एक महत्त्वाचा दिवस आहे कारण 1959मध्ये याच दिवशी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने बाल हक्कांचा जाहीरनामा स्विकारला होता. 1989मध्ये या दिवशी संयुक्त राष्ट्रांच्या सर्वसाधारण सभेने बाल हक्कांसाठी अधिवेशन आयोजित केले होते. 1990पासून जागतिक बालदिनाच्या निमित्ताने त्यांचा वर्धापन दिनही साजरा केला जातो.

### 'कीर्ती'च्या माध्यमातून क्रीडा प्रतिभेची ओळख

खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन (कीर्ती) ही 9ते 18वर्षे वयोगटातील मुलांमधील क्रीडा प्रतिभा ओळखण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू केलेला एक उपक्रम आहे.

- खेलो भारत धोरण- 2025नुसार शालेय आणि विद्यापीठ या स्तरावरच तरुण क्रिडा प्रतिभेची ओळख पटवण्यासाठी आणि त्यांची जोपासना करण्यासाठी एक व्यापक चौकट राबवते ज्यामध्ये खेळांना शिक्षणव्यवस्थेत समाविष्ट केले जाते.ते बालपणापासूनच शारीरिक साक्षरतेला एक मुख्य घटक म्हणून मान्यता देते.आजीवन तंदुरुस्तीला प्रोत्साहन देण्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने हे राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) 2020ला अनुरूप आहे.

**174** प्रतिभा मूल्यांकन केंद्र देशभरात आहेत





# बाल लसीकरण मोहीम

## ज्यामुळे आजारांपासून बचाव केला जाऊ शकेल

बालकांच्या राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमा अंतर्गत12प्रकारच्या विविध आजारांपासून संरक्षण करण्यासाठी मोफतलसी दिल्या जातात

बालके आणि गर्भवती महिलांना लस देण्यासाठी जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात साप्ताहिक स्वरूपात नियमित लसीकरण सत्र आयोजित केली जातात

कमी लसीकरण व्याप्ती असलेल्या क्षेत्रात व्यापक लसीकरण कार्यक्रमाच्या अनुषंगाने विशेष कॅच-अप लसीकरण मोहीम, सखोल मिशन इंद्रधनुष चालवण्यात आले ज्यामुळे याआधी राहून गेलेल्या आणि लसीकरण अर्ध्यावरच सोडलेल्या बालकांचे लसीकरण केले जाऊ शकेल

पल्स पोलिओ कार्यक्रमा चा एक भाग म्हणून राष्ट्रीय लसीकरणदिनासारखी विशेष लसीकरण मोहीम प्रत्येक वर्षी चालवण्यात येते

वर्ष 2013पर्यंत राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात केवळ 6लसी होत्या तर वर्ष 2014मध्ये सहा आणखी नवीन लस्सी यात जोडण्यात आल्या.



### खालीलआजारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी बालकांना लसी दिल्या जातात

- हेपेटायटिस बी लस
- मुखावाटे पोलिओ लस (ओपीव्ही)
- बॅसिलस कॅल्मेट गुएरीन लस (बीसीजी)
- पोलिओ लस इंजेक्शन (आयपीव्ही)
- पेंटाव्हॅलेट लस
- रोटा व्हायरस लस (आरव्हीव्ही)
- न्यूमोकोकल कंजुगेट (पीसीव्ही)
- खरुज आणि गोवर लस(एम आर)
- डिप्थीरिया,पेर्टुसिस टिटॅनस लस (डीपीटी)
- टिटॅनस आणि वयस्क डिप्थीरिया लस (टीडी)
- जपानी एनसेफलायटीस लस (जेई)

नळाद्वारे स्वच्छ पाण्याची उपलब्धता हे निरोगी राष्ट्राच्या दिशेने एक मोठे सामाजिक पाऊल आहे. या दृष्टिकोनाचाअंगिकार करत निरोगी राष्ट्र निर्माण करण्याची मोहीम सुरूच आहे कारण देशातील मुलांना सक्षम बनवल्याने देशाचेभविष्य सक्षम होईल.

पंतप्रधान मोदींची ही दूरदृष्टी याचे प्रमाण आहेकी विकसित भारत केवळ इमारती किंवा प्रकल्पांद्वारेच नव्हे तर त्या बालमनांतून होईल ज्यांच्यात स्वप्ने पाहून ती प्रत्यक्षात आणण्याची क्षमता आहे. आजची मुलेच उद्याच्या विकसित भारताचे सारथी आहेत कारण त्यांच्या हातीच नवीन ऊर्जा, नवीन विचार आणि नवीन भारताची सूत्रे असतील. पंतप्रधान मोदींची हीच प्रेरणा आहे की प्रत्येक मुलाने आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवावा, मोठी स्वप्ने पहावीत आणि तीपूर्ण करण्याचे धाडस अंगी बाळगावे. याच विश्वासाने भारत आज पुढे जात आहे जिथे प्रत्येक मूल त्याच्या स्वप्नातील भारत बनवेल आणि प्रत्येक स्वप्न विकसित भारताची ओळख बनेल.



# बालमृत्यू दरात झाली लक्षणीय घट

## संयुक्त राष्ट्र आंतर-संस्था समूहाच्या

(यूएन आय जी एम ई 2024) अहवालानुसार

भारतामध्ये 5 वर्षांखालील मुलांच्या मृत्यूदरात

**78 %**

टक्क्यांनी घट झाली आहे....1990 ते 2023 या कालावधीत. त्याचवेळी जागतिक स्तरावर ही घट 61 टक्के इतकी नोंदवली गेली.



नवजात अर्भकांच्या मृत्यूदरातही उल्लेखनीय घट दिसून आली.

**70 %**

टक्क्यांची ही घट.... या कालावधीत झाली आहे, तर याच वेळी जागतिक पातळीवरील घट फक्त 54 टक्क्यांपर्यंत मर्यादित राहिली आहे.

## नवजात शिशू आणि बालमृत्यू दर

प्रति 1,000 जन्मलेल्या आणि जीवित असलेल्या :




**2.6** कोटी बालकांचे दरवर्षी, सर्वसमावेशक लसीकरण कार्यक्रमांतर्गत संपूर्ण लसीकरण केले जाते.

**94 %** मुलांचे संपूर्ण लसीकरणपूर्ण.

**पाळणाघर**

**28,783**

लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ, फेब्रुवारी 2025 पर्यंत मिळाला आहे.

या योजनेचे उद्दिष्ट म्हणजे 6 महिने ते 6 वर्षे वयोगटातील मुलांना सुरक्षित आणि संरक्षित वातावरणात गुणवत्तापूर्ण 'क्रेच'(बालसंगोपन केंद्र) सुविधा, पोषण सहाय्य, मुलांच्या आरोग्य आणि विकासाची काळजी तसेच लसीकरणाची सुविधा प्रदान करणे होय. महिला कमावती असो वा नसो, 'पालना'अर्थात पाळणाघर योजने अंतर्गत क्रेच सुविधा सर्व मातांना उपलब्ध करून दिल्या जातात.

**बालकांविषयी मदत संपर्क क्रमांक**

मिशन वात्सल्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार, देशातील सर्व 36 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली कार्यरत

**112** वर संपर्क साधून त्वरित सहाय्य मिळवता येते.

**689** जिल्ह्यांमध्येसध्या ही प्रभावी काम करत आहे.

### शिक्षण – भविष्याची भक्कम पायाभरणी

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राचा कणा असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे सत्य मुळापासून जाणले आणि त्या दृष्टीनेच 2020 मध्ये नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) देशाला समर्पित केले. हे धोरण फक्त पाठ्यपुस्तके आणि परीक्षा यापुरते मर्यादित नाही,तर ते मुलांच्या सर्वांगीण विकासाचे साधन आहे. या धोरणात घोकंपट्टी ऐवजी मूळ संकल्पना समजून घेणे, विचार करणे आणि नवसर्जन यांना प्राधान्य दिले आहे.आता मुले

"मुले तंदुरुस्त असावीत – त्यांचे वजन, उंची आणि एकूण आरोग्य उत्तम असावे – अशा सर्व बाबींवर सर्वंकष दृष्टिकोनातून लक्ष केंद्रित करायला हवे...आणि पोषणाच्या क्षेत्रात आपल्याला जगासमोर अभिमानाने सांगता आले पाहिजे की – हो, आम्ही हे साध्य केले आहे! अशी हसरी, खेळती आणि आनंदी बालके प्रत्येक क्षणी आपल्या आजूबाजूला दिसायला हवीत- अशी स्थिती आपण निर्माण केली पाहिजे."

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

आपल्या आवडीनुसार विषयांची निवड करू शकतात, प्रयोगांच्या माध्यमातून शिकू शकतात आणि डिजिटल मंचांचा उपयोग करुन जगभरातील ज्ञान मिळवू शकतात. हे शिक्षण धोरण, भारतातील मुलांना फक्त नोकरी शोधणारे नव्हे, तर नवोन्मेष आणि रोजगारनिर्मिती करणारे नागरिक बनवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टीकोन स्पष्ट आहे —"प्रत्येक भारतीय मुलाने, आत्मविश्वासपूर्ण असावे, आपल्या संस्कृतीच्या मुळांना धरुन रहावे, आणि जागतिक स्तरावर भारताचा गौरव वाढवावा."

फक्त शिक्षण आणि ज्ञानसंपदा पुरेशी नाही — कौशल्य असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. आता हे घटक अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग बनवण्यात आले आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य संधी मिळू शकतील. प्राथमिक शिक्षणातही मातृभाषेला प्रोत्साहन देण्याचे काम सुरू झाले आहे. या दिशेने 'विद्या प्रवेश' कार्यक्रमाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पूर्वी अंगणवाडी (प्ले स्कूल) ची संकल्पना फक्त मोठ्या शहरांपुरती मर्यादित होती. पण 'विद्या प्रवेश'मुळे आता ती अतिदुर्गम दूरच्यावस्ती, वाड्या आणि गावांतील शाळांपर्यंत पोहोचत आहे. म्हणजेच, देशाच्या कोणत्याही कोपऱ्यातील मुलगा — मग तो श्रीमंत घरातील असो अथवा गरीब घरातील, त्याचे शिक्षण आता हसत-खेळत होणार आहे. ज्यावेळी शिक्षणाची सुरुवात हास्य फुलत होईल, त्यावेळी यशाचा मार्गही सहज मोकळा होईल. आज देशात सुमारे 3 लाखांहून अधिक विद्यार्थी असे आहेत, ज्यांना शिक्षणासाठी सांकेतिकभाषेची-खाणाखुणांच्या भाषेची आवश्यकता असते.

हे लक्षात घेऊन, भारतीय संकेत भाषेला प्रथमच स्वतंत्र भाषा विषयाचा दर्जा देण्यात आला आहे. आता विद्यार्थीअशी सांकेतिक भाषा-एक विषय म्हणूनही शिकत आहेत — ज्यामुळे विशेषतः दिव्यांग विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळत आहे.

### आरोग्य आणि पोषण : सशक्त राष्ट्राचा पाया

भगवद्गीतेत म्हटले आहे — "युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु। युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥" याचा अर्थ असा आहे की — ज्याचा आहार-विहार संतुलित,झोप आणि उठण्याच्या वेळा नियमबद्ध आणि आचरण संयमित आहे, त्याच्यासाठी ध्यान (योगाभ्यास) हा सर्व दुःखांवर विजय मिळवून देणारा मार्ग ठरतो. याच भावनेने गेल्या अकरा वर्षांमध्ये केंद्र सरकारने, माता आणि बालकांचे पोषण आणि आरोग्य सुधारण्यावर विशेष भर दिला आहे, जेणेकरून देशातील प्रत्येक बालकाला निरोगी आणि समर्थ जीवन लाभू शकेल.

## सुरक्षित बालपण

# बालविवाहमुक्त भारत

महिला आणि बालविकास मंत्रालयाने 27 नोव्हेंबर 2024 रोजीराष्ट्रीय स्तरावर 'बालविवाहमुक्त भारत अभियान'या मोहिमेचा प्रारंभ केला. या प्रसंगी http://stopchildmarriage.wcd.gov.inहे पोर्टलही सुरू करण्यात आले.




### लैंगिक शोषणापासून संरक्षण

लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी 2012 साली लागू करण्यात आलेल्या Protection of children from Sexual Offences Act (POCSO-पॉस्को)या 'लैंगिक अत्याचारांपासून बालकांचे संरक्षण-2012' कायद्याला अधिक सक्षम बनवण्याच्या दिशेने 2019 मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या.

- गंभीर लैंगिक गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये फाशीपर्यंतच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली.
- हा कायदा लिंगभेद करत नाही. त्यामुळे मुलगा आणि मुलगी दोघांनाही समान संरक्षण मिळू शकेल.
- जर कुणी लहान मुलांशी संबंधित अश्लील फोटो, ध्वनीचित्रफीत किंवा सामग्री तयार केली, प्रसारित केली, सामायिक केली, स्वतःजवळ बाळगली, साठवूनही ठेवली किंवा इंटरनेट, मोबाईल, समाजमाध्यमांसारख्या डिजिटल माध्यमांवर पसरवली, तर अशा प्रकारचे कृत्य गंभीर गुन्हा मानून अशा गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षांची तरतूद करण्यात आली.
- लैंगिक गुन्ह्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये जलद न्याय मिळावा यासाठी विशेष आणि जलदगती (फास्ट ट्रॅक) न्यायालयांची संख्या वाढवण्यात आली.

**404**
पॉस्को न्यायालयांसह एकूण 754 फास्ट ट्रॅक न्यायालये 30 राज्यांमध्ये कार्यरत आहेत.

**3.06**
लाखांहून अधिक प्रकरणांचा जानेवारी 2025 पर्यंत निपटारा करण्यात आला आहे.

“देशात 3 लाखांहून अधिक मुलांना संकेतभाषेची- खाणाखुणांच्या भाषेची (साईन लॅन्ग्वेज )गरज भासते. म्हणूनच, भारतीय संकेतभाषेला पहिल्यांदाच‘भाषा विषय’म्हणून मान्यता देण्यात आली आहे. यामुळे भारतीय संकेतभाषेचा मोठ्या प्रमाणात विकास होईल आणि आपल्या दिव्यांग बांधवांना मोठी मदत मिळेल.”

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान

केंद्र सरकारने पोषणाच्या दृष्टीने, सर्व अंगांचा एकत्रित विचार करून समन्वयाने काम केले आहे. बालपण सुरक्षित करण्यासाठी बालपण सामावून घेणाऱ्या वातावरणा भोवती एक मजबूत संरक्षक कवच तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. या संरक्षक कवचाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत — आहार, लसीकरण आणि स्वच्छता पालन. आरोग्याचा थेट संबंध पोषणाशी आहे. पोषण अभियान ही मोहीम प्रत्येक आई आणि प्रत्येक बालकापर्यंत पोहोचली, तर अनेक जीव वाचू शकतात. याच विचारातून केंद्र सरकारने राष्ट्रीय पोषण अभियान सुरू केले. या मोहिमेच्या गांभीर्याचा विचार करून प्रत्येक वर्षी सप्टेंबर महिना ‘पोषण महिना’ म्हणून साजरा केला जातो.

गुलामगिरीच्या प्रदीर्घ कालखंडामुळे देशात साधनसंपत्तीची कमतरता निर्माण झाली, गरीबी अत्यंत वाढली आणि लोकांना उदरनिर्वाहासाठी संघर्ष करावा लागला. या सगळ्याचा सर्वात नकारात्मक परिणाम मुलांवर झाला. आता बदललेल्या परिस्थितीत ‘पोषण अभियान’सारख्या कार्यक्रमांद्वारे मुलांना पौष्टिक आहार मिळावा याची खात्री केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मत आहे की, मजबूत इमारतीसाठी पाया भक्कम असणे जसे गरजेचे असते, तसेच शक्तिशाली नव्या भारतासाठी पोषित आणि निरोगी बालपण असणे तितकेच आवश्यक आहे. कारण, जर देशातील मुलांचे बालपण दुर्बळ राहिले, तर त्या देशाच्या विकासाची

## भक्कम पाया

### पूर्व प्राथमिक शाळा प्रवेशात सातत्याने वाढ



गेल्या 20 वर्षांमध्ये भारतात 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांचे शाळेत प्रवेश घेण्याचे प्रमाण सतत वाढत गेले असून, वर्ष 2024 मध्ये ते 98.1% इतके सर्वोच्च झाले आहे. म्हणजेच या वयोगटातील जवळजवळ सर्वच मुले आता शाळेत दाखल झाली आहेत.

**3 ते 5**

वयोगटातील मुलांच्या पूर्व प्राथमिक शाळा प्रवेशात लक्षणीय सुधारणा झाली आहे. हे प्रमाण आता 70 टक्क्यांहून अधिक झाले आहे. यामुळे हे स्पष्ट होते की, कोणत्या ना कोणत्या स्वरूपात प्रारंभिक शिक्षण सर्व मुलांना उपलब्ध झाले आहे.

**13,076**

शाळांची निवडदेशभरात पीएम श्री योजनेअंतर्गत करण्यात आली आहे. या पीएम श्री शाळांमध्येआधुनिक आणि सर्वसमावेशक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत

### पीएम श्री स्कूल

आधुनिक सुविधायुक्त वर्ग (स्मार्ट क्लासरूम), वाचनालय, इंटरनेट सुविधा, व्यावसायिक कौशल्य शिक्षण, पूर्ण सुसज्ज एकत्रित विज्ञान प्रयोगशाळा, खेळाचे मैदान, शालेय नवोन्मेष परिषदा, ‘मिशन लाइफ’साठी युवा आणि इको(पर्यावरण) क्लब, प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी‘बाला’ (BALA-Building as Learning Aid अर्थात शाळेच्या प्रत्येक घटकाचा शिकण्याचे साधन म्हणून उपयोग)सुविधा,‘जादुई पिटारा’ उपक्रम (जादूचा पेटारा अर्थात उपयुक्त आधुनिक शैक्षणिक साधनांचा संच), विद्यार्थ्यांसाठी10 बॅगलेस अर्थात दप्तर न घेता शाळेत जाणे,मुलांच्या एकंदर शैक्षणिक अस्तित्वाचा मागोवा घेणारीचाइल्ड ट्रॅकिंग सॉफ्टवेअर ही बालनिगराणी संगणकीय प्रणाली, तसेचहात धुण्याची सुविधा असलेली स्वच्छतागृहेअशा सर्व सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात येत आहे.

### संकेतभाषेला विषयाचा दर्जा

- भारतीय संकेतभाषा, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये संकेतभाषेचा समावेश करण्याचे काम सुरू आहे. त्या पैकी, पहिलीते सातवी पर्यंतच्या एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांचे रुपांतर भारतीय संकेतभाषेत करुन झालेही आहे.





# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 : सज्ज होत आहे ‘अमृत पिढी’

- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) 2020 लागू करण्यात आले.
- या धोरणाअंतर्गत भारतात प्रथमच 3 वर्षांपासून 8 वर्षांपर्यंतच्या मुलांसाठी एकसंध अभ्यासक्रमाची ( पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक मिळून एकच टप्पा) रूपरेखा तयार करण्यात आली.
- शालेय शिक्षणासाठी अभ्यासक्रमाची(5+3+3+4)अशी शैक्षणिक रचना निश्चित करण्यात आली आहे — म्हणजे…मूलभूत टप्पा– 5 वर्षांचा, पूर्वप्राथमिक आणि मध्यम टप्पा – प्रत्येकी 3 वर्षांचे, आणि माध्यमिक टप्पा – 4 वर्षांचा.
- एनईपी 2020 मध्ये, 2030 पर्यंत पूर्वप्राथमिक ते माध्यमिक पातळीपर्यंत शंभर टक्के नावनोंदणी दर (प्रवेशदर) साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले गेले आहे.
- या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी विद्यमान समग्र शिक्षण योजना नव्या रूपात आणली गेली असून, त्यात कौशल्याधारित शिक्षणाच्या नव्या उपक्रमांचाही समावेश केला आहे.
- इयत्ता 6 ते 8 मधील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षणाचीसुरुवात करण्यात आली आहे.
- सी.बी.एस.ई या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने 6 व्या इयत्ते पासूनच, 15 तासांच्या कौशल्य मॉड्यूलद्वारे कृत्रिम प्रज्ञा(आर्टिफिशियल इंटेलिजन्स) हे कौशल्य शिकवण्याची योजना सुरू केली आहे. तसेच
- ‘हब अ‍ॅन्ड स्पोक’ मॉडेल (पायाभूत सुविधा आणि इतर सोयींनी युक्त अशी मुख्य शाळा आणि तिच्याशी संलग्न इतर शाळा अशी एकत्रित शैक्षणिक सहकार्य प्रणाली) लागू करण्यात आले आहे. यामध्ये ‘हब स्कूल’ (प्रमुख शाळा) मधील मूलभूत सुविधा आणि साधनसामुग्रीचा उपयोग, परिसरातील इतर शाळांमधील विद्यार्थ्यांना करता येतो.
- एनईपी 2020 मध्ये अशीही शिफारस करण्यात आली आहे की इयत्ता 6 वी ते 8 वी दरम्यान विद्यार्थ्यांनी 10 दिवसांच्या दप्तररहीत तासिकांमध्ये सहभाग घ्यावा. या काळात ते सुतार, माळी, कुंभार, इतर कारागीर आणि कलाकार यांच्यासोबत प्रत्यक्ष आंतरवासिता (इंटर्नशिप) म्हणजे प्रत्यक्ष कामाचे अनुभवाधारित प्रशिक्षण पूर्ण करतील.

गती मंदावेल. जर जन्माआधी आणि जन्मानंतर लगेचच मुलांच्या आहाराकडे लक्ष दिले, त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढवली, तर पुढील आयुष्यात आरोग्याशी संबंधित अडचणी कमी होतील.

पोषण, स्वच्छतापालन आणि लसीकरण— या विषयांवर आधी कधी विचार झालाच नाही, असे नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच या सर्व अंगांनी अनेक योजना राबवल्या गेल्या, पण अपेक्षित यश मिळाले नाही. उलट, कमी साधनसंपत्ती असलेले छोटे देशही या क्षेत्रात पुढे गेले. या स्थितीतून बाहेर पडण्यासाठी2014पासून केंद्र सरकारने नव्या धोरणासह काम करण्यास सुरुवात केली.



- समग्र शिक्षण अभियानाच्या माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञान (ICT-Information and Communication Technology)आणिडिजिटल उपक्रमांअंतर्गत,इयत्ता 6 ते 12मधील शासकीय आणि अनुदानित शाळांमध्येराज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या संयुक्त सहकार्यानेI C T प्रयोगशाळा आणिआधुनिक वर्गखोल्या (S m a r t Classrooms)उभारल्या जात आहेत.
- मातृभाषा : भारत सरकारने राष्ट्रीय शिक्षण धोरणात अशी स्पष्ट तरतूद केली आहे की, शक्य तितक्या ठिकाणी किमान इयत्ता 5 वी ते 8 वीपर्यंत शिक्षणाचे माध्यमघरातील भाषा / मातृभाषा / प्रादेशिक भाषाअसेल.
- 'एक भारत – श्रेष्ठ भारत' उपक्रमा अंतर्गत 'भाषा संगम' कार्यक्रम :भारतातील विविध भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी'भाषा संगम'हा अभिनव उपक्रम राबवण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत शाळकरी मुले22 अनुसूचित भाषांतील(भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या भाषा) रोजच्या वापरातील100 वाक्ये, ध्वनी आणि चित्रफितींच्यामाध्यमातून शिकतात.
- समग्र शिक्षण योजना 2.0 , या योजनेची राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020च्या अनुषंगाने पुनर्रचना करण्यात आली असून ही योजना 2025-26 पर्यंत सुरु राहील.

**404**

पुस्तकांचे, शिक्षण मंत्रालयाने डिजिटलीकरण केले आहे. या पुस्तकांमध्ये शिक्षणाच्या मूलभूत टप्प्यापासून सुरू होणाऱ्या नवीन पाठ्यपुस्तकांचा समावेश आहे. इयत्ता 1ली, 2 री, 3 री आणि 6 वीच्या सर्व विषयांच्या पुस्तकांचे 22 अनुसूचित भाषांमध्ये भाषांतर करण्यात आले आहे.

## शाळांमधील पायाभूत सुविधा

'यूडाईज प्लस'या ' शिक्षणासाठीच्या एकत्रित जिल्हा माहिती प्रणाली प्लस' नुसार देशातील शासकीय शाळांमधील पायाभूत सुविधांचा दर्जावेगाने वाढत आहे. वित्त वर्ष 2023-24 च्या अहवालानुसार 97.1% शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र शौचालये आहेत, 94.8% शाळांमध्ये मुलांसाठी शौचालय, 98.4% शाळांमध्ये पिण्याचे पाणी, 92.4% शाळांमध्ये वीज जोडणी, 64.9% शाळांना संरक्षक कुंपण भिंत आणि 46.2% शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध आहेत.

**92.4%**

शाळांमध्ये वीज जोडणी आहे.

**46.2%**

शाळांमध्ये इंटरनेट सुविधा आहे.

याशिवाय, समग्र शिक्षण योजनेअंतर्गत केंद्र सरकारने **1,85,755** कोटी रुपयांच्या मंजूर खर्चातून 7,297 शाळा इमारतींच्या, नूतनीकरण आणि सुधारणा प्रकल्पांना मान्यता दिली आहे.



लसीकरण मोहीम, एक वसा म्हणून राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. मिशन इंद्रधनुष मोहिमे अंतर्गत देशातील प्रत्येक बालकाचे लसीकरण करण्याचे लक्ष्यनिश्चित केले गेले. लसीकरणाच्या मोहिमेचा वेग तर वाढवलेलाच आहे, शिवाय लसींच्या संख्येतही वाढ करण्यात आली आहे. आता एकूण 12 प्रकारच्या रोगांपासून बचाव करण्यासाठी लसीकरण केले जाते. यामुळेच भारताचे प्रयत्न — विशेषतः मिशन इंद्रधनुष — आज जगभरात वाखाणले जात आहेत. एका प्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिकाने या उपक्रमाला जगातील 12 सर्वोत्तम पद्धतींपैकी एक म्हणून निवडले आहे. मिशन इंद्रधनुष असो वा प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, या उपक्रमांमुळे गरोदरपणातील पोषक आहारासाठी दिल्या जाणाऱ्या सहा हजार रुपयांच्या आर्थिक मदतीमुळे

> "वाढत्या लठ्ठपणाचे प्रमाण हे आपल्या देशापुढील एक मोठे आव्हान बनत आहे. पुढील काही वर्षांत प्रत्येकतिघांपैकी एक माणूस अशा लठ्ठपणाच्या समस्येचा बळी ठरू शकतो. त्यामुळे आपल्या सर्वांनाच स्वतःचा लठ्ठपणापासून बचाव करावा लागेल. म्हणून मी तुम्हाला एक छोटासा सल्ला देऊ इच्छितो – स्वयंपाक करताना तेलाचा वापर 10% ने कमी करावे"
>
> -नरेंद्र मोदी, पंतप्रधान

केवळ गर्भवती महिलेलाच नव्हे, तर गर्भातील बाळालाही पोषण मिळत आहे.

बालकांच्या संरक्षक कवचातील एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे स्वच्छता. अस्वच्छता — विशेषतः लहान मुलांसाठी — अतिशय घातक ठरते, कारण बाल्यावस्थेतील स्वच्छता ही पुढे त्यांच्या आयुष्याचा एक भाग बनलेली असते. पाच वर्षांखालील मुलांच्या जीवाला अतिसारामुळे (डायरिया) सर्वात मोठा धोका असतो. स्वच्छ भारत अभियानामुळे हा धोका मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. एका आंतरराष्ट्रीय अहवालानुसार, केवळ स्वच्छ भारत मोहिमेमुळेच जवळपास 3 लाख लोकांचे प्राण वाचू शकतात.स्वच्छतेची हीच ताकद, गरीबाला एक पैसाही न खर्च करता जीवनदान देते.

सुदृढ बालकच सुदृढ राष्ट्राचे निर्माता असतात— या विचाराला मूर्त रूप देण्यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय पोषण अभियान ही मोहीम, एक वसा म्हणून राबवली आहे. त्यासोबतच आयुष्मान भारत योजनेने कोट्यवधी कुटुंबांना आरोग्य सुरक्षा दिली आहे. ग्रामीण भागातील अंगणवाडी केंद्रांना बळकटी देऊन, बाल पोषण आणि प्राथमिक शिक्षण या दोन्ही गोष्टींचा समन्वय साधण्यात आला आहे. केंद्र सरकारची भूमिका स्पष्ट आहे —ज्यावेळी मुले निरोगी-सुदृढ राहतील, त्याचवेळी ती चांगली शिकतील, चांगला विचार करतील आणि पुढे जातील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हेही निश्चित केले आहे की, भारताचा विकास केवळ निम्म्या समाजापुरता नाही, तर संपूर्ण समाजाचा असावा. याच उद्देशाने 'बेटी बचाओ – बेटी पढाओ' अभियान सुरू करण्यात आले. या योजनेमुळे केवळ स्त्री-पुरुष गुणोत्तरच सुधारले नाही, तर समाजाच्या मानसिकते मध्ये आणि दृष्टिकोना मध्येही आमुलाग्र बदल घडून आला आहे. आज देशातील मुली, विज्ञान-क्रीडा- लष्कर आणि अंतराळ अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा झेंडा फडकवत आहेत.

**डिजिटल भारत – भविष्यातील तंत्रज्ञानाशी परिचीत होत आहेत मुले**

21 वे शतक, डिजिटल युगाचे शतक आहे, हे सत्य पंतप्रधान मोदी चांगलच जाणून आहेत. डिजिटल इंडिया अभियान या मोहिमेने भारतातील मुलांना तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम बनवण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. आज गावागावांत इंटरनेट पोहोचले आहे, ऑनलाइन शिक्षण आणि स्मार्ट क्लासरूम ही सामान्य बाब झाली आहे. यामुळे आता मुले तंत्रज्ञानाचा फक्त उपयोग करून थांबलेली नाहीत, तर नवोन्मेष साध्य करू लागली आहेत.

## अटल इनोव्हेशन मिशन.

### शालेय स्तरावर नवोन्मेषाला चालना

देशात नवोन्मेष आणि उद्योजकतेची संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने 2016 मध्ये अटल इनोव्हेशन मिशन, ही नवोन्मेषीमोहीम सुरू करण्यात आली. त्यावेळेपासून देशभरातील शाळांमध्ये 10,000 अटल टिंकरिंग लॅब्स ( नवोन्मेषाच्या कार्यशाळा) स्थापन केल्या गेल्या आहेत. विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पनांबद्दलची जिज्ञासा-प्रयोगशीलता वाढावी आणि अनेकविध नवोन्मेष घडावेत हा त्यामागील हेतू आहे.

12 ऑगस्ट 2025 रोजी अटल इनोव्हेशन मिशन (नीती आयोग) तर्फे एक 'मेगा टिंकरिंग डे' हा महादिवस आयोजित करण्यात आला. यामध्ये 9,467 अटल टिंकरिंग लॅब्समधील 4,73,350 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या अनुषंगाने, DIY-Do It Yourself म्हणजेच 'स्वतः बनवा' या संकल्पनेवर आधारित व्हॅक्युम क्लीनर तयार केला. इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स मध्ये हा एक नवा विक्रम प्रस्थापित झाला.

**10,000**

टिंकरिंग लॅब्जचा लाभ 1.10 कोटी विद्यार्थी घेत आहेत.

**50,000**

नवीन अटल टिंकरिंग लॅब्जपुढील5 वर्षांत सरकारी शाळांमध्येस्थापन करण्याची घोषणा वित्त वर्ष 2025-26 च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.





# प्रत्येक पावलासाठी वेगळा उपक्रम

### विद्या प्रवेश

शालेय तयारीसाठी खेळावर आधारित तीन महिन्यांचे मॉड्यूल. वार्षिक दिनदर्शिकेमध्ये हा 17 आठवड्यांचा अनिवार्य कार्यक्रम आहे. 2024-25 या शैक्षणिक वर्षात 8.94 लाख शाळांमधील 1 कोटी विद्यार्थ्यांनी प्रवेश कार्यक्रमात भाग घेतला.

बाल वाटिका

इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश करणाऱ्या मुलांसाठी एक प्रारंभिक वर्ग. अंदाजे 6 लाख शाळांमध्ये बाल वाटिका आहे.

### निपुण भारत

5 जुलै 2021 रोजी आकलनासह वाचन आणि अंकशास्त्रातील प्रवीणतेसाठी राष्ट्रीय उपक्रम (निपुण भारत) सुरू करण्यात आला, ज्याचा उद्देश इयत्ता दुसरीच्या अखेरीस मुलांना आवश्यक असलेले

### मूलभूत

साक्षरता आणि अंकज्ञान प्राप्त व्हावे याची खात्री करणे होता. यामध्ये 3 वर्षांची बाल वाटिका आणि इयत्ता पहिली आणि दुसरीचा समावेश आहे.

### चाचणी

समग्र विकासासाठी ज्ञान कामगिरी मूल्यांकन, पुनरावलोकन आणि विश्लेषण सर्वेक्षण सुरू करण्यात आले. याचा उद्देश इयत्ता 3, 6 आणि 9 मध्ये मूलभूत साक्षरता, मूलभूत संख्याशास्त्र, भाषा आणि गणितातील क्षमतांचे मूल्यांकन करणे आहे.

### प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार

2018 मध्ये राष्ट्रीय बाल पुरस्कारांची पुनर्रचना करून पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कारात करण्यात आले. हा पुरस्कार 5 ते 18 वर्षे वयोगटातील मुलांना दिला जातो.

आहेत. आज देशभरातील लहान शहरे आणि गावांमधून असा युवावर्ग उदयास येत आहे जो स्टार्टअप इंडिया आणि अटल इनोव्हेशन मिशनद्वारे जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करत आहे.

### पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन : भक्कम आधार

आयुष्य अनेकदा आपल्याला अनपेक्षित परिस्थितीत ढकलते, अशी परिस्थिती जिची आपण कधीही कल्पना केलेली नसते. हसत खेळत असताना अचानक अंधार दाटून येतो, सर्वकाही बदलून जाते.

कोरोनाने अनेक लोकांच्या, अनेक कुटुंबांच्या जीवनात असेच काहीतरी केले. परंतु त्या आपत्तीत पालक गमावलेल्या मुलांना पीएम केअर्स फॉर चिल्ड्रनने आधार दिला आहे. कोरोनामुळे पीडित झालेल्या मुलांच्या अडचणी कमी करण्याचा हा छोटासा प्रयत्न असला तरी तो एक महत्त्वपूर्ण आधार ठरला आहे. देशातील प्रत्येक नागरिक संपूर्ण संवेदनशीलतेने या मुलांसोबत आहे, हे पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन प्रतिबिंबित करते. पीडित मुलांना त्यांच्या घराजवळील शाळांमध्ये दाखल करण्यात आले आहे. पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन त्यांच्या वह्या, पुस्तके आणि गणवेशाचा खर्च भागवण्यास मदत करते. बाकी दैनंदिन गरजांसाठी इतर योजनांद्वारे त्यांना ₹4,000 चा मासिक भत्ता देखील उपलब्ध करून देण्यात आला आहे. जेव्हा ही मुले आपले शालेय शिक्षण पूर्ण करतील तेव्हा पुढे

> “ जर जीवनात आव्हान आणि स्पर्धा नसेल तर ते प्रेरणाहीन आणि निर्जीव होईल. म्हणून स्पर्धात्मकता आवश्यकच आहे, परंतु ती निरोगी स्पर्धा असली पाहिजे.
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

भविष्यातील स्वप्नांसाठी अधिक पैशांची आवश्यकता भासेल. यासाठी 18 ते 23 या वयोगटातील तरुणांना मासिक भत्ता मिळेल. त्यानंतर जेव्हा ते 23 वर्षांचे होतील तेव्हा त्यांना एकाच वेळी 10 लाख रुपये मिळतील. आयुष्मान कार्डद्वारे या मुलांना आरोग्याशी संबंधित समस्यांसाठी 5 लाख रुपयांपर्यंत मोफत उपचारांची सुविधा देखील मिळत आहे. या मुलांना वयस्क-बुजुर्ग यांच्याशिवाय भावनिक आधार आणि योग्य मानसिक मार्गदर्शन मिळावे यासाठी एक विशेष 'संवाद हेल्पलाइन' देखील तयार करण्यात आली आहे, ज्यावर ते मानसिक बाबींवर सल्ला घेऊ शकतात.

# सुरक्षित बालपण, सशक्त भारत

मुलांच्या हास्यात लपले आहे राष्ट्राचे भविष्य. हे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने 2014 पासून हिंसाचार, शोषण, बालमजुरी आणि लिंगभेद यासारख्या गुन्ह्यांना आळा घालत अनेक कायदेविषयक पावले उचलली आहेत जेणेकरून बालपण व्हावे समृद्ध...

## नवीन उपक्रम

### परीक्षा पे चर्चा (पीपीसी)

हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसोबतचा संवाद कार्यक्रम आहे, जो 16 फेब्रुवारी 2018 रोजी सुरू झाला. पहिल्या कार्यक्रमात 22 हजार सहभागी होते तर 10 फेब्रुवारी 2025 रोजी झालेल्या 8 व्या कार्यक्रमात सहभागींची संख्या 5.11 कोटींवर पोहोचली.

### 10% तेल कमी करणे

मन की बातच्या 119 व्या भागात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण चार पट वाढल्याच्या वृत्तांचा हवाला देत चिंता व्यक्त केली आणि यावर उपाय सुचवले. त्यांनी लोकांना व्यायाम करण्याचे आणि तेलाचा वापर 10% कमी करण्याचे आवाहन केले.

### स्वदेशी स्वीकारण्याचे आवाहन

स्वदेशी चळवळ म्हणजे शतकानुशतकांचा जुना अवशेष नाही, तर भविष्याला सामर्थ्य देणारी मोहीम आहे आणि तिचे नेतृत्व समाजाने, विशेषतः तरुणांनी केले पाहिजे. मुलांना आणि तरुणांना असे आवाहन वारंवार करून पंतप्रधान मोदी त्यांच्यामध्ये स्वदेशी स्वीकारण्याचा पाया घालत आहेत.

### वीर बालकांशी संवाद

2024 च्या वीर बालदिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्यांशी संवाद साधला. शौर्य, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, क्रीडा आणि कला या क्षेत्रात विजेत्या ठरलेल्या मुलांनी या कार्यक्रमात भाग घेतला. संवादादरम्यान पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा वीर बालदिन आपल्याला शिकवतो की परिस्थिती कितीही कठीण असो, काळ कितीही प्रतिकूल असो, देश आणि त्याच्या हितापेक्षा काहीही महत्त्वाचे नाही.



## बालमजुरी

- बालमजुरी ही भारतातील दीर्घकाळापासूनची समस्या आहे. 2011 मध्ये संमत झालेल्या बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) सुधारणा कायद्याने या संदर्भात एक ऐतिहासिक बदल घडवून आणला.
- या दुरुस्तीने 14 वर्षांखालील मुलांसाठी सर्व प्रकारच्या रोजगारावर पूर्णपणे बंदी घातली.
- 14 ते 18 वर्षे गटातील किशोरवयीन मुलांसाठी धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास प्रतिबंध घालण्यात आला.



- बालकामगारांना कामावर ठेवणाऱ्यांसाठी कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली. पहिल्यांदाच तुरुंगवास आणि मोठ्या दंडाची तरतूद करण्यात आली.
- हे पाऊल केवळ आंतरराष्ट्रीय कामगार मानकांशीच सुसंगत नव्हते तर "कामाऐवजी शिक्षण" या दिशेने सामाजिक जागृती करणारे देखील ठरले.

### संस्कार आणि राष्ट्रप्रेम - विकसित भारताचा आत्मा

केंद्र सरकारला असाही विश्वास आहे की विकसित भारत केवळ आर्थिकदृष्ट्याच नव्हे तर संस्कार आणि मूल्यांच्या बाबतही मजबूत असावा. सरकारचे ध्येय मुलांना केवळ आधुनिक शिक्षणच नव्हे तर भारतीय संस्कृती, योग, पर्यावरण संरक्षण आणि आध्यात्मिक

## बाल न्याय कायदा 2015

केंद्र सरकारने बालहक्कांचे संरक्षण, त्यांच्यासाठी कायदेशीर मदत उपलब्ध करणे आणि गुन्ह्यात सहभागी असलेल्या किंवा बाल शोषणाला बळी पडलेल्या मुलांचे पुनर्वसन करण्याच्या तरतुदींसह बाल न्याय (काळजी आणि संरक्षण) कायदा, 2015 लागू केला.

याचे उद्दिष्ट बाल न्याय व्यवस्था अधिक जबाबदार, संवेदनशील आणि व्यावहारिक बनवण्याचे होते. त्यात बाल न्याय मंडळे आणि बाल कल्याण समित्यांची स्थापना यासारख्या तरतुदींचा समावेश होता.

## सुलभ झाली भारतीय दत्तक परिसंस्था

केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाने (कारा) देशातील दत्तक प्रक्रिया सुलभ केली आहे. निष्पाप मुलांच्या सुरक्षेसाठी दत्तक प्रक्रिया कायदेशीर आणि नैतिक असेल, याची खात्री केली आहे.

**8,598** मुलांना ओळख मोहिमेचा भाग म्हणून काराने दत्तक संबंधित गटात सहभागी केले आहे.

**4,515** मुलांना 2024-25 या आर्थिक वर्षात दत्तक घेतले गेले जो गेल्या एक दशकातील म्हणजेच 2014-15 पासूनचा एक विक्रम आहे.

## खेळत खेळत भविष्याची तयारी

भारताच्या इतिहासात प्रथमच 3-8 वर्षे वयोगटातील मुलांसाठी शिक्षणाच्या सुरुवातीच्या टप्प्यासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2022 विकसित करण्यात आला आहे. यात त्यांच्या मातृभाषेतून खेळ आणि कथा-आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. म्हणूनच त्यांच्या आकलनासाठी एक जादूची पेटी विकसित करण्यात आली आहे. या जादूच्या पेटीमध्ये खेळणी, कठपुतळी, मनोरंजक कथा, कोडी, पोस्टर्स आणि खेळ देखील समाविष्ट आहेत.

## हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी आणि घरी परत आणण्यासाठी पोर्टल



- महिला आणि बालविकास मंत्रालयाने 'ट्रॅक चाइल्ड पोर्टल' विकसित केले आहे, जे देशभरातील हरवलेल्या आणि सापडलेल्या मुलांचा मागोवा घेण्यास सक्षम आहे.
- ट्रॅक चाइल्ड पोर्टल गृह मंत्रालयाच्या सीसीटीएनएस अर्थात गुन्हे आणि गुन्हेगारी ट्रॅकिंग आणि नेटवर्क सिस्टमशी देखील जोडलेले आहे.
- मुलांना शोधण्यासाठी तसेच त्यांना कुटुंबाकडे सोपविण्यासाठी हरवलेल्या मुलांचा प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) ट्रॅक चाइल्ड डेटाबेसशी जोडण्यासाठी माहितीची देवाणघेवाण केली जाते.

कोणताही नागरिक 'हरवले आणि सापडले' या विभागाकडे कोणत्याही हरवलेल्या किंवा दिसलेल्या मुलाची तक्रार करू शकतो. एनसीपीसीआरने 'गो होम अँन्ड री-यूनाइट' (घरी जा आणि पुन्हा एकत्र या) पोर्टल देखील सुरू केले आहे.

स्वदेशी असो, स्वातंत्र्यसैनिकांकडून प्रेरणा घेणे असो, भारताचा वारसा समजून घेणे असो किंवा संविधानाची मूल्ये समजून घेणे असो, केंद्र सरकार मुलांसाठी सर्व स्तरांवरील कार्यक्रम, उपक्रम आणि मोहिमा आयोजित करते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सध्याच्या आणि भावी पिढ्यांवर असलेला विश्वास ही निःसंशयपणे आजच्या भारताच्या प्रवासातील सर्वात मोठी ताकद आहे. ते मुळांना पाणी घालत आहेत जेणेकरून भावी पिढ्या फळांनी भरलेल्या झाडाप्रमाणे भारताला अभिमानास्पद बनवू शकतील कारण हीच मुले भारताच्या वारशाचे कर्णधार असतील. आजची मुले केवळ भविष्यच नाहीत तर आजच्या भारताची आशा, प्रेरणा आणि शक्ती देखील आहेत. गेल्या 11 वर्षातील केंद्र सरकारचे धोरण आणि दृष्टिकोन हे दर्शविते की जेव्हा आपल्या मुलांचे पालनपोषण करण्याचा कोणत्याही आईचा विचार संवेदनशील राष्ट्राचे धोरण बनतो, तेव्हा आगामी पिढ्या खऱ्या अर्थाने वर्तमानाचे तसेच विकसित भारताचे सारथ्य करतात.

सुरक्षा, संकल्प आणि दीपावली

# समुद्र रक्षकांसोबत पंतप्रधानांची दिवाळी

**लोक सहसा आपल्या कुटुंबियांसोबत दिवाळी साजरी करतात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींही तेच करतात. म्हणूनच, गुजरातच्या मुख्यमंत्र्यांपासून ते पंतप्रधानांच्या काळापर्यंत ते प्रत्येक दिवाळी देशाच्या रक्षणासाठी तैनात असलेल्या सैन्य आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांसोबत, त्यांना आपले कुटुंब मानून साजरी करतात. या वर्षीही त्यांनी तेच केले... गोवा आणि कारवारच्या पश्चिम किनाऱ्यावर देशाच्या शूर नौसैनिकांसोबत आयएनएस विक्रांतवर साजरी केली दिवाळी...**

देशाच्या सशस्त्र दलांनी जमिनीवर, पाण्यात आणि हवेत अशा प्रत्येक आघाडीवर, प्रत्येक परिस्थितीत समर्पण आणि पूर्ण संवेदनशीलतेने देशाची सेवा केली आहे. देशाच्या सागरी सीमा आणि व्यापारी हितांचे रक्षण करण्यासाठी नौदल तैनात आहे तर आकाशात भारताच्या सुरक्षेसाठी हवाई दल वचनबद्ध आहे. जमिनीवर, उष्ण वाळवंटांपासून ते हिमनद्यांपर्यंत, लष्कर, बीएसएफ आणि आयटीबीपीचे सैनिक पहाडासारखे उभे आहेत. त्याचप्रमाणे विविध आघाड्यांवर एसएसबी, आसाम रायफल्स, सीआरपीएफ, सीआयएसएफ आणि गुप्तचर संस्थांचे सैनिक देखील भारतमातेची सेवा करत एक युनिट म्हणून खंबीरपणे उभे आहेत. याशिवाय भारतीय तटरक्षक दल नौदलाच्या समन्वयाने किनारी सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी दिवसरात्र तैनात आहे.

पंतप्रधान मोदी आपली प्रत्येक दिवाळी अशा सशस्त्र दलांसोबत साजरी करत आले आहेत जे नेहमीच राष्ट्रीय संरक्षणाच्या या महान बलिदानात योगदान देतात. यावर्षी त्यांनी आयएनएस विक्रांतवरील सशस्त्र दलांसोबत दिवाळी साजरी केली. 20 ऑक्टोबर रोजी आयएनएस विक्रांतवरील दिवाळी उत्सवादरम्यान सैनिकांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, प्रत्येकाला आपल्या कुटुंबातील सदस्यांसमवेत दिवाळी साजरी करावीशी वाटते. मलाही माझ्या कुटुंबातील सदस्यांमध्ये दिवाळी साजरी करण्याची सवय लागली आहे. तुम्ही जे माझे कुटुंबातील सदस्य आहात, मी तुमच्यासोबत दिवाळी साजरी करायला आलो आहे. ते म्हणाले की, मी ही दिवाळी माझ्या कुटुंबातील सदस्यांसोबत साजरी करत आहे आणि म्हणूनच





## जागतिक स्थैर्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे भारतीय नौदल

- आज जगभरातील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था आणि प्रगती सागरी मार्गांवर अवलंबून असताना भारतीय नौदल जागतिक स्थैर्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

  जगातील 66% तेल पुरवठा आणि जगातील 50% कंटेनर शिपमेंट हिंद महासागरातून जातात. या मार्गांचे संरक्षण करण्यासाठी भारतीय नौदल हिंद महासागराचे संरक्षक म्हणून तैनात आहे.
- मिशन-आधारित तैनाती, चाचेगिरीविरोधी गस्त आणि मानवतावादी मदत ऑपरेशन्सद्वारे भारतीय नौदल संपूर्ण प्रदेशातील जागतिक सुरक्षा भागीदारीत महत्त्वाची भूमिका बजावते.
- बेटांची सुरक्षितता आणि अखंडता यांत नौदलाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. 26 जानेवारी रोजी देशातील प्रत्येक बेटावर तिरंगा फडकवण्याचा संकल्प करण्यात आला जो नौदल अभिमानाने पूर्ण करते. 2014 मध्ये मालदीवमधील जलसंकटाला तोंड देण्यासाठी ऑपरेशन नीर सुरू करण्यात आले तेव्हा नौदल स्वच्छ पाण्यासह तेथे पोहोचले.

### आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारे संरक्षण क्षेत्र

- गेल्या 11 वर्षांत भारताचे संरक्षण उत्पादन तिप्पटीहून अधिक झाले असून गेल्या वर्षी त्याने 1.5 लाख कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला.
- 2014 पासून भारतीय शिपयार्ड्सनी नौदलाला 40 हून अधिक स्वदेशी युद्धनौका आणि पाणबुड्या दिल्या आहेत.
- गेल्या एका दशकात देशाच्या संरक्षण निर्यातीत 30 पटीहून अधिक वाढ झाली आहे. या यशामध्ये संरक्षण स्टार्टअप्स आणि स्वदेशी संरक्षण एकांशांनी मोठी भूमिका बजावली आहे.

सध्या सरासरी दर **40** दिवसांमध्ये एक नवीन स्वदेशी युद्धनौका किंवा पाणबुडी नौदलात सामील होत आहे.

"आयएनएस विक्रांत आज आत्मनिर्भर भारत आणि मेड इन इंडियाचे एक फार मोठे प्रतीक आहे. महासागरातून प्रवास करणारी, स्वदेशी आयएनएस विक्रांत हे भारताच्या लष्करी सामर्थ्याचे

-नरेंद्र मोदी, पंतप्रधान



### आयएनएस विक्रांतवर झाले आयोजन

- आयएनएस विक्रांतच्या फ्लाईट डेकवर मिग-29 लढाऊ विमानांसह दिसले पंतप्रधान मोदी
- पंतप्रधान मोदींनी अचूकता आणि पराक्रमाचे प्रदर्शन करणारे एक आश्चर्यकारक आणि प्रेरणादायी हवाई शक्ती प्रदर्शन पाहिले.
- पंतप्रधान मोदी नौदल कर्मचाऱ्यांसोबत दुपारचे जेवण जेवले आणि एका सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी झाले जिथे सैनिकांनी "कसम सिंदूर की" हे गाणे गायले.
- आयएनएस विक्रांतवर एक योग सत्र आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये नौसैनिकांनी भाग घेतला होता.

हे माझ्यासाठी खास आहे.

पंतप्रधान मोदींसाठी ही दिवाळी अनेक प्रकारे खास होती, कारण त्यांनी आयएनएस विक्रांतवर रात्र घालवली आणि तिथून सूर्योदय पाहिला. एका बाजूला त्यांना समुद्राचे विहंगम दृश्य दिसले आणि दुसरीकडे भारतमातेच्या शूर सैनिकांची अफाट शक्ती. एका बाजूला अंतहीन क्षितिज होते आणि दुसरीकडे, अनंत शक्तीचे मूर्त स्वरूप असलेले विशाल, प्रचंड आयएनएस विक्रांत. या कार्यक्रमात त्यांनी सांगितले की समुद्राच्या पाण्यावर चमकणारे सूर्याचे किरण शूर सैनिकांनी लावलेल्या दिवाळीच्या दिव्यांसारखे होते. यावेळी मी नौदलाच्या शूर सैनिकांमध्ये दिवाळीचा हा पवित्र सण साजरा करत आहे हे माझे सौभाग्य आहे. यावेळी त्यांनी सशस्त्र दलांना विशेष सलाम करत म्हटले की नौदलाने निर्माण केलेला दरारा, हवाई दलाने दाखवलेले अद्भुत कौशल्य आणि भारतीय सैन्याच्या शौर्याच्या जबरदस्त समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली. म्हणूनच आज भक्ती आणि शौर्याच्या या पवित्र स्थानावरून, आयएनएस विक्रांतवरून, मी पुन्हा एकदा तिन्ही सशस्त्र दलांच्या शूर सैनिकांना अभिवादन करतो.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.




# समुद्रातून समृद्धीचा मार्ग

**मेरीटाईम इंडिया व्हिजन 2030 आणि सागरी अमृतकाळ व्हिजन 2047 सह भारताने समृद्धीच्या दिशेने पावले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 29 ऑक्टोबर रोजी इंडिया मेरीटाईम वीक 2025 दरम्यान लीडर्स कॉन्क्लेव्हमध्ये सागरी क्षमतांचा विस्तार करण्याचे हेच स्वप्न विशद केले....**

भारताची विशाल किनारपट्टी हा केवळ एक नैसर्गिक खजिनाच नाही तर अनंत शक्यतांचा एक जिवंत कॅनव्हास देखील आहे, जो देशाच्या समृद्धीसाठी तसेच जागतिक सागरी क्षेत्रातील नेतृत्वासाठी नवीन क्षितिजे खुली करतो. वास्तविक भारताच्या एकूण व्यापारापैकी 95% आणि मूल्याच्या बाबतीत जवळजवळ 70% व्यापार सागरी मार्गांमधून होतो. ही बंदरे भारताला जगभरातील बाजारपेठांशी जोडतात. म्हणूनच असे म्हटले जाते की भारताची आर्थिक शक्ती महासागरांमधून येते. भारत आता जागतिक सागरी क्षेत्रात एक मजबूत शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे. यामुळेच 2014 नंतर भारताने आपल्या सागरी क्षमतांचा पूर्णपणे वापर करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न सुरू केले. या धोरणाचा भाग म्हणून 2021 मध्ये इंडिया मेरीटाईम व्हिजन 2030 जाहीर करण्यात आले. समृद्धीच्या शक्यतांनी भरलेल्या या व्हिजनचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी इंडिया मेरीटाईम वीक 2025 मध्ये देखील केला. 27 ते 31 ऑक्टोबर दरम्यान मुंबईत आयोजित झालेल्या या कार्यक्रमात 85 देशांतील 10 हजारहून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते.

मेरीटाईम लीडर्स कॉन्क्लेव्हमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सागरी क्षमतांचा विस्तार करण्यासाठी भारताची पावले आणि भविष्यातील रणनीती यावर चर्चा केली. गेल्या 11 वर्षांत भारताच्या सागरी क्षेत्रात ऐतिहासिक परिवर्तन झाले आहे, 150 हून अधिक नवीन उपक्रम सुरू झाले आहेत. प्रमुख बंदरांची क्षमता जवळपास दुप्पट झाली आहे. टर्नअराउंड वेळ म्हणजेच बंदरांवर माल उतरविण्यासाठी किंवा चढविण्यासाठी लागणारा वेळ कमी झाला आहे. क्रूझ पर्यटनाला नवीन गती मिळाली आहे. जलमार्गांवरील मालवाहतूक 700 टक्क्यांहून अधिक वाढली आहे. पंतप्रधान मोदींनी सांगितले की, भारताची बंदरे आता विकसनशील देशांमध्ये सर्वात कार्यक्षम मानली जातात, अनेक बाबतीत विकसित देशांपेक्षाही चांगली कामगिरी करतात. भारतीय बंदरांवर कंटेनर थांबण्याचा सरासरी कालावधी आता तीन दिवसांपेक्षा कमी झाला आहे, जो अनेक विकसित देशांपेक्षा चांगला आहे. जहाजे थांबण्याचा सरासरी कालावधी 96 तासांवरून फक्त 48 तासांवर आला आहे. याव्यतिरिक्त, जागतिक बँकेच्या लॉजिस्टिक्स परफॉर्मन्स इंडेक्समध्येही भारताची कामगिरी सुधारली आहे.

भारताचा सागरी क्षेत्रातील वैभवशाली इतिहास आणि भविष्यासाठीचे दृष्टिकोन सांगताना पंतप्रधान मोदी यांनी अजिंठा लेण्यांमधील एका चित्राचा उल्लेख केला ज्यामध्ये तीन स्तंभ असलेले एक जहाज





**उद्दिष्ट ...** मेरीटाईम इंडिया व्हिजन अंतर्गत अर्थात भारताचा सागरी क्षेत्रासाठीचा दृष्टीकोन 2030 पर्यंत सागरी वाहतूक आणि जहाजबांधणीत आघाडीच्या 10 देशांमध्ये आणि मेरीटाईम अमृतकाल दृष्टिकोना अंतर्गत 2047 पर्यंत अव्वल 5 देशांमध्ये स्थान मिळवणे आहे.

## प्रयत्न...

**3.5** लाख कोटी रुपयांच्या अंदाजे गुंतवणुकीसह मेरीटाईम इंडिया व्हिजन 2030 अंतर्गत 150 हून अधिक नवीन उपक्रम सुरू करण्यात आले

- बंदरे आणि सागरी वाहतूक क्षेत्रामध्ये आता 100 टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी आहे.
- 100 वर्षांहून अधिक जुने नौवहन कायदे रद्द करण्यात आले आणि व्यापारी नौवहन कायदा आणि किनारी नौवहन कायदा लागू करण्यात आला.
- सप्टेंबर 2025 मध्ये 69,725 कोटी रुपये किमतीच्या जहाजबांधणी आणि सागरी सुधारणा योजना सुरू करण्यात आल्या.
- ईशान्य भारतातील अंतर्देशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासासाठी 1,000 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात आली.



**5.8** लाख कोटी रुपये, सागरमाला कार्यक्रमांतर्गत, 2035 पर्यंत 840 प्रकल्पांवर खर्च करायचे आहेत.

## परिणाम...

- भारत प्रशिक्षित खलाशांच्या पुरवठ्यात जगातील तीन प्रमुख पुरवठादारांपैकी एक बनला आहे. भारतीय खलाशांची संख्या 1,25,000 वरून 3,00,000 पेक्षा जास्त झाली. हे जागतिक स्तरावरील सागरी कामगारांच्या 12% प्रतिनिधित्व करते.
- कार्यरत जलमार्गांची संख्या 3 वरून 32 झाली आहे. आपल्या बंदरांचा निव्वळ वार्षिक नफा 9 पटीने वाढला आहे.
- भारतातील पहिले खोल पाण्यातील आंतरराष्ट्रीय ट्रान्सशिपमेंट हब, विझिंजम बंदर, हे कार्यान्वित झाले आहे. अलीकडेच, जगातील सर्वात मोठे कंटेनर जहाज तेथे दाखल झाले.
- आर्थिक वर्ष 2024-25 मध्ये प्रमुख बंदरांमधून 855 दशलक्ष टन मालवाहतूक करण्यात आली, यातून सागरी व्यापार आणि बंदर कार्यक्षमतेत झालेली मोठी वाढ दिसून येते.
- कांडला बंदर हे हरित हायड्रोजन प्लांट असलेले भारतातील पहिले बंदर बनले आहे . कंटेनर टर्मिनलचा दुसरा टप्पा सुरु झाल्यामुळे आता मुंबई हे सर्वात मोठे कंटेनर बंदर बनले आहे.

**2047** पर्यंत, सागरी क्षेत्रात अंदाजे 8 ट्रिलियन रुपयांची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि अंदाजे 1.5 कोटी रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

हे चित्र सहाव्या शतकात तयार करण्यात आले होते, तर जगाने अनेक शतकांनंतर तीन स्तंभ असलेल्या जहाजांचा वापर सुरू केला. भारतात बनवली जाणारी जहाजे जागतिक व्यापाराचा एक महत्त्वाचा भाग होती. आता भारत पुन्हा जहाजबांधणीच्या क्षेत्रात नवी उंची गाठण्यासाठी आपल्या प्रयत्नांना गती देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला दाखवून दिले आहे की समुद्र म्हणजे केवळ सीमा नसून संधींचे द्वार आहेत. आज भारत त्याच विचारसरणीने पुढे जात आहे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.



# प्रत्येक गरजू व्यक्तीला घर....
# निवासस्थानही आणि रोजगारही

**घर, जिथे स्वप्न साकार होतात. दर्जेदार घरे देण्यासाठी 2016 मध्ये सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण चा नववा वर्धापन दिन 20 नोव्हेंबर रोजी साजरा होत आहे. या योजनेच्या विस्तारामुळे, प्रत्येक पात्र कुटुंबाला घरे मिळतील आणि रोजगाराच्या संधी वाढतील...**

घर म्हणजे केवळ निवारा नाही तर सामाजिक, आर्थिक आणि भविष्याला बळकटी देणारे आश्रयस्थानही असते. घरातच कुटुंबांतील व्यक्तींचे वर्तमान आणि भविष्य निश्चित होते असते. याच कारणामुळे 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार केंद्रात स्थापन झाले तेव्हा 2015 मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-शहरी आणि 2016 मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सुरू करण्यात आली. त्यानंतर गरिबीशी लढण्यासाठी एक भक्कम आधार आणि मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीचे माध्यम बनले. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, “प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बांधली जाणारी घरे ही आज फक्त एका योजनेपुरती मर्यादित नाहीत. तर ते अनेक योजनांचे एक संपूर्ण पॅकेज आहे. यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधलेले शौचालय आहे, सौभाग्य योजने अंतर्गत वीज जोडणी आहे, उज्ज्वला योजने अंतर्गत मोफत एलपीजी गॅस कनेक्शन आहे, आणि जल जीवन मिशनअंतर्गत नळाद्वारे पाणी मिळते. पूर्वी या सर्व सुविधा मिळवण्यासाठी गरीबांना अनेक वर्षे शासकीय कार्यालयांचे फेरे मारावे लागत होते.”

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचे उद्दिष्ट एकूण 4.95 कोटी घरे बांधण्याचे उद्दिष्ट असून सुरुवातीला 2.95 कोटी आणि अतिरिक्त 2 कोटी नवीन घरे मंजूर होतील.

## तंत्रज्ञानाने झाली पारदर्शकतेत वाढ

आवास+ 2024 ॲपच्या वापरामुळे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग फसवणुकीचा शोध, ई-केवायसी, आधार आधारित थेट लाभ हस्तांतरण, जिओ-टॅग केलेले फोटो आणि देखरेखीसाठी रिअल-टाइम डॅशबोर्डच्या माध्यमातून ग्रामीण आणि मागास जनतेला त्वरित मदत मिळवणे सुलभ झाले आहे आणि पारदर्शकताही वाढली आहे. प्रस्तावित स्थळापासून ते बांधकाम पूर्ण होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर जिओ-टॅग आणि टाइम-स्टॅम्पसह फोटो अपलोड करणे अनिवार्य आहे.

## ही योजना झाली रोजगार निर्मितीचे माध्यम

प्रधानमंत्रीआवास योजना (ग्रामीण) अंतर्गत, मनरेगाशी समन्वय साधून घरे बांधण्यासाठी प्रत्येक लाभार्थ्याला सध्याच्या दराने 90/95 व्यक्ती - दिवसांचा अकुशल वेतन रोजगार देणे बंधनकारक आहे.



**201 मानवी-दिवसांचा रोजगार**

(56 कुशल, 34 अर्ध-कुशल आणि 111 अकुशल) एका घराच्या बांधकामातून निर्माण होतो.

**568 कोटींहून अधिक**

मानवी-दिवस रोजगार निर्माण झाला आहे गेल्या नऊ वर्षांत पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत 2.83 कोटी घरांच्या निर्मितीमधून.

- ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत, ऑगस्ट 2025 पर्यंत 2.97 लाख उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले. काही प्रमाणित गवंडींना परदेशात काम करण्याची संधीही मिळाली.
- या योजनेमुळे घर बांधणीसाठी बांधकाम साहित्याचे उत्पादन आणि वाहतूक या माध्यमातून लक्षणीय अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाला आहे.

## भाड्याने घरे

- शहरी कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजना - शहरी भागात परवडणाऱ्या भाड्याने घरे संकुल योजना सुरू.

**41,000** हून अधिक घरे पूर्ण झाली. योजनेअंतर्गत एकूण 82,273 नवीन घरांसाठी प्रस्ताव मंजूर.




**ग्रामीण भारतातील कायमस्वरूपी घरे... एक स्वप्न आकार घेत आहे**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)ची सुरुवात 20 नोव्हेंबर 2016 रोजी करण्यात आली असून ती 1 एप्रिल 2016 पासून लागू झाली. लाभार्थ्यांची निवड सामाजिक-आर्थिक जातीय जनगणना 2011, ग्रामसभेची मंजुरी, आणि जिओ-टॅगिंग या तीन टप्प्यांतून केली जाते.

**4.95** कोटी घरांचे एकूण उद्दिष्ट.

**4.12** कोटी घरांचे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना वाटप.

**3.85** कोटी घरांना मंजुरी, 2.83 कोटी घरांचे बांधकाम पूर्ण.

- 2,61,432 कोटी रुपये जारी केले केंद्र सरकारने ऑगस्ट 2025 पर्यंत.
- 3.06 लाख कोटी रुपये खर्च केले जातील 2 कोटी अतिरिक्त घरांवर .

**पीएमएवाय–शहरी 2.0 अंतर्गत 10 लाख कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित आहे.**

केंद्र सरकारच्या 2.20 लाख कोटी रुपयांच्या अर्थ सहाय्याने एक कोटी शहरी गरजू कुटुंबांच्या घरांच्या गरजा पूर्ण करणे हे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) 2.0 चे उद्दिष्ट आहे. या योजनेची सुरुवात 15 जून 2015 रोजी करण्यात आली.

**95.51** लाख घरे पूर्ण.

**1.21** कोटी घरांना 22 ऑक्टोबर 2025 पर्यंत मंजुरी.

**16** लाखांहून अधिक आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज दीपगृहे बांधली.

22 पटींनी वाढली एकूण गुंतवणूक.

| | |
|---|---|
| 2014 | 0.38 लाख कोटी रुपये |
| 2025 | 8.29 लाख कोटी रुपये |

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ऑगस्ट 2025 पर्यंत, 4.12 कोटी घरांचे वाटप करण्यात आले, त्यापैकी 3.85 कोटी घरांना मंजुरी देण्यात आली. यापैकी 2.83 कोटी घरे पूर्ण झाली आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत, वंचितांसाठीच्या प्राथमिक टप्प्यात ऑगस्ट 2025 पर्यंत 2,68, 480 भूमिहीन लाभार्थ्यांना घरे मंजूर करण्यात आली आहेत. या योजनेमुळे गेल्या नऊ वर्षांत 568 कोटी मानवी दिवसांचा रोजगार निर्माण झाला आहे, तर 2028-29 पर्यंत 2 कोटी अतिरिक्त घरे बांधल्याने सुमारे 10 कोटी लोकांना फायदा होण्याची अपेक्षा आहे. घरांची निर्मिती वेगाने करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. घरांच्या निर्मितीमधील नवीन तंत्रज्ञानामुळे सर्वांसाठी किफायतशीर, टिकाऊ आणि नवीन घरांची स्वप्ने साकार होत आहेत. पीएम आवास योजनेत 70% घरे महिला लाभार्थ्यांच्या नावावर आहेत. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण योजनेअंतर्गत अनुसूचित जाती आणि जमातींना 60% आणि अल्पसंख्याकांना 15% घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट निर्धारित करण्यात आले आहे.







51 हजार हुन अधिक नियुक्तीपत्रांचे वितरण

# युवा सामर्थ्यच आहे सर्वात मोठी शक्ती

भारताची युवा शक्ती देशाच्या ऊर्जेचेआणि सामर्थ्याचे प्रतीक आहे. यामुळेच केंद्र सरकारने मुद्रा योजना, स्किल इंडिया आणि स्टार्टअप इंडिया सारखी ठोस पावले उचलली आहेत. दुसरीकडे, आतापर्यंत रोजगार मेळाव्यांद्वारे जवळपास 11 लाख नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. या मालिकेत, 24 ऑक्टोबर रोजी 51 हजारहून अधिक नियुक्तीपत्रे देण्यात आली.

भारताची सर्वात मोठी संपत्ती म्हणजे त्याचे तरुण मानव संसाधन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे स्वप्न केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये स्पष्टपणे दिसून येते, जिथे देशातील तरुण हे शिक्षण, कौशल्य, रोजगार आणि स्वावलंबन या दिशेने प्रत्येक उपक्रमाचे केंद्रबिंदू आहेत. स्किल इंडिया मिशन सारख्या मोहिमा तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देत असताना, रोजगार मेळा आणि राष्ट्रीय करिअर सेवा प्लॅटफॉर्म सारखे उपक्रम देखील त्यांना नवीन संधींशी जोडत आहेत. केंद्र सरकारचे प्रयत्न केवळ सरकारी नोकऱ्यांपुरते मर्यादित नाहीत; "पीएम विकास भारत रोजगार योजना" देखील देशभर सुरू करण्यात आली आहे. या योजनेचे उद्दिष्ट 3 कोटी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे हे आहे. रोजगार मेळाव्यात तरुणांना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतातील तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारच्या या वचनबद्धतेचा उल्लेख केला. ते म्हणाले की, भारत प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे, आपल्या तरुणांच्या क्षमतेला एक मोठी ताकद समजून भारत आगेकूच करत आहे. एवढेच नाही तर आपले परराष्ट्र धोरण देखील भारताच्या तरुणांचे हित लक्षात घेऊन तयार केले जात आहे.

## युवकांसाठी मोठे पाऊल – 'प्रतिभा सेतु पोर्टल'

रोजगार, कौशल्य आणि उद्योग यांना एकाच सूत्रात जोडणाऱ्या 'प्रतिभा सेतु पोर्टल' चा पंतप्रधानांनी उल्लेख केला. पंतप्रधान म्हणाले की केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचलेल्या मात्र निवड न झालेल्या प्रतिभावान तरुणांचे प्रयत्न व्यर्थ जाणार नाहीत. खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही संस्था आता पोर्टलद्वारे या प्रतिभावान व्यक्तींशी संवाद साधत आहेत. या पोर्टलच्या माध्यमातून त्या युवकांना बोलावून त्यांची मुलाखत घेऊन त्यांना संधी देत आहेत.




## युवकांसाठी सरकारी नोकरी देण्यासाठी रोजगार मेळा

| तारीख | नियुक्ती पत्र कधी दिली गेली |
|---|---|
| 22 ऑक्टोबर 2022 | 75 हजार हुन अधिक |
| 22 नोव्हेंबर 2022 | 71 हजार हुन अधिक |
| 20 जानेवारी 2023 | 71 हजार हुन अधिक |
| 13 एप्रिल 2023 | 71 हजार हुन अधिक |
| 16 मे 2023 | 70 हजार हुन अधिक |
| 13 जून 2023 | 70 हजार हुन अधिक |
| 22 जुलै 2023 | 70 हजार हुन अधिक |
| 28 ऑगस्ट 2023 | 51 हजार हुन अधिक |
| 26 सप्टेंबर 2023 | 51 हजार हुन अधिक |
| 28 ऑक्टोबर 2023 | 51 हजार हुन अधिक |
| 30 नोव्हेंबर 2023 | 51 हजार हुन अधिक |
| 12 फेब्रुवारी 2024 | 1 लाख हुन अधिक |
| 29 ऑक्टोबर 2024 | 51 हजार हुन अधिक |
| 23 दिसेंबर 2024 | 71 हजार हुन अधिक |
| 26 एप्रिल 2025 | 51 हजार हुन अधिक |
| 12 जुलै 2025 | 51 हजार हुन अधिक |
| 24 ऑक्टोबर 2025 | 51 हजार हुन अधिक |

## राष्ट्र उभारणीत योगदान देण्याची संधी

**आय गॉट कर्मयोगी भारत प्लॅटफॉर्मद्वारे** जवळजवळ 1.5 कोटी कर्मचारी त्यांचे कौशल्य वाढवत आहेत.

**3,600** हून अधिक उच्च दर्जाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.




- भारत सरकार आणि राज्य सरकारे संयुक्तपणे रोजगारांच्या लाखो नवीन संधी निर्माण करत आहेत.
- **13** प्रादेशिक भाषांमध्ये समान संधींसाठी भर्ती परीक्षांचे आयोजन.
- केंद्रीय लोकसेवा आयोग (यूपीएससी), कर्मचारी निवड आयोग (एसएससी), रेल्वे भरती मंडळ आणि भारतीय बँकिंग कार्मिक संस्था (आयबीपीएस) सारख्या प्रतिष्ठित एजन्सींद्वारे नियुक्त्या केल्या जात आहेत.
- पारदर्शक आणि वेळेवर भरती प्रक्रिया सुनिश्चित केली जाते आणि पेपरफुटीविरुद्ध कठोर कायदे लागू केले जातात.
- राष्ट्रनिर्माणात युवकांचा वाढता सहभाग 'नागरिक प्रथम' या संकल्पाच्या सिद्धीसाठी मार्ग प्रशस्त करतो."
- महिला, दिव्यांग आणि आकांक्षी जिल्ह्यांतील उमेदवारांना विशेष लाभ.

आपल्या राजनैतिक चर्चा, आपले जागतिक सामंजस्य करार यांमध्ये तरुणाईचे प्रशिक्षण-कौशल्य अद्ययावतीकरण आणि रोजगार निर्मिती यांचा समावेश केला जात आहे.

आपल्या संबोधनात पंतप्रधान म्हणाले की आज यश आणि दृष्टीकोनाविषयी ज्या चर्चा होत आहे, त्यात नव्याने नियुक्त झालेल्या युवकांचा मोठा वाटा असेल. विकसित भारताचे ध्येय गाठण्यासाठी, राष्ट्र निरंतर काम करत आहे आणि तरुण कर्मयोगीच या संकल्पाला सिद्धीपर्यंत घेऊन जातील. पंतप्रधानांनी सांगितले की आज तुम्हाला केवळ सरकारी नोकरी मिळाली नाहीये, तर तुम्हाला राष्ट्रसेवेत सक्रिय योगदान देण्याची संधी मिळाली आहे. तुम्ही याच भावनेने काम कराल, असा मला विश्वास आहे, प्रामाणिकपणा आणि सचोटीने तुम्ही भविष्यातील भारतासाठी उत्तम व्यवस्था निर्माण करण्यात आपली भूमिका पार पाडाल. आपल्यासाठी 'नागरिक देवो भव:' हा मंत्र आहे. त्यामुळेच सेवाभावाने, समर्पणाच्या भावनेने, प्रत्येक नागरिकाच्या जीवनात आपण कसे उपयुक्त ठरु शकतो, हे कधीही विसरायचे नाही, असे अनुभवाचे बोल त्यांनी सांगितले.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.




# "राष्ट्र – एक दृढ संकल्प, अटळ निष्ठा!"



**स्वातंत्र्यानंतर देशाचे गृह मंत्री म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांनी 550 हून अधिक संस्थानांना एकत्र करून राष्ट्रीय एकता आणि सशक्तीकरणाची जी भक्कम पायाभरणी केली, तिचे उदाहरण आजही दिले जाते. "राष्ट्रीय एकता दिन आणि सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 150व्या जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की 'एक भारत – श्रेष्ठ भारत' ही संकल्पना सरदार पटेल यांच्यासाठी सर्वोच्च होती."**

सरदार पटेल यांचा असा विश्वास होता की इतिहास लिहिण्यात वेळ वाया घालवू नये, त्याऐवजी इतिहास घडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. सरदार पटेल यांच्या जीवनगाथेत हा विश्वास प्रकर्षाने दिसून येतो. सरदार पटेल यांनी आखलेली धोरणे आणि निर्णयांनी इतिहासात एक नवा अध्याय रचला. इतकेच नव्हे तर, त्यांनी संस्थानांचे एकीकरण करून देशाची एकता आणि सुरक्षा अधिक बळकट केली. शेतकरी, मागासवर्गीय आणि वंचितांना सहकारितेच्या माध्यमातून जोडून देशाला स्वयंरोजगार आणि आत्मनिर्भरतेच्या दिशेने पुढे नेले, ज्यामुळे न्यायप्रधान आणि एकतेच्या सूत्रात बांधलेले राष्ट्र निर्माण करणे शक्य झाले. त्यामुळेच स्वाभाविकपणे सरदार पटेल यांची जयंती हा राष्ट्रीय एकात्मतेचा एक भव्य उत्सव बनल्याचे पंतप्रधानांनी गुजरात मधील केवाडिया येथे झालेल्या कार्यक्रमात सांगितले. ज्याप्रमाणे 140 कोटी भारतीय 15 ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन आणि 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिन साजरा करतात, तेच महत्व आता एकता दिनाला प्राप्त झाले आहे. आज कोट्यवधी नागरिकांनी एकतेची शपथ घेतली, आणि देशाची एकता बळकट करणाऱ्या कृतीला प्रोत्साहन देण्याचा संकल्प केला आहे.

सरदार पटेल हे भारताच्या एकीकरणामागील प्रेरणास्त्रोत होते आणि स्वातंत्र्यानंतरच्या प्रारंभिक काळात देशाच्या भविष्याला आकार देत होते. राष्ट्रीय अखंडता, सुशासन आणि जनसेवेबाबत त्यांची बांधिलकी अटळ होती. वर्ष 2014 नंतर, देशाने पुन्हा एकदा सरदार पटेलांकडून प्रेरित पोलादी निर्धार पाहिला, असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले.

## पंतप्रधान मोदी यांना या निर्णयांचा आहे अभिमान

- सरदार पटेल यांच्या सन्मानार्थ स्टॅच्यू ऑफ युनिटीची उभारणी तसेच बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित पंचतीर्थाची स्थापना.
- सर्व माजी पंतप्रधानांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी पंतप्रधान संग्रहालयाची निर्मिती.
- कर्पुरी ठाकूर आणि प्रणव मुखर्जी यांचा भारतरत्न देऊन गौरव. मुलायमसिंह यादव यांच्यासारखे नेते पद्म पुरस्काराने सन्मानित.

## भारताच्या ऐक्याचे चार आधारस्तंभ

- पहिला: सांस्कृतिक ऐक्य
- दुसरा: भाषिक ऐक्य
- तिसरा: भेदभावरहित विकास
- चौथा: संपर्क व्यवस्थेच्या माध्यमातून मने जोडणे

## केवडिया येथे विकास प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी

पंतप्रधान मोदी यांनी केवडिया येथे सरदार पटेल यांच्या 150व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला

**1,219**
कोटी रुपये

मूल्याच्या विकास प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी केली.



इलेक्ट्रिक बसच्या एका ताफ्याला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. यामुळे लोकांना वाहतूकीच्या अधिक आरामशीर आणि उत्तम सोयी उपलब्ध होतील.

- या प्रकल्पांमध्ये भगवान बिरसा मुंडा यांना समर्पित केलेले एक प्रतिष्ठित केंद्र, बिरसा मुंडा भवन, कर्मचाऱ्यांसाठी एक निवासी परिसर, आदरातिथ्य विभागाचा पहिला टप्पा तसेच एका बोन्साय उद्यानाचा समावेश आहे.
- एक विशेष स्मरणार्थ नाणे तसेच टपाल तिकिटाचे प्रकाशन. पंतप्रधान मोदी यांनी सरदार पटेल यांच्या कुटुंबातील सदस्यांची देखील भेट घेतली.



“स्टॅच्यू ऑफ युनिटी हे भारताच्या ऐक्याबाबत सरदार पटेलांच्या संकल्पनेचे सशक्त प्रतीक आहे. ही आपल्या राष्ट्रीय सन्मानाच्या तसेच सरदार पटेल यांची स्वप्ने साकार करण्याच्या सामुहिक निर्धाराच्या मागची प्रेरक शक्तीदेखील आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी

## एकता दिनाची दिली शपथ

- पंतप्रधान मोदी यांनी सरदार पटेलांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, एकता दिनाची शपथ दिली.
- यावेळी झालेल्या संचलनात सीआरपीएफच्या पाच शौर्यचक्र विजेत्यांचा आणि बीएसएफच्या सोळा वीरचक्र विजेत्यांचा देखील सत्कार करण्यात आला.
- या संचलनात एनएसजी, एनडीआरएफ, महाराष्ट्र, गुजरात, जम्मू-काश्मीर, अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह, मणिपूर, छत्तीसगड, उत्तराखंड आणि पुदुचेरी यांचे चित्ररथ सहभागी झाले होते.
- 900 कलाकारांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात, भारतीय संस्कृतीची समृद्धी आणि विविधता यांचे दर्शन घडवणारी शास्त्रीय नृत्ये सादर करण्यात आली.

जम्मू-काश्मीर कलम 370 च्या साखळदंडातून मुक्त झाला असून पूर्णपणे मुख्य प्रवाहात समाविष्ट झाला आहे. पाकिस्तान आणि दहशतवादाच्या सूत्रधारांना देखील भारताच्या खऱ्या ताकदीची जाणीव झाली आहे. ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पंतप्रधान मोदी म्हणाले की जर कोणी भारताला आव्हान देण्याचे धाडस करत असेल तर भारत शत्रूच्या भूमीवर जाऊन हल्ला करत चोख प्रत्युत्तर देतो, हे आता संपूर्ण जगाने पाहिले आहे. भारताचा प्रतिसाद नेहमीच सशक्त आणि निर्णायक असतो. भारताच्या शत्रुसाठी हा एक संदेश आहे- “हा लोह पुरुष सरदार पटेल यांचा भारत आहे आणि तो स्वतःची सुरक्षितता आणि सन्मान यांच्याशी कधीही तडजोड करणार नाही.”

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी कृपया हा क्यू आर कोड स्कॅन करा.

# छत्तीसगडमधून भारताच्या विकासाचा उद्घोष

**25 वर्षांपूर्वी लहान राज्यांचा मोठा विकास करण्याच्या तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या संकल्पनेतून जन्माला आलेले छत्तीसगड राज्य प्रगतीचे उदाहरण ठरले आहे. या प्रकाशमान वाटचालीला नमन करत पंतप्रधान मोदी यांनी राज्याच्या वर्धापनदिनानिमित्त 14 हजार कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या भेटी दिल्या ....**

एकेकाळी नक्षलवादाचे संकट आणि दुर्गम भागातील पायाभूत सुविधांच्या टंचाईशी झुंजणारे छत्तीसगड राज्य आज भारताच्या विकास यात्रेत महत्त्वाचा भागीदार झाले आहे. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्तीसगड राज्याने केलेल्या यशस्वी कामगिरीचा पट संपूर्ण देशासमोर मांडला तेव्हा 25 वर्षांच्या परिवर्तन यात्रेचा उद्घोष 1 नोव्हेंबर रोजी नवा रायपूरमध्ये आयोजित रजत जयंती समारंभात दुमदुमला. एक कार्यकर्ता ते देशाचे पंतप्रधान या प्रवासादरम्यान, छत्तीसगडच्या विकास यात्रेचे साक्षीदार ठरलेले पंतप्रधान मोदी म्हणाले की जेव्हा छत्तीसगड राज्य निर्माण झाले तेव्हा त्यातील गावांमध्ये पोहोचणे कठीण होते. त्या वेळी अनेक गावांमध्ये रस्त्यांची सोय देखील नव्हती. आता येथील गावांमध्ये 40 हजार किमी लांबीचे रस्त्यांचे जाळे निर्माण झाले आहे. विकासाच्या मार्गावर पुढे जाताना भारताबरोबर छत्तीसगड राज्याच्या सहभागाचा उल्लेख करत ते म्हणाले की गेल्या 11 वर्षांमध्ये छत्तीसगड राज्यात राष्ट्रीय महामार्गाचा अभूतपूर्व विस्तार झाला आहे. आधी राज्यात केवळ एक वैद्यकीय महाविद्यालय होते, आता ही संख्या 14 वर पोहोचली आहे. रायपूरमध्ये एम्स संस्था सुरु झाली आहे. राज्यात सुमारे साडेपाच हजारांहून अधिक आयुष्मान मंदिरे आहेत. रायपुर, बिलासपूर, जगदलपुरसारखी शहरे थेट विमानसेवेने जोडलेली आहेत. कच्च्या मालाचा केवळ निर्यातदार असण्याऐवजी छत्तीसगड आता औद्योगिक राज्याच्या रुपात एका नव्या भूमिकेसह पुढे येत आहे.

माओवाद आणि नक्षलवाद यांच्या छायेतून बाहेर पडून आता विकासाच्या सुवर्ण अध्यायाकडे आगेकूच करणाऱ्या छत्तीसगडच्या परिवर्तन गाथेचा देखील उल्लेख पंतप्रधान मोदी यांनी केला. ते म्हणाले की राज्याने गेल्या 50-55 वर्षांमध्ये या समस्यांमुळे खूप काही भोगले आहे. आदिवासी भाग रस्त्यांच्या सोयीपासून वंचित राहिला. मुलांसाठी शाळा स्थापन होऊ शकल्या नाहीत, आजारी लोकांसाठी रुग्णालये सुरु होऊ शकली नाहीत. डॉक्टरांना, शिक्षकांना मारून टाकण्यात येत होते. पंतप्रधान मोदी म्हणाले की 2014 मध्ये आम्ही पूर्ण देशाला माओवाद-नक्षलवाद यांच्यापासून मुक्ती मिळवून देण्याचा संकल्प केला.











# स्टार्ट अप उद्योजकता ब्लॉक पासून घरे, रस्ते आणि विद्युत प्रकल्पांपर्यंत विविध भेटी

पंतप्रधान मोदी यांनी राज्यात 14,260 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास आणि परिवर्तनकारी प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. यामध्ये संपूर्णपणे सौर उर्जेद्वारे संचालित नव्या विधान भवनासह हुतात्मा वीर नारायण सिंह आदिवासी स्वातंत्र्य सैनिक संग्रहालय तसेच पंतप्रधान आवास योजनेंतर्गत 3.51 लाख नव्या घरांचा देखील समावेश....

- छत्तीसगडच्या 9 जिल्ह्यांमध्ये 12 नव्या स्टार्ट-अप ग्राम उद्योजकता कार्यक्रम ब्लॉकचे उद्घाटन
- पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत 3 लाख लाभार्थ्यांना हप्ता म्हणून 1,200 कोटी रुपये वितरीत केले.
- बस्तर आणि नारायणपूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये विस्तारलेल्या राष्ट्रीय महामार्ग-130डी (नारायणपूर-कस्तूरमेटा -कुटूल-निलांगुर-महाराष्ट्र सीमा) चे बांधकाम तसेच अद्ययावतीकरण कार्याची कोनशीला रचण्यात आली.
- रायपुरमध्ये एचपीसीएलचा अत्याधुनिक तेल डेपो, 489 किमी लांबीची नागपूर-झारसुगुडा नैसर्गिक वायू पाईपलाईनचे लोकार्पण करण्यात आले
- जांजगीर-चंपा जिल्ह्यातील सिलादेही-गतवा-बिर्रा आणि राजनांदगाव जिल्ह्यातील बिजलेटला येथे दोन स्मार्ट औद्योगिक क्षेत्रे, नवा रायपूर येथे फार्मास्युटिकल पार्क आणि मनेंद्रगड, कबीरधाम, जांजगीर-चंपा आणि दंतेवाडातील गीदम येथे वैद्यकीय महाविद्यालये तसेच बिलासपूर येथे आयुर्वेद महाविद्यालयासह रुग्णालयाची देखील पायाभरणी करण्यात आली.

### ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्ग

- पाथलगाव-कुनकुरी ते छत्तीसगड-झारखंड सीमा या टप्प्यातील चौपदरी ग्रीनफिल्ड महामार्गाचा कोनशीला समारंभ झाला.
- ही धोरणात्मक मार्गिका कोरबा, रायगढ, जशपूर, रांची आणि जमशेदपूर मधील महत्त्वाच्या कोळसा खाणी, औद्योगिक विभाग आणि पोलाद कारखाने यांना परस्परांशी जोडते.

**1,600**

मेगावॉटने वाढली पश्चिम आणि पूर्व ग्रीड्स दरम्यान आंतर-क्षेत्रीय वीज हस्तांतरण क्षमता, आंतर-क्षेत्रीय ईआर-डब्ल्यू-आर परस्पर जोडणी प्रकल्पाच्या उद्घाटनानंतर.

**5,610**

कोटी रुपये खर्चाच्या अनेक नव्या तसेच वीज पुरवठ्यात सुधारणा करणाऱ्या प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी. **480** कोटी रुपये खर्चून उभारलेल्या नऊ नव्या वीज उप-केंद्रांचे देखील उद्घाटन करण्यात आले.

परिणाम आपल्यासमोर आहे. 2014 पर्यंत 125 पेक्षा जास्त जिल्हे माओवादाच्या दहशतीखाली होते, आता ही समस्या केवळ काही जिल्ह्यांपुरती मर्यादित झाली आहे. छत्तीसगड मध्ये एकेकाळी बॉम्ब-बंदुकांची भीती होती, आता तेथील स्थिती बदलली आहे. विजापूर मधील चिलकापल्ली गावात सात दशकांनंतर पहिल्यांदाच वीजेची सुविधा पोहोचली. अबूझमाड मधील रेकावया गावात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच शाळेचे बांधकाम सुरु झाले आहे. लाल झेंड्याच्या जागी आता राष्ट्रीय तिरंगा डौलाने फडकतो आहे.

### जन्मापासून जडलेल्या हृदयविकारांवर यशस्वी उपचार घेतलेल्या मुलांशी पंतप्रधानांनी केली 'दिल की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवा रायपूर इथल्या श्री सत्य साई संजीवनी रुग्णालयात 'दिल की बात' कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या 'गिफ्ट ऑफ लाईफ' समारंभामध्ये जन्मापासून जडलेल्या हृदयविकारांवर यशस्वी उपचार घेतलेल्या 2,500 मुलांशी संवाद देखील साधला. एका तरुण हॉकीपटूने सांगितले की तिने 5 पदके जिंकली होती आणि शाळेत तपासणी दरम्यान तिला हृदयविकार आहे असे समजले. सहा महिन्यांपूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि आता त्यानंतर ती पुन्हा हॉकी खेळू लागली आहे असे ती म्हणाली. पंतप्रधानांनी तिला तिच्या महत्त्वाकांक्षांबाबत विचारले. त्यावर तिने उत्तर दिले की तिला डॉक्टर होऊन सर्व मुलांवर उपचार करण्याची इच्छा आहे. मुलांशी गप्पा मारताना पंतप्रधान म्हणाले की कोणतेही चांगले काम पूर्ण करण्यासाठी निरोगी शरीर आवश्यक आहे. त्यांनी मुलांना योगाभ्यास आणि नियमित शिस्तबद्ध झोप यांचा समावेश असलेल्या दिनचर्येच्या माध्यमातून स्वतःला तंदुरुस्त राखण्याचा सल्ला दिला.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी कृपया हा क्यू आर कोड स्कॅन करा.




आर्य समाजाच्या स्थापनेची 150 वर्षे

# इतिहासाच्या प्रवाहाला दिली नवी दिशा

स्थापनेपासून आतापर्यंत आर्य समाजाने इतिहासाच्या प्रवाहाला एक नवी दिशा दिली आहे. आर्य समाजाने निर्भीडपणे भारतीयत्वाचा पुरस्कार केला आहे. या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय आर्य महासंमेलन 2025 मध्ये बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की संपूर्ण भारताच्या वैदिक ओळखीशी जोडलेली आहेत आर्य समाजाची ही 150 वर्षे......

आपल्या वेदांमध्ये एक वाक्य आहे- "कृण्वन्तो विश्वमार्यम्", म्हणजेच आपण संपूर्ण जगाला श्रेष्ठ बनवूया, जगाला उत्तम विचारांच्या दिशेने घेऊन जाऊया. स्वामी दयानंद यांनी याच वेदवाक्याला आर्य समाजाचे ध्येय वाक्य बनवले. आज हेच वेदवाक्य भारताच्या विकास गाथेचा गुरुमंत्र देखील आहे. भारताच्या विकासातून जगाचे कल्याण, भारताच्या समृद्धीतून मानवतेची सेवा, याच संकल्पनेसह देश आगेकूच करत आहे. भारत देश आज सातत्यपूर्ण विकासाच्या बाबतीत एक प्रमुख जागतिक मतप्रदर्शक देश झाला आहे. ज्या प्रकारे स्वामीजींनी वेदांतील विचारांकडे परत जाण्याचे आवाहन केले, त्याच प्रकारे आज भारत जागतिक मंचावर वैदिक जीवन शैली आणि आदर्शांचा पुन्हा स्वीकार करण्याबद्दल चर्चा करत आहे. पंतप्रधान मोदी म्हणतात की याचसाठी आम्ही मिशन लाईफ (एलआयएफई अभियान) हाती घेतले. संपूर्ण जगभरातून या संकल्पनेला पाठिंबा मिळतो आहे. 'एक सूर्य, एक विश्व, एक ग्रीड' या संकल्पनेच्या माध्यमातून आम्ही स्वच्छ उर्जेसाठी देखील जागतिक चळवळ उभारत आहोत. एवढेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या माध्यमातून आज योग देखील जगातील 190 पेक्षा जास्त देशांपर्यंत पोहोचला आहे.

## युगद्रष्टे महापुरुष होते स्वामी दयानंद सरस्वती

शतकानुशतकांच्या गुलामगिरीने संपूर्ण देश, संपूर्ण समाज उद्ध्वस्त झाला होता. जेव्हा इंग्रज भारतीय परंपरा आणि श्रद्धांना तुच्छ लेखत होते, अशा कठीण काळात एक तरुण संन्यासी पुढे येतात. हिमालयातील निर्जन आणि दुर्गम ठिकाणी साधना करतात, तपश्चर्येच्या कसोटीवर स्वत:ची परीक्षा घेतात आणि हीन भावनेच्या गर्तेत अडकलेल्या भारतीय समाजाला खडबडून जागे करतात. आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेले हे ऋषी आपल्या समाजाला वेदांकडे परतण्याचे आवाहन करतात – वेदांकडे वळा. असे अद्भुत व्यक्तिमत्व इतर कोणी नव्हे तर स्वामी दयानंद जी होते! त्यांनी गुलामीच्या त्या काळात दबलेल्या, पिचलेल्या राष्ट्राच्या चैतन्याला पुन्हा जागृत केले. त्यासोबतच त्यांनी उच्च-नीच, स्पृश्य अस्पृश्य, आणि भेदभाव या कुप्रथांचा निषेध केला. त्यांनी निरक्षरतेविरुद्ध अभियान सुरू केले, तसेच आपले वेद आणि धर्मग्रंथांच्या अर्थांचे विकृतीकरण आणि सरमिसळ करणाऱ्यांना आव्हान दिले. त्यांनी परदेशी विचारधारांचा विरोध केला आणि शास्त्रार्थांच्या पारंपरिक पद्धतीद्वारे सत्य समोर आणले. एवढेच नव्हे तर त्यांनी महिलांना घराच्या चौकटीत बंदिस्त करणाऱ्या मानसिकतेला आव्हान दिले आणि आर्य समाजाच्या विद्यालयांमध्ये मुलींना शिक्षण देण्याचे अभियान सुरू केले.

### आर्य समाज: सामाजिक सुधारणा आणि देशाच्या उभारणीत अग्रेसर

- आर्य समाजाने सुधारणांच्या महान परंपरेला नेहमीच पुढे नेले आहे. तसेच स्वातंत्र्याच्या लढाईत स्वातंत्र्यसैनिकांना वैचारिक बळ दिले आहे.
- लाला लजपतराय, रामप्रसाद बिस्मिल यांसारख्या क्रांतिकारकांनी आर्य समाजापासून प्रेरणा घेऊन स्वातंत्र्य संग्रामात सर्वस्व अर्पण केले.
- भारतविरोधी मानसिकता असो, परदेशी विचार लादणारे लोक असो, फूट पाडण्याचे काम करणारी मानसिकता असो, सांकृतिक क्षेत्रात सरमिसळ करून गोंधळ निर्माण करण्याचे प्रयत्न असो, आर्य समाजाने नेहमीच या सर्वांना आव्हान दिले आहे.
- आर्य समाजातील स्वामी श्रद्धानंद यांच्यासारख्या अनेक महापुरुषांनी धार्मिक प्रबोधनाच्या माध्यमातून इतिहासाच्या प्रवाहाला एक नवीन दिशा दिली.
- गुरुकुल कांगडी, गुरुकुल कुरुक्षेत्र, डीएव्ही संस्था तसेच अशा इतर अनेक शैक्षणिक संस्था आपापल्या क्षेत्रात सातत्याने कार्य करत आहेत.



> आज आपला देश राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या माध्यमातून शिक्षणाला पुन्हा एकदा नैतिक मूल्ये आणि चारित्र्य घडवण्याशी जोडत असताना, मी आर्य समाजाप्रती आभार व्यक्त करतो. या समाजाने भारतातील ज्ञानाची परंपरा सुरक्षित ठेवली.
>
> पंतप्रधान नरेंद्र मोदी

वेद आपल्याला शिकवतात, "संगच्छध्वं संवदध्वं सं वो मनांसि जानताम्". म्हणजेच, आपण एकमेकांसोबत वाटचाल करू, एका आवाजात बोलू, आणि एकमेकांच्या मनाचा विचार करु. म्हणजेच एकमेकांच्या विचारांचा आदर करू. पंतप्रधान मोदी म्हणतात की वेदांमध्ये केलेल्या या आवाहनाला आपण देशासाठीच्या आवाहनाच्या रूपातही पाहिले पाहिजे आणि देशाच्या निश्चयांना स्वतःचे निश्चय मानले पाहिजे. आपल्याला लोकसहभागाच्या भावनेतून सामूहिक प्रयत्नांना वेग द्यावा लागेल. या गेल्या दीडशे वर्षांत आर्य समाजाने याच भावनेतून काम केले आहे आणि याच भावनेला आपल्याला सातत्याने बळकट करायचे आहे. महर्षी दयानंद सरस्वती यांचे विचार अशाच प्रकारे मानवतेच्या कल्याणाचा मार्ग प्रशस्त करत राहतील, यावर माझा विश्वास आहे.

### आर्य समाजाच्या देश-परदेशातील शाखांचे प्रतिनिधी झाले सहभागी

आंतरराष्ट्रीय आर्य महासंमेलन 2025 हा महर्षी दयानंद सरस्वती यांची 200 वी जयंती आणि आर्य समाजाच्या समाजकार्याची 150 वर्षे यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या ज्ञान ज्योती महोत्सवाचा एक महत्त्वाचा भाग ठरला. या शिखर संमेलनाने देश-परदेशातील आर्य समाजाच्या शाखांतील प्रतिनिधींना एका मंचावर एकत्र आणले आणि त्यातून महर्षी दयानंद यांचे सुधारमतवादी आदर्श आणि संस्थेची वैश्विक पोहोच यांच्या सार्वत्रिक प्रासंगिकतेचे दर्शन घडले. या संमेलनात 'सेवेची सुवर्णमय 150 वर्षे' या शीर्षकाचे प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनात शिक्षण, सामाजिक सुधारणा तसेच अध्यात्मिक उन्नतीमध्ये आर्य समाजाच्या योगदानाची माहिती सादर करण्यात आली.

महर्षी दयानंद यांच्या सुधारमतवादी आणि शैक्षणिक वारशाचा गौरव करणे तसेच आर्य समाजाने समाज सुधारणा आणि राष्ट्र उभारणीत गेली 150 वर्षे दिलेल्या योगदानाचा उत्सव साजरा करणे हा या शिखर संमेलनाच्या आयोजनाचा मुख्य उद्देश होता. त्यासोबतच, विकसित भारत 2047 च्या संकल्पनेला अनुरूप असलेल्या वैदिक सिद्धांतांबाबत आणि स्वदेशी तत्वांबाबत जागतिक पातळीवर जागरुकता निर्माण करण्याचे देखील उद्दिष्ट होते.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी कृपया हा क्यू आर कोड स्कॅन करा.

# भारतात आता... संशोधन सुलभतेवर लक्ष केंद्रित



भारतात नवोन्मेषाची आधुनिक परिसंस्था तयार करण्यासाठी, आम्ही संशोधन करण्यातील सुलभतेवर लक्ष केंद्रित करत आहोत. यासाठी, आमच्या सरकारने आर्थिक नियम आणि खरेदीविषयक धोरणांमध्ये अनेक सुधारणा केल्या आहेत. आम्ही नियमन, प्रोत्साहनपर तरतुदी तसेच पुरवठा साखळ्यांमध्ये देखील सुधारणा केल्या आहेत, जेणेकरून मूळ नमुने प्रयोगशाळेतून लवकरात लवकर बाजारपेठेत येईल.

-पंतप्रधान नरेंद्र मोदी

Imagine. Innovate. Inspire.
for Viksit Bharat 2047

Emerging Science, Technology, and Innovation Conclave
ESTIC 2025

भारताने अवकाश संशोधनापासून क्वांटम तंत्रज्ञानापर्यंत, कृत्रिम बुद्धिमत्तेपासून सेमीकंडक्टर उत्पादनापर्यंत, स्वच्छ ऊर्जेपासून इतर अनेक संशोधनांपर्यंत विविध क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. विज्ञान क्षेत्रातील याच यशस्वी कामगिरीचा महाकुंभ असलेल्या उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष संमेलन 2025 चे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 3 नोव्हेंबर रोजी केले उद्घाटन... आणि 1 लाख कोटी रुपये खर्चाच्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष योजना कोषाची केली सुरुवात...

भारतासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान हे घटक राष्ट्रीय प्रगतीचा सशक्त आधारस्तंभ बनले आहेत. विशेषतः गेल्या 11 वर्षांत पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली नवोन्मेषाला विशेष प्रोत्साहन देण्यात आले आहे. यातून आत्मनिर्भरतेला बळ लाभले आहे आणि देशाची एक जागतिक ओळख आकाराला आली आहे. जसजसे राष्ट्र विकसित भारत 2047 च्या परिवर्तनशील संकल्पनेच्या दिशेने वाटचाल करू लागले आहे, तसतसा आपला देश नवनवी परिमाणे देखील साध्य करू लागला आहे. भारतातील उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष हे घटक एकत्र येऊन नवा इतिहास निर्माण करत आहेत. याच नव्या परिमाणांची जागतिक पातळीवर सशक्त ओळख निर्माण करून आगामी दिशा निश्चित करण्यासाठी भारताने पुढे पाऊल टाकले आहे. याच शृंखलेत नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे दिनांक 3 ते 5 नोव्हेंबर या कालावधीत 11 संकल्पनांवर आधारित उदयोन्मुख विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष 2025 चे आयोजन करण्यात आले होते. नोबेल पुरस्कारप्राप्त सर आंद्रे गाईम देखील या संमेलनात सहभागी झाले होते.

कोणत्याही देशाच्या सर्वोच्च पदावरील दूरदर्शी नेता जेव्हा विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन तसेच नवोन्मेष यांना इतके प्राधान्य देतो, तेव्हा देशातील शास्त्रज्ञ तसेच त्यांच्याशी संबंधित संस्था यांना असा स्पष्ट संदेश मिळतो की त्यांची मेहनत आणि विचार भारताच्या भविष्याला आकार देण्यात महत्त्वाची भूमिका निभावत आहेत. याचाच परिणाम असा झाला आहे की 11 वर्षांपूर्वी जेव्हा पंतप्रधान मोदी यांनी देशाच्या नेतृत्वाची जबाबदारी घेतली तेव्हा त्यांनी जे स्वप्न उराशी बाळगले- विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या सामर्थ्याच्या मदतीने भारताला विकसित राष्ट्र बनवायचे, ते



## संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देईल आरडीआय योजना निधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात संशोधन आणि विकास परिसंस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी एक लाख कोटी रुपयांच्या संशोधन विकास आणि नवोन्मेष योजना निधीचा शुभारंभ केला. पंतप्रधान मोदी म्हणतात की विज्ञानातील बदल आता एकरेषीय नाही तर झपाट्याने होत आहेत. याच विचारासह भारत उदयोन्मुख विज्ञान तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाशी संबंधित या सर्व पैलूंना प्रोत्साहन देत आहे. सरकारने संशोधन आणि विकासात नव्या संधींसाठी एक लाख कोटी रुपयांचा आरडीआय निधी सुरू केला आहे. पहिल्यांदाच उच्च जोखीम आणि उच्च प्रभाव असलेल्या प्रकल्पांसाठीही निधी उपलब्ध केला जात आहे. सरकारचा उद्देश केवळ सरकारी संस्थांमधीलच नव्हे तर खासगी क्षेत्रातील नवोन्मेषालाही प्रोत्साहन देण्याचा आहे. याच दिशेने सरकारने वैज्ञानिक विकासाला पाठबळ देण्यासाठी याआधीच वित्तीय नियम आणि खरेदी धोरणांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

## भारतातील महिला...

- जगात भारताच्या अंतराळ मोहिमांची चर्चा होते त्यावेळी त्यामध्ये भारतीय महिला शास्त्रज्ञांबाबत खूप चर्चा होते.
- दशकभरापूर्वी महिलांचे पेटंट फायलिंग 100 पेक्षाही कमी होते, ते आता वार्षिक 5 हजारांहून जास्त आहे.

स्टेम शिक्षणातही महिलांचा वाटा **43 %** तो जागतिक सरासरीपेक्षा जास्त आहे.

## बालके आणि युवा

- विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेषाच्या दिशेने देश युवा वर्गाला वेगाने पुढे नेण्याचे काम करत आहे.
- याच विचाराने 10 हजार अटल टिंकरिंग लॅब तयार करण्यात आल्या आहेत.
- यामध्ये एक कोटींहून जास्त बालके जिज्ञासा आणि सृजनशीलतेने प्रयोग करत आहेत.

## तज्ज्ञांसमोर ठेवले आव्हान...

या परिषदेतील तज्ज्ञांसमोर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले विचार व्यक्त केले. उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये तज्ज्ञांनी दुप्पट ऊर्जेने काम करावे. विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी हे अतिशय महत्त्वाचे आहे. अन्न सुरक्षेच्या पुढे जात पोषण सुरक्षेसाठी पुढील पिढीतील बायोफॉर्टिफाईड पिके विकसित करून कुपोषणाविरोधातील संघर्षात जगाला मदत करा. कमी खर्चाच्या, मृदा आरोग्य वर्धक, जैविक खतांमध्ये नावीन्यपूर्ण प्रयोग करून रासायनिक खतांना पर्याय तयार करा, असे आवाहनही त्यांनी केले. भारताची जनुकीय विविधता अधिक प्रभावी पद्धतीने शोधून व्यक्तिगत उपचार आणि रोगांच्या पूर्वानुमानाच्या क्षेत्राला नवी दिशा देण्याचे आव्हान समोर ठेवावे. याबरोबरच स्वच्छ ऊर्जा साठवणुकीमध्ये नवे आणि किफायतशीर नवोन्मेष विकसित करण्यासहित इतर काही शिफारसीही कराव्यात. जेणेकरून आपले जगावरील अवलंबित्व कमी होईल आणि या क्षेत्रात स्वयंपूर्णता साध्य करणे शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

आज 11 वर्षांनंतर प्रत्यक्षात येत आहे. याच विश्वासाने पंतप्रधान मोदी या मंचावरून आता सांगत आहेत की भारत आज नैतिक आणि मानव-केंद्रित कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी (एआय) जागतिक संरचनेला आकार देत आहे. भारत आता तंत्रज्ञानाचा ग्राहक नाही तर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिवर्तनाचा अग्रदूत बनला आहे. आज जगातील सर्वात यशस्वी डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा भारताकडे आहेत. 2 लाख ग्राम पंचायतींना को-ऑप्टिकल फायबरने जोडले आहे.

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.




# भारताचा विकास देत आहे जागतिक संधींना आकार

**भारत आता थांबणार नाही आणि थबकणार नाही कारण 140 कोटी भारतीय एकाच वेळी वेगाने पुढे जात आहेत... ऑक्टोबर महिन्यात आयोजित एनडीटीव्ही वर्ल्ड समिटमध्ये पंतप्रधान मोदी यांनी दिला संदेश...**

भारताचा सरासरी विकासदर गेल्या तीन वर्षात 7.8 टक्के राहिला आहे. त्यातून देशाचा जलद गतीने होणारा आर्थिक विकास दिसतो. काही दिवसांपूर्वीच व्यापारी निर्यातीची आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे ज्यात गेल्या वर्षाच्या तुलनेत सुमारे 7% वृद्धी दिसत आहे. तर दुसरीकडे गेल्या वर्षी भारताने सुमारे 4.5 लाख कोटी रुपयांची कृषी निर्यात केली. अनेक देशांच्या अस्थिर मानांकनांच्या दरम्यान स्टँडर्ड अँड पुअर्स ग्लोबल (S&P) ने 17 वर्षांनंतर भारताच्या पत मानांकनात सुधारणा केली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) देखील भारताच्या विकासाच्या दृष्टिकोनामध्ये सुधारणा करून तो वरच्या दिशेने वाढवला आहे. काही दिवसांपूर्वीच गुगलने भारतातील कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात 15 अब्ज डॉलर्सच्या मोठ्या गुंतवणुकीची घोषणा केली आहे तर भारत- युरोपीय मुक्त व्यापार संघ (ईएफटीए) व्यापार करारांतर्गत युरोपीय देशांनी भारतात 100 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे मान्य केले आहे. इतकेच नाही तर हरित ऊर्जा आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात महत्त्वाची गुंतवणूक केली जात आहे.

दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या एनडीटीव्ही शिखर परिषदेत 'अजेय भारत' या संकल्पनेची प्रशंसा करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की आज भारत थांबण्याच्या मनःस्थितीत नाही आहे. विविध समस्या आणि अडथळ्यांचा सामना करणाऱ्या जगात 'अजेय भारत'वर चर्चा होणे स्वाभाविक आहे. भारताने अनेक शतकांपासून अज्ञात मार्गांवर चालण्याचे धाडस दाखवले आहे. संत, शास्त्रज्ञ आणि नाविकांनी हे सातत्याने सिद्ध केले आहे की 'पहिले पाऊल' परिवर्तनाच्या प्रारंभाचे प्रतीक आहे. 2014 च्या आधीच्या...

## अशा प्रकारे होत आहे नागरिकांचे जीवन सुकर

**1 जीबी डेटा** ची किंमत आता केवळ 10 रुपये आहे, 2014 च्या आधी ती 300 रुपये होती.

**2.5** लाख कोटी रुपयांची झाली नागरिकांची बचत. हे घडले प्राप्तिकर कमी केल्यामुळे आणि जीएसटीतील सुधारणांमुळे.



**1.25** लाख कोटी रुपयांची सर्वसामान्य नागरिकांची झाली बचत हे घडले आयुष्मान भारत योजनेमुळे.

**50%** जागतिक रियल टाईम डिजिटल देवाणघेवाण भारतात होत आहे.



**40** हजार कोटी रुपयांची झाली बचत. हे घडले पीएम जनौषधी केंद्रांच्या माध्यमातून.

**42** कोटींपेक्षा जास्त ओपीडी सल्ले ई-संजीवनीच्या ॲपद्वारे रुग्णांना मिळाले.

**12** हजार कोटी रुपयांची झाली बचत. हे घडले स्टेंटच्या किमती कमी झाल्यामुळे.

**11** जिल्ह्यांमध्ये आता माओवादाचा प्रभाव शिल्लक. 11 वर्षांपूर्वी 125 जिल्हे होते माओवादग्रस्त.

## 10 कोटींपेक्षा जास्त कुटुंबांना मोफत गॅस कनेक्शन



आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांचे जीवन सुकर करण्यासाठी विद्यमान केंद्र सरकारने 10 कोटींपेक्षा जास्त कुटुंबांना मोफत गॅस जोडण्या दिल्या आहेत. एके काळी गॅस जोडणी मिळवण्यासाठी खासदारांच्या शिफारसपत्रांची गरज लागत असे. एक दशकापूर्वी इंधन अनुदानातील वाढीपासून संरक्षण करण्यासाठी रात्री आठ ते सकाळी आठ वाजेपर्यंत पेट्रोल पंप बंद करण्याची तयारी केली गेली होती. याउलट विद्यमान सरकार आता पर्यायी इंधन आणि इलेक्ट्रिक वाहनांमध्ये अभूतपूर्व गुंतवणूक करत आहे.



"आम्ही प्रत्येक जोखीम सुधारणेत, प्रत्येक सुधारणा लवचिकतेत... आणि प्रत्येक लवचिकता संकल्पात रूपांतरित केली आहे.

-पंतप्रधान नरेंद्र मोदी

आव्हानांचा उल्लेख करून पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की त्या काळात 'महंगाई डायन खाए जा रही है' यांसारखी महागाईवर आक्रोश करणारी गाणी ऐकू यायची. त्या काळात देशातील नागरिक आणि जागतिक समुदाय या दोघांनाही असे वाटत होते की संकटाच्या जाळ्यात अडकलेला भारत यातून वर येऊ शकणार नाही. मात्र, गेल्या 11 वर्षात भारताने हा संभ्रम दूर करून प्रत्येक आव्हानावर विजय मिळवला आहे. 'कमकुवत पाच'च्या श्रेणीतून बाहेर पडून भारत जगातील आघाडीच्या पाच अर्थव्यवस्थांपैकी एक बनला आहे. चलन फुगवटा आता दोन टक्क्यांच्या खाली आहे तर विकासदर 7 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. चिपपासून जहाजापर्यंत आत्मनिर्भर भारताचा विश्वास सर्वच क्षेत्रांमध्ये स्पष्ट दिसत आहे. जी-7 देशांसोबत भारताच्या व्यापारात 60 टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली आहे. जग आता भारताला एक विश्वासार्ह, जबाबदार आणि लवचिक भागीदाराच्या रुपात पाहात आहे. इलेक्ट्रॉनिक्सपासून फार्मास्युटिकल्सपर्यंत आणि ऑटोमोबाईल्सपासून मोबाईल निर्मितीपर्यंत भारतात गुंतवणुकीची लाट सुरू आहे.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की 1960 च्या दशकात तत्कालीन पंतप्रधानांनी बँकिंग सेवांचा विस्तार गरिबांपर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत आणि कामगारांपर्यंत होईल यासाठी बँकांचे राष्ट्रीयीकरण कसे योग्य आहे, हे स्पष्ट केले होते. प्रत्यक्षात तत्कालीन सत्ताधारी पक्षाने बँकांना लोकांपासून एवढे लांब ठेवले की लोक बँकांच्या दारात जायलाही घाबरत असत. 2014 मध्ये भारतात लोकसंख्येतील निम्म्याहून अधिक लोकांचे बँकेत खाते नव्हते. पण केंद्रातील विद्यमान सरकारने मोहिमेच्या स्वरुपात 50 कोटींपेक्षा जास्त जनधन खाती उघडली. इतकेच नव्हे तर आज भारतात प्रत्येक गावात किमान एक बँकिंग टचपॉइंट आहे. याच्या परिणामी गेल्या 11 वर्षांत महिला बचत गट, लहान शेतकरी, पशुपालक, मच्छिमार, रस्त्यावरील- टपरीवाले फेरीवाले आणि विश्वकर्मा कामगारांना विनातारण लाखो कोटी रुपयांची कर्जे दिली गेली आहेत. n

पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.



राष्ट्रसेवा, लोकसेवा, निसर्ग सेवेत सर्व काही समर्पित

# पीएम मोदींच्या भेटवस्तू समर्पणाची नवी प्रतिमा

**राज्य आणि राष्ट्राचे प्रमुख म्हणून मिळणाऱ्या वेतनातून बचत करून उभी राहिलेली, पुरस्कार आणि स्मृतिचिन्हांच्या लिलावातून उभारण्यात आलेली रक्कम पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसेवा आणि निसर्ग सेवेसाठी समर्पित करतात. याच मालिकेत त्यांच्या भेटवस्तू आणि स्मृतिचिन्हांच्या 7 व्या लिलावातून जमा झालेली रक्कमही करण्यात आली नमामि गंगे प्रकल्पाला समर्पित...**

'माझ्या जीवनाचा क्षण अन् क्षण आणि माझ्या शरीराचा कण अन् कण देश आणि देशवासीयांच्या सेवेत समर्पित करण्याचा मी संकल्प करत आहे.' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनेक प्रसंगी या वाक्याचा केवळ पुनरुच्चारच केलेला नाही तर ते याच भावनेने जगत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी आतापर्यंत वेतनातून बचत केलेली, भेटवस्तू आणि स्मृतिचिन्हांच्या लिलावातून जमा केलेली आणि पुरस्कारांतून मिळालेली 100 कोटी रुपयांपेक्षा अधिकची रक्कम लोककल्याणासाठी अर्पण करून जनहित आणि समर्पणाचे एक नवीन उदाहरण घालून दिले आहे. पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या 25 वर्षांच्या शासन प्रमुखपदाच्या कार्यकाळात केवळ स्वत:लाच राष्ट्रसेवेला समर्पित केले नाही, तर आपल्या संकल्पानुरुप त्यांनी आपला क्षण-क्षण आणि भेटवस्तू म्हणून मिळालेला कण अन् कण गंगा मातेच्या सेवेसाठी समर्पित केला आहे. याच मालिकेत, संस्कृती मंत्रालयाने पंतप्रधान मोदींना मिळालेल्या स्मृतिचिन्हांच्या 7व्या लिलावाचे आयोजन केले होते. या लिलावात 1,300 पेक्षा अधिक भेटवस्तू ठेवण्यात आल्या होत्या.

17 सप्टेंबर ते 31 ऑक्टोबर या काळात असलेल्या या लिलावातील स्मृतिचिन्हे आणि पुरस्कारांवर ऑनलाईन बोली लावण्यासाठी अनेक लोक पुढे आले. भगवान तिरुपती बालाजीसाठी सर्वाधिक 179 लोकांनी बोली लावली तर अर्धनारीनटेश्वराची धातूची मूर्ती आणि श्री वेंकटेश्वर...

## खर्चातील बचत आणि भेटवस्तूंच्या लिलावाची रक्कम

## पंतप्रधान मोदी करतात दान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 41वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. यामध्ये मिळालेली एक लाख रुपयांची रक्कम पंतप्रधानांनी नमामि गंगे प्रकल्पाला दान केली.

- गुजरातमध्ये मुख्यमंत्री म्हणून आपला कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर बचत केलेल्या रकमेपैकी 21 लाख रुपये राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलींच्या शिक्षणासाठी दान केले.
- पंतप्रधान मोदींनी मुख्यमंत्री म्हणून मिळालेल्या सर्व भेटवस्तूंचा लिलाव करून 89.96 कोटी रुपये जमा केले आणि ही रक्कम कन्या केलावणी कोषामध्ये दान केली. ही रक्कम मुलींच्या शिक्षणावर खर्च करण्यात आली.
- पंतप्रधान मोदींच्या सुरुवातीच्या कार्यकाळात मिळालेल्या स्मृतिचिन्हांच्या लिलावातून 3.4 कोटी रुपये जमा झाले. ते नमामि गंगे मिशनमध्ये दान करण्यात आले.
- पंतप्रधान मोदींनी वर्ष 2015 मध्ये तेव्हापर्यंत मिळालेल्या भेटवस्तूंचा सूरतमध्ये लिलाव केला होता. त्या लिलावातून जमा झालेली 8.33 कोटी रुपयांची रक्कमही नमामि गंगे मिशनमध्ये दान केली होती.
- पंतप्रधान मोदींनी कोविड महामारीच्या काळात स्वतःच्या खर्चात कपात करून जमवलेले 2.25 लाख रुपये दान केले.
- सिओल शांतता पुरस्कारात मिळालेली 13 कोटी रुपयांची रक्कम नमामि गंगे मिशनमध्ये दान केली.
- कुंभमेळ्यातील सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी आपल्या वैयक्तिक बचतीतील 21 लाख रुपये या कामगारांच्या कल्याण निधीमध्ये दान केले.

## लिलावात ज्यांच्यावर लागली सर्वात मोठी बोली...



दैवी द्वैत आणि उत्कृष्ट शिल्पकला असलेली अर्धनारीश्वराची धातूची अत्यंत सुंदर मूर्ती भगवान शिव आणि त्यांची अर्धांगिनी पार्वतीचे संयुक्त रूप आहे. या भेटवस्तूसाठी किमान बोलीची रक्कम 1.10 लाख रुपये ठेवण्यात आली होती. ती 31 बोलींमध्ये 15 लाख रुपयांपर्यंत पोहोचली.

दुसरी सर्वात मोठी बोली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट स्वरुपात मिळालेल्या श्री वेंकटेश्वर बालाजींच्या सुंदर प्रतिमेसाठी लावण्यात आली. या लिलावाची सुरुवातही 1.10 लाख रुपयांपासून झाली होती आणि 9व्या बोलीमध्ये ती 15 लाख रुपयांपर्यंत पोहोचली.

## या वस्तू सर्वाधिक लोकांना हव्या होत्या...

**भगवान तिरुपती बालाजी यांचे स्मृतिचिन्ह:** कलात्मक तसेच रजत रंगाच्या भगवान तिरुपती बालाजी यांच्या स्मृतिचिन्हासाठी सर्वात जास्त 179 लोक लिलावात सहभागी झाले होते. या मूर्तीची लिलावातील सुरुवातीची किंमत 27,500 रुपये ठेवण्यात आली होती. ती अंतिम बोलीमध्ये 1,26,100 रुपयांपर्यंत पोहोचली.

**राम दरबार** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट म्हणून मिळालेली चांदीची राम दरबार मूर्ती 176 जणांना हवी होती. तिची सुरुवातीची किंमत 22 हजार रुपये ठेवण्यात आली होती, जी 176 व्या बोलीमध्ये 1,05,100 रुपयांपर्यंत पोहोचली.

**कानी पश्मिना शालीची किंमत 2.20 लाखांपर्यंत पोहोचली:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेट म्हणून मिळालेली कानी पश्मिना शाल काश्मीरच्या विणकर कलेचे अद्वितीय उदाहरण आहे. ती पश्मिना लोकरीपासून हातमागावर तयार करण्यात आली आहे. या शालीच्या लिलावाला 3,300 रुपयांपासून सुरुवात झाली होती. तिच्या इतक्या बोली लावण्यात आल्या की ती 69 व्या बोलीमध्ये 2.20 लाखांपर्यंत पोहोचली.







बालाजीसाठी सर्वात मोठी 15-15 लाख रुपयांची बोली लावण्यात आली. पहिला लिलाव जानेवारी 2019 मध्ये झाला होता. तेव्हापासून याआधीच्या 6 लिलावांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेट म्हणून मिळालेल्या 9 हजार भेटवस्तू लिलावासाठी ठेवण्यात आल्या. त्यांच्या लिलावातून नमामि गंगे प्रकल्पाला पाठबळ म्हणून 50 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम जमा करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे असे पहिले पंतप्रधान आहेत ज्यांनी या चांगल्या कामासाठी सर्व स्मृतिचिन्हे समर्पित केली आहेत.

ऐतिहासिक कामगिरी

# 500 गिगावॅटपेक्षा जास्त झाली स्थापित ऊर्जा क्षमता

**भारतात अणुऊर्जा केवळ स्वच्छ आणि स्वस्त विजेचा स्त्रोत बनत नाही आहे, तर आत्मनिर्भर ऊर्जेच्या दिशेनेही महत्त्वपूर्ण पावले टाकत आहे. देशाच्या ऊर्जेच्या वाढत्या गरजा पूर्ण करत अणुऊर्जा भविष्यातील विकासाच्या नवीन शक्यतांचे दरवाजे उघडत आहे.**

भारताने गेल्या काही दिवसांत ऊर्जा क्षेत्रात दोन ऐतिहासिक कामगिरी साध्य केल्या आहेत. त्यातून स्वच्छ, सुरक्षित आणि आत्मनिर्भर ऊर्जेकडे वाटचाल करणाऱ्या देशाची सातत्यपूर्ण प्रगती दिसते आहे. देशात 30 सप्टेंबर 2025 पर्यंत, एकूण स्थापित ऊर्जा क्षमता 500 गिगावॅटचा टप्पा ओलांडून 500.89 गिगावॅटपर्यंत पोहोचली आहे. ही कामगिरी ऊर्जा क्षेत्रात अनेक वर्षांपासून सुरू असलेले केंद्र सरकारचे मजबूत धोरणात्मक निर्णय, गुंतवणूक आणि इच्छाशक्तीच्या परिणाम आहे.

## अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार

- गेल्या 10 वर्षांत भारताच्या अणुऊर्जा क्षमतेत 70 टक्के वाढ झाली आहे.
- सध्या देशात उत्पादित होणाऱ्या एकूण विजेमध्ये अणुऊर्जेचे योगदान सुमारे 3 टक्के आहे.
- 2047 पर्यंत 100 गिगावॅट अणुऊर्जा क्षमतेचे लक्ष्य घेऊन देश पुढे जात आहे.
- वर्ष 2024-25 मध्ये अणुऊर्जा प्रकल्पातून 56,681 दशलक्ष युनिट विजेचे उत्पादन झाले.

## नवीकरणीय ऊर्जेसाठी संस्मरणीय दिवस

29 जुलै 2025 रोजी भारताने ऊर्जा उत्पादनात आतापर्यंतची सर्वाधिक नवीकरणीय ऊर्जा भागीदारी गाठली. या दिवशी, देशाच्या एकूण 203 गिगावॅट विजेच्या मागणीपैकी 51.5% मागणी नवीकरणीय ऊर्जा स्रोतांकडून पूर्ण झाली.
पहिल्यांदाच, भारताची अर्ध्याहून अधिक वीज एकाच दिवसात हरित स्रोतांकडून प्राप्त होणे हा बदलाचा ऐतिहासिक संकेत आहे.

## वर्ष 2031-32 पर्यंत 22 हजार मेगावॅटपेक्षा अधिक अणुऊर्जेचे होणार उत्पादन.

केंद्र सरकारने 2047 पर्यंत 100 गिगावॅट अणुऊर्जा क्षमतेपर्यंत पोहोचण्याच्या लक्ष्यासह महत्त्वाकांक्षी अणुऊर्जा मिशनची घोषणा केली आहे. या संदर्भात, सरकारने अणुऊर्जेमध्ये सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवण्यासाठी आवश्यक प्रक्रिया सुरू केली आहे. सध्या, देशात स्थापित अणुऊर्जा क्षमतेत 24 रिअक्टर समाविष्ट आहेत. त्यांची क्षमता 8,780 मेगावॅट आहे. (विस्तारित शटडाउन अंतर्गत असलेल्या आरएपीएस-1 (100 मेगावॅट) वगळता). हे टप्प्याटप्प्याने पूर्ण झाल्यावर, वर्ष 2031-32 पर्यंत अणुऊर्जा क्षमता 22,380 मेगावॅटपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

### नवीकरणीय ऊर्जेतील भागीदारी

| सौर ऊर्जा | पवन ऊर्जा |
|---|---|
| 127.33 गीगावॅट | 53.12 गीगावॅट |

**100** गीगावॅट अणुऊर्जा क्षमता वर्ष 2047 पर्यंत साध्य करण्याचे लक्ष्य.

### स्वच्छ ऊर्जेची वेगाने वाढत असलेली भागीदारी

वित्त वर्ष 2025-26 (एप्रिल-सप्टेंबर 2025) दरम्यान, भारताने 28 गीगावॅट बिगर-जीवाश्म क्षमता आणि 5.1 गीगावॅट जीवाश्म इंधनाचे उत्पादन केले आहे. स्वच्छ ऊर्जेचा हिस्सा किती वेगाने वाढत आहे, हे या उत्पादन क्षमतेमधून दिसून येते.



"आमचे सरकार स्वच्छ ऊर्जेच्या अभियानाला जनआंदोलन बनवून काम करत आहे."

- नरेंद्र मोदी, पंतप्रधान



Narendra Modi
@narendramodi

आम्ही देशभरातील शेतकरी बंधू भगिनींच्या कल्याणासाठी कटिबद्ध आहोत. या दिशेने, आमच्या सरकारने 2025-26 रब्बी हंगामासाठी फॉस्फरस आणि पोटॅश खतांवर अनुदान मंजूर करून एक मोठे पाऊल उचलले आहे. यामुळे शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात खते उपलब्ध होतीलच, शिवाय त्यांचे उत्पन्नही वाढेल.



रक्षा मंत्री कार्यालय/ RMO India
@DefenceMinIndia

ऑपरेशनि संदूर दरम्यान आकाश क्षेपणास्त्र प्रणाली, ब्रह्मोस, आकाश तीर हवाई संरक्षणि नयंत्रण प्रणाली आणि इतर अनेक स्वदेशी उपकरण प्लॅटफॉर्मने आपले कौशल्य कसे दाखवले हे आपण सर्वांनी पाहिले. आपल्या स्वदेशी प्लॅटफॉर्मच्या यशामुळे केवळ प्रादेशिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताची विश्वासार्हता वाढली आहे.-संरक्षणमंत्री



Amit Shah
@AmitShah

आझादि हंद सेनेच्या स्थापना दिनानिमित्त, आम्ही नेताजी सुभाषचंद्र बोस आणि आयएनएच्या शूर सैनिकांना आदरांजली वाहतो. आयएनएच्या माध्यमातून नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतिकारकांमध्ये असा विश्वासि नर्माण केला की त्यांचे देशवासी त्यांच्या स्वतःच्या सैन्य आणि लष्करी मोहिमांद्वारे स्वातंत्र्यि मळवू शकतात.1943 मध्ये नेताजींच्या नेतृत्वाखाली अंदमान आणि निकोबार बेटांवरि तरंगा फ डकवणारे आणि भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा करणारे आयएन ए सैनिक सदैव राष्ट्रासाठी प्रेरणास्थान राहतील.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

भारतीय अणुऊर्जा कार्यक्रमाचे जनक, महान शास्त्रज्ञ पद्मभूषण डॉ. होमी जहांगीर भाभा जी यांना त्यांच्या जयंतीनिमित्ति वनम्र अभिवादन.



Dr Mansukh Mandaviya
@mansukhmandviya

2 कोटी हून अधिक बळकट आणि वाढणारे! पंतप्रधान मोदींचे विकासित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी माय भारत युवा शक्ती एकवटत आहे.

Arjun Ram Meghwal
@arjunrammeghwal

आठव्या वेतन आयोगाच्या अटी आणि शर्तींना मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. आयोग १८ महिन्यांच्या आत आपल्या शिफारशी सादर करेल.

## गगनयान मिशन के लिए डीआरडीओ ने विकसित किए विशेष खाद्य पदार्थ



नई दिल्ली : रक्षा अनुसंधान एवं विकास संगठन (डीआरडीओ) ने 'गगनयान' मिशन के लिए विशेष भोजन और पैराशूट सिस्टम विकसित किए हैं। गगनयान मिशन में पृथ्वी की 400 किलोमीटर पर स्थित निचली कक्षा में तीन अंतरिक्षयात्रियों को भेजा जाएगा। इसके बाद पृथ्वी पर सुरक्षित वापसी कराई जाएगी। डीआरडीओ के इलेक्ट्रॉनिक्स और संचार महानिदेशक डा. बी.के. दास ने बताया कि डीआरडीओ ने इन तकनीकों का सफल परीक्षण भी कर चुके है। उन्होंने कहा, हमने गगनयान मिशन के लिए आवश्यक विशेष खाद्य पदार्थ और पैराशूट के लिए विशेष प्रणाली विकसित की है। हमारे पास ऐसी विशेष तकनीक भी हैं जिन पर अंतरिक्ष यात्री निर्भर रह सकते हैं। उन्होंने कहा कि डीआरडीओ ने ऐसी कई तकनीकें विकसित की हैं जिनका उपयोग सशस्त्र बलों और अंतरिक्ष मिशनों — दोनों में किया जा सकता है। उन्होंने कहा कि पहले और दूसरे चरण के परीक्षण प्रयोगशालाओं और बाहरी परिस्थितियों में किए गए हैं, जिनके परिणाम बेहद

## छठ देश में एकता का सबसे सुंदर उदाहरण: मोदी



वंदे मातरम का

मरीनटाइम लीडर्स कॉन्क्लेव में बोले पीएम मोदी

## देश का मरीनटाइम सेक्टर ग्रोथ का नया इंजन विकसित देशों से बेहतर हैं भारत के बंदरगाह



अंतर्देशीय जलमार्ग कार्गो में 700 प्रतिशत की वृद्धि

समुद्री दृष्टि ने 100 और नए संग्रहालय बनाए हैं

भारत का औसत कंटेनर समय 3 दिन कम हुआ



समुद्री क्षेत्र में सुधार, नए आधुनिक कानून लागू

भारतीय मरीनटाइम में निवेश करने का यही सही समय है

भारत के समुद्री क्षेत्र पर दुनिया को विश्वास

हरित हाइड्रोजन सुविधा शुरू

उपलब्धि — प्रधानमंत्री ने लिंक्डइन पोस्ट में भारत के समुद्री पुनर्जागरण पर रखे विचार, वैश्विक निवेशकों को तेजी से बढ़ते क्षेत्र में निवेश का दिया न्योता

## भारत समुद्री क्षेत्र में निवेश का परफेक्ट हार्बर, विजन 2047 से बनेगा ग्लोबल लीडर : मोदी



यूं हुई देश के समुद्री क्षेत्र की प्रगति

हरित दृष्टिकोण से वैश्विक नेतृत्व की तैयारी में देश

## 50 लाख कर्मचारी और 69 लाख पेंशनर्स को मिलेगा लाभ, किसानों के लिए सस्ते होंगे उर्वरक

8वें केंद्रीय वेतन आयोग के टर्म्स ऑफ रेफरेंस को मंजूरी दी



किसानों को होंगे ये लाभ

8वां वेतन आयोग: 18 महीने में देनी होंगी सिफारिशें

रबी सीजन 2025-26 के लिए

## विकसित भारत यूथ लीडर्स डायलॉग 2.0 : प्रधानमंत्री ने युवाओं से किया राष्ट्र निर्माण में भागीदारी का आह्वान

हरिभूमि ब्यूरो ›› नई दिल्ली

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने देश के युवाओं से राष्ट्र निर्माण में सक्रिय भूमिका निभाने की अपील की है। उन्होंने 'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग 2.0' के शुभारंभ की जानकारी देते हुए कहा कि यह पहल युवाओं के लिए अपने विचारों, सुझावों और दृष्टिकोण को साझा करने का एक सुनहरा अवसर है। प्रधानमंत्री मोदी ने अपने संदेश में कहा, "विकसित भारत युवा लीडर्स डायलॉग 2.0 हमारे युवाओं के लिए एक बेहतरीन अवसर है, जिससे वे राष्ट्र निर्माण में अपना योगदान दे सकें। हमारे युवाओं के विचार



और अंतर्दृष्टियां विकसित भारत के निर्माण में नई दिशा दिखा सकती हैं।" उन्होंने यह भी बताया कि इस संवाद में भाग लेने का रास्ता एक विशेष क्विज प्रतियोगिता से होकर जाता है। उन्होंने सभी युवाओं से आग्रह किया कि वे इस प्रतियोगिता में हिस्सा लें और अपने विचारों के माध्यम से भारत के विकास में सहभागी बनें। ›› शेष पेज 5 पर

### क्या है विकसित भारत यूथ लीडर्स डायलॉग 2.0

'विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग 2.0' केंद्र सरकार की एक पहल है जिसका उद्देश्य युवाओं को नीति निर्माण और विकास प्रक्रिया से सीधे जोड़ना है। इसके तहत देशभर के छात्र, युवा पेशेवर और नवाचार में रुचि रखने वाले लोग अपनी भागीदारी दर्ज करा सकते हैं। इस संवाद के माध्यम से युवाओं के विचारों को नीतिगत योजनाओं में शामिल करने का प्रयास किया जाएगा।

## 21वीं सदी भारत और आसियान की, हमारे ऐतिहासिक-सांस्कृतिक रिश्ते : पीएम मोदी

कहा, आसियान भारत की एक्ट ईस्ट नीति का मुख्य स्तंभ ■ आतंकवाद वैश्विक शांति और सुरक्षा के लिए गंभीर चुनौती



विकसित भारत से मानवता को फायदा

भारत के पास देने के लिए बहुत कुछ : मार्कोस

2026 समुद्री सहयोग का वर्ष

पूर्वी तिमोर 11वां सदस्य

स्थिरता और पारस्परिक समृद्धि को बढ़ावा : अनवर

## गैर-यूरिया उर्वरकों पर 37,952 करोड़ की सबसिडी मंजूर

जनसत्ता ब्यूरो
नई दिल्ली, 28 अक्तूबर।

केंद्रीय मंत्रिमंडल ने मंगलवार को चालू 2025-26 रबी सत्र के लिए गैर-यूरिया उर्वरकों फास्फोरस और सल्फर पर 37,952 करोड़ रुपए की सबसिडी को मंजूरी दी। हालांकि, नाइट्रोजन और पोटाश के

*मंत्रिमंडल* ने चालू रबी सत्र के लिए फास्फेट सबसिडी को 43.60 रुपए प्रति किलोग्राम से बढ़ाकर 47.96 रुपए प्रति किलोग्राम कर दिया है। नाइट्रोजन और पोटाश के लिए सबसिडी दर में बदलाव नहीं किया गया है।

करोड़ रुपए थी। उन्होंने बताया कि पोषक तत्व आधारित सबसिडी (एनबीएस) योजना के तहत सबसिडी दर आयात मूल्य और पोषक तत्वों की आवश्यकता, सबसिडी का बोझ और एमआरपी आदि जैसे अन्य कारकों को ध्यान में रख कर तय की गई है। सबसिडी दरें एक अक्तूबर से लागू होंगी। देश के कई हिस्सों में रबी (सर्दियों) की



24 नोव्हेंबर 2025 रोजी त्यांच्या 403 व्या जयंतीनिमित्त

कृतज्ञ राष्ट्राचे अभिवादन

## वीर लाचित बरफुकन

# भारताचे शूर सुपुत्र

धाडस, रणनीती आणि युद्धकौशल्याने परिपूण र्असलेल्या शूर सेनापती लाचित बरफुकन यांनी सराईघाटच्या लढाईत आसामच्या पवित्र संस्कृतीचे आणि भूमीचे परकीय आक्रमणकर्त्यांपासून रक्षण करण्याचा उल्लेखनीय पराक्रम गाजवला. मर्यादित संसाधने, शौय र्आणि देशभक्तीच्या जोरावर विशाल मुघल सैन्याचा पराभव करणाऱ्या आत्मनिर्भर सैन्याचे ते प्रतीक होते. भारताचे महान सेनापती लाचित बरफुकन हे केवळ आसामचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे वीरपुत्र होते...

## वारशाचा आदर

- केंद्र सरकारने लाचित बरफुकन यांच्या वारशाचा सन्मान केला आणि 2022 मध्ये त्यांची 400 वी जयंती राष्ट्रीय स्तरावर मोठ्या उत्साहात साजरी केली.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 9 मार्च 2024 रोजी जोरहाट येथे वीर लाचित बरफुकन यांच्या 125 फूट उंचीच्या विशाल आणि भव्य कांस्य पुतळ्याचे अनावरण केले.
- त्यांचे चरित्र 23 भाषांमध्ये प्रकाशित झाले.
- 2023 मध्ये प्रजासत्ताकि दनाच्या संचलनात आसामच्या चित्ररथात महान अहोम सेनापती लाचित बरफुकन यांचे चित्रण करण्यात आले होते.
- देशातील सव शूर्र सैनिकांना या योद्ध्यापासून प्रेरणा मिळावी म्हणून 1999 पासून राष्ट्रीय संरक्षण अकादमी (एनडीए) मधील सर्वोत्तम कॅडेटला लाचित बरफुकन सुवर्ण पदक प्रदान केले जात आहे.

"वीर लाचित बरफुकन यांचे जीवन आपल्याला आपल्या देशासमोरील सध्याच्या अनेक आव्हानांना धैर्याने तोंड देण्याची प्रेरणा देते. ते आपल्याला वैयक्तिक हितसंबंधांना नव्हे तर राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची प्रेरणा देते. आपल्यासाठी कुटुंब, भाऊबंद नव्हे तर राष्ट्र हे सर्वात मोठे प्राधान्य असले पाहिजे.

\- नरेंद्र मोदी, पंतप्रधान

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELMAR/2020/78830, 16-30 नवंबर, 2025

आरएनआय DELMAR/2020/78830, दिल्ली पोस्टल लायसन्स नंबर- DL (S)-1/3553/2023-25 डब्ल्यू पी पी क्रमांक - U (S)-101/2023-25, पोस्टिंग अँट बीपीसी, मार्केट रोड, नवी दिल्ली - 110001, 13-17 अग्रीम पाक्षिक (प्रकाशनाची तारीख - 4 नवंबर 2025, एकून पाने-52)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, मुख्यमहासंचालक,
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक आणि मुद्रक:
कंचन प्रसाद , महासंचालक,
केंद्रीय संचार ब्युरो

खोली क्र.– 278, केंद्रीय संचार ब्युरो,
माहिती भवन, दुसरा मजला,
नवी दिल्ली – 110003 येथून प्रकाशित

मुद्रणः
चन्दु प्रेस, 469, पटपड़गंज इंडस्ट्रियल एस्टेट,
दिल्ली-110092

Marathi